**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**नागपूर व अमरावती विभागातील ६६४६ अतिरिक्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करणेबाबत**

**(१) * २४४९३ श्री. जी. एल. ऐनापूरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाचे दिनांक २५ नोव्हेंबर, २००५ च्या सुधारित आकृतीबंधानुसार नागपूर व अमरावती विभागात अतिरिक्त झालेल्या सुमारे ६६४६ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अन्य शाळांमध्ये समायोजन झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) कर्मचारी अतिरिक्त ठरविणारा उक्त शासन निर्णय रद्द करावा अशी मागणी सरकार्यवाह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी त्यांचे दिनांक ६ जानेवारी, २००७ चे निवेदनाद्वारे मा.शिक्षण मंत्री यांच्याकडे केली, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्याचे योजिले आहे,

(४) अद्याप कारवाई केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वसंत पुरके** : (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) शासन निर्णय दिनांक २५.११.२००५ चा अभ्यास करण्यासाठी नियुक्त केलेल्या त्रुटीसमितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल असून, त्यावर शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय,हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. महाराष्ट्रातील खाजगी शाळांमध्ये जे कर्मचारी आहेत,यासंबंधी हा जो शासन निर्णय निर्गमित केलेला आहे, त्याप्रमाणे जवळजवळ 35-40हजार शिक्षकेतर कर्मचारी सरप्लस होणार आहेत. यावर माझा पहिला प्रश्न विचारला होता की, नागपूर,अमरावती येथील शाळांमधील शिक्षकेतर कर्मचारी ॲब्सॉर्ब झाले का ? उत्तर नाही असे आले. या शासननिर्णयामुळे एकटया विदर्भामधील खाजगी शाळांतील 6646 शिक्षकेतर कर्मचारी सरप्लस झालेले आहेत तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये तर 45,000 इतके शिक्षकेतर कर्मचारी सरप्लस झालेले आहेत आणि मजेदार गोष्ट अशी की, या पुरोगामी राष्ट्रप्रमुखांनी कालच सभागृहामध्ये असे सांगितले होते की, राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, यापूर्वीही या सदनामध्ये तीन वेळा हा प्रश्न चर्चेकरिता मांडण्यात आला होता. दिनांक 21 नोव्हेंबर,2003 रोजी यासंदर्भात जो शासन निर्णय काढण्यात आला होता तो रद्द केला व पुन्हा एक शासन निर्णय

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

दिनांक 25 नोव्हेंबर,2003 रोजी काढण्यात आला. दिनांक 12 डिसंबर,2003 रोजी तो रद्द केला.

A - 2



श्री.व्ही.यु.डायगव्हाणे..... ता.प्र.क्र.24493.....

या शासन निर्णयावर शासनाने एक त्रूटी समितीही नेमलेली होती, त्या त्रूटी समितीचा अहवाल आला आहे. दिनांक 29 जुलै,2006 रोजी पुन्हा तो शासन निर्णय पुनरुज्जीवित करण्यात आला म्हणून माझा असा स्पेसिफिक प्रश्न आहे की,आपण दिनांक 29जुलै,2006 रोजी जो कटौतीचा शासन निर्णय निर्गमित केला तो रद्द करा किंवा त्रूटी समिती जो अहवाल आला तो जसाच्या तसा लागू करणार का ? या दोहोंपैकी काही तरी आपण लागू करणार आहात का ?

प्रा.वसंत पुरके : अध्यक्ष महोदय, हा अतिशय गंभीर आणि महत्वाचा प्रश्न आहे आणि तो शासनाने अतिशय गांभीर्याने घेतलेला आहे. त्रूटी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. यासंदर्भात शिक्षण संचालक यांचेकडून मागविलेला अभिप्राय येणे बाकी आहे, अभिप्राय आल्यानंतर यासंदर्भात एक महिन्याच्या आत शासन यावर निर्णय घेईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या शासन निर्णयामुळे फार मोठया प्रमाणावर शिक्षकेतर कर्मचा-यांची संख्या अतिरिक्त ठरणार आहे, यावर माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, हा शासन निर्णय लागू केल्यानंतर महाराष्ट्रामध्ये शिक्षकेतर कर्मचा-यांची जळगावंमध्ये 1045 नागपूरमध्ये 1674,ठाणे येथे 1642 चंद्रपूरमध्ये 790,यवतमाळमध्ये 739 अशाप्रकारे महाराष्ट्रातील इतर जिल्हयांमध्येही किती शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरणार आहेत ? हा माझा पहिला प्रश्न आणि हा शासन निर्णय जरी शासनाने काढला असला तरी शिक्षकेतर कर्मचा-यांची अनुकंपा आणि अनुशेष या तत्वावर भरती करण्यासाठी शासनाने बंदी आणलेली आहे, अनुशेष व अनुकंपा या तत्वावर शासनाचे नेमणूकीचे आणि मान्यतेचे स्पष्ट व नेमके धोरण काय आहे ? हे सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

प्रा.वसंत पुरके :महोदय, या शासन निर्णयामुळे शिक्षकेतर कर्मचा-यांची किती पदे अतिरिक्त ठरणार ? किती पदे वाढणार ? हा प्रश्न शासनाच्या दोन विभागांशी संबधित असल्यामुळे त्या विभागातील अधिका-यांना उपरोक्त माहिती लवकरात लवकर देण्याचे मी आदेश दिलेले आहेत, ही माहिती आम्हाला प्राप्त झाल्यावर त्यावर एक महिन्याच्या आत शासन निर्णय घेईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी अनुकंपा तत्वावरील जो प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर देखील आपण द्यावे.

यानंतर श्री.बोरले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MAP/ प्रथम कु.खर्चे ........ 11:05

**ता.प्र.क्र.24493** .......

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी अनुकंपातत्वासंदर्भात प्रश्न विचारला होता, त्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अनुकंपातत्वासंदर्भात ज्या प्रवर्गाचा सदस्य असेल त्याला अनुकंपातत्वावर नोकरीत सामावून घेण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, शासनाने शासन निर्णय काढल्यामुळे 55 हजार पदे लॅप्स होणार आहेत. हा अन्याय आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अनुशेषासंदर्भात प्रश्न विचारला. अनुशेष भरतीवर बंदी नाही. अनुभेष भरती सुरु आहे. त्या ठिकाणी खुल्या प्रवर्गाची पदे रिक्त आहेत, ती पदे भरण्यासाठी शासन मान्यता देणार काय ? अशासकीय माध्यमिक शाळेतील पदे भरण्यासाठी जी बंदी आहे, ती बंदी शासन केव्हा उठविणार आहे ? आणि पदे भरण्यास केव्हा संमती देणार ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, त्रुटी समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. किती पदे अतिरिक्त होतात आणि कोणती पदे वाढतात यासंदर्भातील सूचना देण्यात आलेल्या आहेत. एका महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, त्रुटी समितीचा अहवाल शासनाला केव्हा प्राप्त झाला ? आणि संचालकांचे अभिप्राय केव्हा येतील ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, त्रुटी समितीचा अहवाल शासनाला 8 दिवसापूर्वी प्राप्त झ ालेला आहे. तो आम्ही मान्य केलेला आहे. एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे की, मंत्रालयामध्ये बसणारे अधिकारी महाराष्ट्रातील शिक्षणाकडे कोणत्या वृत्तीने पाहतात ? सभागृहामध्ये दोन-तीन वेळा शासन निर्णय रद्द करावा लागला. सभागृहामध्ये शासन निर्णय रद्द केल्यानंतर पुढच्या मंत्र्यांनी पुन्हा शासन निर्णय काढला. आता स्थगिती मिळालेली आहे. तज्ज्ञ शिक्षण संचालक श्री.चिपळूणकर यांनी आकृतीबंध दिलेला आहे. त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. सभापती महोदय, अधिका-यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शिक्षणाकडे उद्धटपणे पाहण्याचा शासन निर्णय पुन्हा काढला. त्रुटी समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. शासन एका महिन्याच्या आत याबाबत निर्णय घेईल काय ?

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24493** .......

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, त्रुटी समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे, हे मी मान्य केलेले आहे. संचालकांचे अभिप्राय येणे आवश्यक आहे. शासन एका महिन्याच्या आत निर्णय घेईल.

-------

..3.......

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हिंगोली जिल्ह्यात रॉकेल तपासणी दक्षता पथकाने रॉकेल विक्रेत्यांचे परवाने रद्द केल्याबाबत**

**(2) * 24789 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 17693 ला दिनांक 18 जुलै, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) हिंगोली जिल्ह्यात रॉकेल तपासणी दक्षता पथकाने ज्या 14 परवानाधारकांवर कारवाई करण्यात आली त्या परवानाधारकांच्या दुकानांची 1 एप्रिल, 2005 ते 31 मार्च, 2006 या कालावधीत कोणकोणत्या नियमीत तपासणी अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात आली होती व केंव्हा करण्यात आली होती,

(2) दिनांक 9 मे, 2006 रोजी हिंगोली जिल्ह्यात रॉकेल तपासणी दक्षता पथकाने केरोसीन परवानाधारकांच्या केलेल्या तपासणीमध्ये आढळून आलेल्या दोषांचे गांभीर्य लक्षात घेता 6 घाऊक परवानाधारकांचे परवाने रद्द केले ही बाब खरी असल्याने केरोसीन विक्रेत्यांच्या नियमीत तपासण्या करण्यात येत असताना संबंधित अधिकाऱ्यांच्या हे दोष निदर्शनास का आले नाही, व याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

**श्री.सुनील तटकरे** : (1) राज्य स्तरीय दक्षता पथकाने हिंगोली जिल्ह्यात केलेल्या तपासण्यांच्या अनुषंगाने 8 अर्धघाऊक परवाने रद्द करण्यात आले व 6 घाऊक परवानाधारकांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली. सन 2005-06 मध्ये, उपजिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा तपासणी अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार या अधिकाऱ्यांकडून परवाना धारकांच्या तपासण्या वेळोवेळी करण्यात आल्या होत्या.

(2) राज्य स्तरीय दक्षता पथकाने माहे जानेवारी, 2006 मध्ये हिंगोली जिल्ह्यातील केरोसीन परवाना धारकांच्या केलेल्या तपासण्यांच्या अनुषंगाने 8 अर्धघाऊक परवाने रद्द करण्यात आले असून 6 घाऊक परवानाधारकांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे हे खरे असून, या परवानाधारकांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासण्यांमध्ये दोष निदर्शनास का आले नाहीत, याबाबत चौकशी करण्याचे आदेश विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य स्तरीय दक्षता पथकाने तपासणी करण्यापूर्वी क्षेत्रीय अधिका-यांनी तपासणी केली होती, ती केव्हा केली ? आणि त्यावेळी त्यांना दोष आढळून आले होते काय ?

श्री.सुनील तटकरे :सभापती महोदय, जानेवारी, 2006 ते डिसेंबर, 2006 या कालावधीमध्ये क्षेत्रीय अधिका-यांची नेमणूक करुन 255 तपासण्या करण्यात आल्या होत्या. त्यावेळी किरकोळ परवाना धारकांच्याबाबतीत दोष आढळून आले होते. त्याप्रमाणे कारवाई करण्यात आली होती. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे तपासणीमध्ये राज्य स्तरीय दक्षता पथकाला त्यावेळी दोष आढळून आले नव्हते. त्याबाबत योग्य ती कार्यवाही सुरु आहे.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24789**.......

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या 6 परवानाधारकांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे, ती किती आहे ? त्यांची नावे काय आहेत ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, 22 अर्धघाऊक परवानाधारकांचे परवाने रद्द केले आहेत. तसेच 10 परवानाधारकांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. एकंदरीत जे दोषी आढळून आले आहेत त्यांची अनामत रक्कम 3,38,228 रुपये आहे. नियमित जी तपासणी करण्यात येते त्या अनुषंगाने आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम 68 हजार आहे.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24789

श्री.दिवाकर रावते : ही घटना 1 एप्रिल 2005 ते 31 मार्च 2006 या कालावधीतील आहे. दोन वर्ष उलटून गेलेली आहेत. मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, हिंगोली जिल्हयात रॉकेल तपासणी दक्षता पथकाने रॉकेल विक्रेत्याचे परवाने रद्द केले आहेत परंतु परवानाधारकांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासण्यांमध्ये दोष निदर्शनास का आले नाहीत ? याबाबत चौकशी करण्याचे आदेश विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहेत, आता दोन वर्ष होत आली आहेत, तरीही चौकशी पूर्ण झालेली नाही, त्यासंबंधी आपण कोणती कार्यवाही करणार आहात ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, विभागीय आयुक्तांना चौकशीचे आदेश दिले आहेत. ते या प्रकरणाची सखोल चौकशी करीत आहेत कारण पूर्वी उपजिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा तपासणी अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार यांनी तपासण्या केलेल्या आहेत. हे अधिकारी नियमितपणे तपासणी करीत असताना नेमक्या कोणत्या ठिकाणी केल्या आहेत, त्यात काय आढळले आहे याची तपशीलवार चौकशी विभागीय आयुक्तांकडून करण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. साधारणत: दोन महिन्यात ही चौकशी पूर्ण होईल व दोषींवर कारवाई करण्यात येईल.

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सोलापूर शहरातील सम्राट चौकात उभी करण्यात येत असलेली महाराज मंदिराची कमान कोसळून एका कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३) * २४५९३ श्री. शिवाजीराव पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील सम्राट चौकात उभी करण्यांत येत असलेली महाराज मंदिराची कमान कोसळून एका कामगाराचा जागीच मृत्यू होऊन ५ जण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक १० जानेवारी २००७ रोजी घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यांत आली आहे काय,

(३) चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यांत आली आहे ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांचेकरिता :** (१) होय, परंतु सदर घटना दिनांक ९ जानेवारी, २००७ रोजी घडली असून, त्यामध्ये एकाचा मृत्यू होऊन सहाजण जखमी झाले आहेत.

(२) व (३) होय. दिनांक ९ जानेवारी, २००७ रोजी रात्री २१.०० वाजताच्या सुमारास सोलापूर शहरातील सम्राट चौक येथे श्री.सदगुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या महाद्वाराची कमान कोसळून सदर बांधकामावर असलेला एक कामगार जागीच ठार झाला व इतर ६ कामगार जखमी झाले.

सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या ४ आरोपींविरुद्ध जेलरोड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१५/२००७, भा.दं.वि.सं.कलम ३०४,४२७,३४ प्रमाणे नोंदविण्यात येवून सदर घटनेबाबत अधिक तपास सुरु आहे.

श्री.शिवाजीराव पाटील : सभापती महोदय, सोलापूर शहरातील सम्राट चौकात उभी करण्यात येत असलेली महाराज मंदिराची कमान कोसळून एक कामगाराचा मृत्यू झाला असून पाच कामगार जखमी झालेले आहेत. या प्रकरणात कमान कोसळण्यापूर्वी कोणती दक्षता घेतली होती ? एका कामगाराचा मृत्यू झाल्याने गुन्हा नोंदविताना 302 कलम का लावले नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दिनांक 9 जानेवारी, 2007 रोजी सोलापूर शहरातील सम्राट चौक येथे श्री.सदगुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या महाद्वाराची कमान कोसळली आहेत. कमान बांधत असताना वरची बाजू रिकामी ठेवली जात होती. कारण धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी मोठया काठया या कमानीतून न्याव्या लागतात अशी

.....3



PNG/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.24593

श्री.सिध्दाराम म्हेत्रे .....

प्रथा आहे, त्यामुळे वरची बाजू मोकळी ठेऊन खालची पॅकींग काढण्याचे काम सुरु होते. पॅकींग काढत असताना कमान कोसळून एक जण ठार सहा जण जखमी झालेले आहेत. याबाबत भा.द.वि.304 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा होऊ शकत नाही, त्यामुळे 302 कलमान्वये गुन्हा नोंदविलेला नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : मृत्यू व जखमी झालेल्या कामगारांना किंवा वारसांना किती नुकसान भरपाई देण्यात आली आहे ?. दिली नसल्यास देण्याचे प्रयोजन आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हे सरकारी काम नव्हते. खाजगी ठेकेदाराकडून काम केले जात होते. त्यामुळे नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. मात्र त्यांनी जखमींवर उपचार केलेले आहेत.

श्री.शिवाजीराव पाटील : खाजगी ठेकेदाराकडे काम असेल तर त्यांना नुकसान भरपाई देणे योग्य नाही काय ? मृत व जखमी झालेल्या कामगारांना नुकसान भरपाई देऊन न्याय दिला पाहिजे, असे माझे मत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, ठेकेदाराच्या कामामध्ये तांत्रिक दोष, गलथानपणा होता व त्यामुळे कमान पडली असेल तर दोषींवर कारवाई केली पाहिजे. तसेच मृत व जखमींना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाकडून काही सूचना देता येईल काय, हे पहावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दोषींवर कारवाई करण्यात येईल. यामध्ये ठेकेदार, आर्कीटेक्ट, कन्सटींग इंजिनियर यांचा समावेश आहे. मृत व जखमींना नुकसान भरपाई देण्याबाबत संबंधित ठेकेदार व संस्थेस आदेश देण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रकरणात गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. परंतु पडलेल्या कमानीच्या बांधकाम साहित्यातील सँपल घेऊन त्याची तपासणी करुन, बांधकाम साहित्यात भेसळ आहे का हे पाहिले आहे का ? गुन्हा सिध्द होण्यासाठी हे केले पाहिजे.

नंतर श्री.सुंबरे.....

अशुध्दप्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24593 ....

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ते सगळे नमुने फोरान्सिक लेबॉरेटरीकडे पाठविण्यात आलेले असून अजून शासनाकडे त्यांचा रिपोर्ट आलेला नाही.

श्री. शिवाजीराव पाटील : सभापती महोदय, यातील चार आरोपींची नावे काय आहेत आणि त्यांची जबाबदारी काय होती ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदरच्या चार आरोपींची नावे आणि त्यांच्याकडील जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत. 1) श्री. प्रमोद पुरूषोत्तम, वय 58, आर्किटेक्ट., 2) श्री. अतुल वसंत जोशी, स्ट्रक्चरल इंजिनिअर, 3) श्री.अजय पाठक, कंसल्टंट इंजिनिअर, आणि 4) श्री.राजू तुलसीदास, सुपरवायझर कॉंट्रॅक्टर.

****

...... डी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अंधेरी (पश्चिम) येथील बर्फीवाला लेन परिसरातील**
**मे. डायनाक्राप्ट या कंपनीच्या जागेबाबत**

**(4) * 28703 श्री. अनिल परब** : : सन्माननीय **महसूलमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अंधेरी (पश्चिम) येथील बर्फीवाला लेन परिसरातील मे. डायनाक्राप्ट या कंपनीच्या जागेच्या काही भागाचे सिटी सर्व्हे कार्यालय अंधेरीचे भूमापन अधिकारी यांनी दिनांक 28 डिसेंबर, 2006 रोजी सर्वेक्षण करुन उक्त जागा एका विकासकाला झी.पु. योजनेच्या संक्रमण शिबीराच्या बांधकामासाठी ताब्यात दिली हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मुळातच डायनाक्राप्ट या कंपनीची सदरहू मिळकत कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असून तसा फलकही तेथे लावण्यात आलेला असून कोर्ट रिसिव्हरचा तेथे सुरक्षा रक्षकही तेथे कार्यरत आहे हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त जमीन विकासकास देणेबाबतची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार करण्यात आली हेही खरे आहे काय,
(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(5) असल्यास, याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

**श्री. नारायण राणे** : (1) नाही.
(2) होय.
(3) नाही.

मात्र मे. डायनाक्राफ्ट कंपनीच्या मालकीच्या जागे लगतची न.भू. क्र. 208 अ/1, ही मिळकत शासनाची असून सदर जमिनीवर तात्पुरत्या स्वरुपाचे संक्रमण शिबीर बांधण्यास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी काही अटी/शर्तीवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दिनांक 14/8/2006 च्या पत्रान्वये परवानगी दिलेली आहे.
(4) व (5) मे. डायनाक्राफ्ट कंपनीने त्यांच्या मालकीच्या जागेच्या लगत असलेल्या शासकीय जमिनीवर दावा दाखल केला असून याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी आयोजित केलेल्या सुनावणीच्या वेळी सदर जागेच्या मालकीहक्काबाबत कंपनीने कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, ही डायनाक्राप्ट कंपनी कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यामध्ये आहे आणि त्या कंपनीच्या मालकीची जागा भूमापन अधिकारी यांनी भूमापन करून संक्रमण शिबिराच्या बांधकामासाठी विकासकाला दिली. सभापती महोदय, जी जागा कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात आहे, अशी जागा एखाद्या बिल्डरला वा विकासकाला संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्या अधिकारामध्ये संक्रमण शिबिराच्या बांधकामासाठी दिली ? त्याबाबतचे कोणतेही अधिकार नसताना

....... डी 3 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (पुढे चालू...) ता.प्र.क्र.28703 ....

त्या अधिकाऱ्याने ती जागा अशा प्रकारे दिली असेल तर त्याच्यावर शासन काय कारवाई करणार आहे तसेच अशा प्रकारे कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेली जागा विकासकाला देण्यामुळे कंटेम्प्ट ऑफ कोर्ट झाला असल्याने त्या संबंधात शासनाने संबंधितांवर काय कारवाई केली आहे वा करणार आहे ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सर्व्हे क्रमांक 260, 804 आणि 259 ही डायनाक्राप्ट कंपनीची जागा आहे आणि संक्रमण शिबिरासाठी विकासकाला दिलेली जागा ही त्या लगतचीच सर्व्हे क्र.208(अ)(1) आहे. ही जागा कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यामध्ये नाही. कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेल्या जागेचे क्षेत्रफळ 1250 चौ.मीटर इतके आहे तर डायनाक्राप्ट कंपनीच्या जागेचे क्षेत्रफळ 3965 चौ.मी. इतके आहे. त्यामुळे कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेले क्षेत्र आणि झो.पु.योजनेसाठी दिलेले क्षेत्र हे वेगळे असून कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेली जागा संक्रमण शिबिरासाठी दिलेली नाही. त्यामुळे यामध्ये कोणावरही कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, यातील विकासक दर्शन बिल्डर्स आहे त्यांनी त्या जागेच्या बाजूच्या, नजिकच्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले आहे हे खरे आहे काय ? त्याबद्दल मंत्री महोदयांना काही माहिती आहे काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, येथे अतिक्रण केलेलेच नाही तर ही जागा संबंधित विकासकाला एसआरए योजनेमध्ये उपजिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात दिलेली आहे आणि ती जागा शासनाच्या ताब्यामध्ये आहे. या संबंधात कोर्ट रिसिव्हरने देखील जी तक्रार केलेली आहे ती उपजिल्हाधिकारी यांचेकडे केलेली आहे, कोर्टाकडे केलेली नाही. तेव्हा त्याला रितसर चार वेळा सुनावणी दिलेली आहे पण त्या कोणत्याही सुनावणीमध्ये ती जागा कोर्टाच्या ताब्यात असल्याबद्दलचा कोणताही पुरावा त्याने दिलेला नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर आता येथे दिले आहे त्यातून कलेक्टरने कोर्ट रिसिव्हरला प्रश्न विचारला, त्यांना बोलावून माहिती घेतली असे ध्वनित होत आहे. माझा या संबंधात प्रश्न असा आहे की, कोर्टामध्ये जे प्रकरण आहे ज्यामुळे कोर्ट रिसिव्हर नेमला गेला त्याबाबतीतील माहिती कोर्टाकडूनच घेतली पाहिजे की कलेक्टरकडून घेतली पाहिजे ? सभापती महोदय, ही जागा डायनाक्राप्ट कंपनीची आहे आणि ही कंपनी बंद होऊन

....... डी 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार (पुढे चालू...) ता.प्र.क्र.28703 ....

पुष्कळ वर्षे झाली आहेत. त्या कंपनीने अनेक कामगारांची देणीही अद्याप दिलेली नाहीत. तेव्हा दर्शन बिल्डरला नेमकी हीच जागा कशी काय सापडली ? आणि त्यांना तीच जागा संक्रमण शिबिरासाठी कशी काय दिली गेली ? सभापती महोदय, जागा कशा बळकावल्या जातात याचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे. अशी अनेक उदाहरणे आहेत. प्रथमत: बिल्डर लोक अशा प्रकारे संक्रमण शिबिरे बांधतात आणि नंतर त्याला कायदेशीर मान्यता घेतात. म्हणून माझा या संदर्भात प्रश्न आहे की, दर्शन बिल्डरने त्या जागेवर संक्रमण शिबीर केव्हा बांधले ? मुंबई उपनगर उपजिल्हाधिकारी यांनी त्यासाठी केव्हा परवानगी दिली आणि त्या परवानगीसाठी बिल्डरने त्यांच्याकडे केव्हा अर्ज केला होता ? दुसरे असे की, ही जागा कंपनीच्या मालकीची नाही असा खुलासा आपल्या उत्तरामध्येच आला असता तर बरे झाले असते, म्हणूनच माहिती घेण्यासाठी मी हे विचारत आहे ?

( यानंतर श्री. सरफरे ..... इ 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. सरपोतदार साहेबांनी प्रश्न विचारतांना माहिती दिली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये बिल्डर्समार्फत एस.आर.ए. योजनांची कामे सुरु आहेत ही वस्तुस्थिती आहे. परंतु हे संबंधित प्रकरण भिन्न स्वरुपाचे आहे. सदरहू बिल्डरने एस.आर.ए. योजनेमध्ये संक्रमण शिबिर बांधण्यासाठी ही जागा दि.16.6.2006 रोजी मागितली. ही शासनाची जागा असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक 14.8.2006 रोजी त्यांना दिली. डायनाक्राप्ट या कंपनीची ही जागा कधीही नव्हती, त्यामुळे त्यांना अलिकडची जागा आपली असणार असे वाटत होते. ज्यावेळी ही जागा बिल्डरला देण्यात आली त्यावेळी ही जागा डायनाक्राप्ट कंपनीची जागा आहे असे समजून कोर्ट रिसिव्हरने पोलीस स्टेशनला तक्रार केली. त्यावेळी पोलिसांनी सांगितले की, याबाबत आपण जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयामध्ये जावे व त्याठिकाणी आपली तक्रार नोंदवावी. त्याप्रमाणे कोर्ट रिसिव्हर त्याठिकाणी गेल्यानंतर कोर्ट रिसिव्हरची सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी त्यांना सांगण्यात आले की, ही जागा तुमची म्हणत आहात तर तुम्ही जागेची कागदपत्रे दाखवा. त्यांनी जेव्हा कागदपत्रे दाखविली तेव्हा त्यामध्ये सर्व्हे नं. 260, 804 व 259 मधील जवळपास 3965 स्क्वेअर मीटरची डायनाक्राप्ट कंपनीची जागा कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात आहे. त्या जागेच्या अलिकडील सर्व्हे नं. 208- अ (1) वर त्यांचा काहीही अधिकार नसल्यामुळे ती शासनाची जमीन जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात आहे, व त्याठिकाणी संक्रमण शिबिर बांधण्याकरिता ती जागा दर्शन बिल्डरला देण्यात आली.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात असलेली शासनाची जमीन देण्यात आलेली आहे हे मान्य आहे. परंतु भूमापन अधिकाऱ्यांनी त्यामधील काही जमिनीचा भाग दिला असून तो कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात आहे व त्यावर पत्रे टाकण्यात आले आहेत. त्याठिकाणी सुरक्षा रक्षक नेमलेला आहे. त्यांनी पोलीस स्टेशनला या संदर्भात दिलेले पत्र पोलीस स्टेशनने अमान्य केले. त्यानंतर चौकशी झाली असता लक्षात आले की, ही जमीन चुकीच्या पध्दतीने कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असून ती दर्शन बिल्डरला देण्यात आली. अशाप्रकारे चुकीच्या पध्दतीने कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेली जमीन दर्शन बिल्डरला देणाऱ्या अधिकाऱ्यावर आपण काय कारवाई करणार आहात?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 28703...

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी वारंवार सांगत आहे की, 1250 स्क्वेअर मीटर क्षेत्र शासकीय होते. त्याठिकाणी संक्रमण शिबिर बांधण्याकरिता ते बिल्डरला देण्यात आले. कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यातील एक इंच सुध्दा जागा संबंधित बिल्डरला देण्यात आली नसल्यामुळे तक्रार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. यासंबंधी दिनांक 14.2.2006, 22.2.2006, 7.3.2006 व 15.3.2006 अशी चार वेळा त्यांना सुनावणीकरिता तारीख देण्यात आली. पहिल्या तारखेच्या वेळी कोर्ट रिसिव्हर उपस्थित राहिल्यानंतर पुन्हा ते उपस्थित राहिले नाहीत व त्यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दिवा (जिल्हा ठाणे) येथे उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी अवैधरित्या देशी दारु बनविणाऱ्यावर छापा टाकून हजारो लिटर रसायन जप्त केल्याबाबत**

**(५) * २५१०१ श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्रीमती सुधा जोशी , श्री. रमेश निकोसे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्कमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा ठाणे, दिवा परिसरात दिनांक २१ डिसेंबर २००६ रोजी वा त्या दरम्यान उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी छापा टाकून अवैधरित्या देशी दारु बनविण्यासाठी वापरण्यात येणारी हजारो लीटर रसायन जप्त केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबतीत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा तपशील काय व तद्नुसार सदर प्रकरणातील गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक** : (१) हे खरे नाही,

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील दिवा परिसरामध्ये उत्पादन शुल्क विभागाने धाडी टाकून देशी दारु बनविण्यासाठी लागणारी ७७०० लिटर रसायने व अन्य पदार्थ् जप्त केले. या धाडी उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी श्री. प्रदीप पवार यांच्या आदेशावरुन टाकण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25101 (पुढे सुरु...

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या तारखेच्या दिवशी अशाप्रकारच्या धाडी घालून मुद्देमाल जप्त केलेला आहे, असे नाही. परंतु त्या वर्षामध्ये `निरीक्षक, भारारी पथक क्रमांक 1, ठाणे यांनी हायवे दिवा गाव, ता.भिवंडी या ठिकाणी 1 वारस गुन्हा नोंदवून एका आरोपीस अटक करून 60 लिटर गावठी दारू व एका वाहनासह रू.5,260 किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. स्टेशन दिवा ता.जि.ठाणे या ठिकाणी 6 गुन्हे नोंदवून 1 वारस गुन्ह्यामध्ये एका आरोपीस अटक करून 4800 लिटर रसायन व 7 लिटर गावठी दारूसह रू.29270 किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. निरीक्षक, भरारी पथक कोकण विभाग यांनी दिवा परिसरात 2 गुन्हे नोंदवून 1 वारस गुन्ह्यांमध्ये दोन आरोपीस अटक केली असून 71 लिटर गावठी दारूसह रु.1865 किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. त्यानंतर निरीक्षकांनी हातभट्टी दारूच्या अवैध धंद्याविरूध्द वारंवार छापे टाकून कार्यवाही केलेली आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, अवैधरित्या दारू पिण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अशा दारूमध्ये अतिशय निकृष्ट दर्जाचा माल मिसळला जातो. त्यामुळे विषारी दारू पिऊन लोक मृत्युमुखी पडल्याची उदाहरणे आहेत. अशा दारू उत्पादकांवर कडक नजर ठेवण्यासाठी शासनाकडे कोणती यंत्रणा आहे ? असल्यास, सदर यंत्रणा सक्षम आहे काय ? तसेच आताच मंत्री महोदयांनी धाडी घातल्याच्या संबंधाने सांगितले. या धाडी दिवा या ठिकाणी घातलेल्या आहेत अशी वर्तमानपत्रामध्ये खोटी माहिती का देण्यात येते ? याची चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी दिवा येथील प्रश्न उपस्थित केला. त्या दिवा परिसरामध्ये अंजूर दिवा, हायवे दिवा गाव, स्टेशन दिवा अशी तीन दिवा गावे येतात. त्यामुळे उपस्थित केलेल्या परिसरामध्ये धाडी टाकलेल्या नव्हत्या. सन्माननीय सदस्यांनी गावठी दारूचे प्रमाण वाढले असल्याचे सांगितले. विषारी दारू प्याल्यामुळे मृत्युला सामोरे जावे लागते ही गोष्ट खरी आहे. परंतु विक्रोळी येथील दारू कांड झाल्यानंतर शासनाने कायद्यामध्ये बदल केला. त्यामध्ये दारू निर्माण करणारे, दारूची विक्री करणे, दारू वाहून नेणारे यांच्यावर नॉन बेलेबल गुन्हा दाखल करण्याची कायद्यामध्ये तरतूद केलेली आहे. अशाप्रकारचा गुन्हा नोंदविला जात असल्यामुळे आता दारूचे उत्पादन करण्याचे प्रमाण नगण्य झालेले आहे. खात्याने कारवाई केली म्हणूनच गुन्हे नोंदविल्याचे आपल्याला दिसत आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

ता.प्र.क्र.25101....

श्री.संजय दत्त : गावठी दारू कायमस्वरूपी बंद असताना देखील असे प्रकार धडत असतात. हे गुन्हे उघडकीस आल्यानंतर त्याच्यावर पांघरून घातले जाते. हिंदीमध्ये याला "लीपापोती",असे म्हटले जाते. मंत्री महोदयांनी सांगितले की, याबाबत कडक धोरण घेतलेले आहे. परंतु मूळ प्रश्न असा आहे की, याबाबतची इफेक्टीव्हली आणि प्रामाणिक अंमलबजावणी केली जाईल काय ? सन्माननीय मंत्री महोदयांनी मागच्या एक वर्षामध्ये अशाप्रकारच्या धाडी टाकल्याचे सांगितले. त्याचा कन्व्हीक्शन रेट किती होता ?

श्री.गणेश नाईक : ही गोष्ट खरी आहे की, पूर्वीच्या काळी गावठी दारूची निमिर्ती ही नगण्य होती. त्योवळेस शासनाने गावठी दारूविरूध्द मोहीम उघडल्यानंतर उत्पादन शुल्क विभागाच्या उत्पन्नामध्ये दुप्पटीने वाढ झालेली आहे. शासनाचे सर्व अधिकारी आपल्या कर्तव्याला अनुलक्षून काम करीत आहेत. माझा असा दावा नाही की कोठेच अवैध गावठी दारूच उत्पादन होत नाही. कोणत्या तरी कानाकोपऱ्यामध्ये दारूचे उत्पादन होत असेल. परंतु तसे आढळून आल्यानंतर कारवाई केली जाते, म्हणूनच त्यांच्यावर गुन्हे नोंदविलेले दिसून येतात.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.25101.... (श्री. गणेश नाईक......

सन्माननीय सदस्यांनी, किती आरोपींना अटक केली आणि किती आरोपींवर गुन्हा शाबीत झाला? असा प्रश्न विचारलेला आहे. अशा स्वरुपाची मोघम माहिती या क्षणी माझ्या जवळ उपलब्ध नाही. ही माहिती मी पटलावर ठेवीन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रश्नकर्त्याने "जिल्हा ठाणे, दिवा परिसरात दिनांक 21 डिसेंबर 2006 रोजी वा त्या दरम्यान..." अशा प्रकारे प्रश्नाची सुरुवात करुन प्रश्न विचारलेला आहे. या प्रश्नाला अधिका-यांनी चुकीची माहिती पुरविल्यामुळे माननीय मंत्री महोदयांना चुकीचे उत्तर दिले आहे. मंत्री महोदयांनी, त्या दिवशी म्हणजे 21 डिसेंबर 2006 रोजी वा त्या दरम्यान असे घडले नव्हते, अशा प्रकारे उत्तर दिले आहे. पुढील क्रमांक 2, 3 आणि 4 च्या प्रश्नाला प्रश्न उद्‌भवत नाही असे छापील उत्तर दिलेले आहे. परंतु माननीय मंत्रीमहोदयांनी दरम्यानच्या काळात घडलेल्या घटना सांगितल्या. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी असत्य उत्तर दिलेले असून ते सुधारणे आवश्यक आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर बरोबर आहे काय ?

श्री. गणेश नाईक : दरम्यानच्या काळात म्हणजे दोन-चार दिवस अगोदर असा अर्थ अभिप्रेत होतो. म्हणून त्या तारखेच्या दरम्यान अशा घटना घडलेल्या नाहीत असे मी उत्तर दिले. दरम्यानचा काळ हा माननीय सदस्यांना वर्षभराचा काळ अपेक्षित असेल तर मी तसे नमूद करतो.

श्री. जयंत प्र. पाटील : गावठी दारुसाठी अधिकृत परवाने देण्याचे माननीय मंत्री महोदयांनी जाहीर केले होते. तेव्हा असे परवाने देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

श्री. गणेश नाईक : जे सर्व गांधीवादी नेते आहेत त्यांची बैठक घ्या, आणि त्यांची संमती असेल तर शासन याबाबतीत विचार करील.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : "गांधीवादी" असा शब्दप्रयोग असलेले वाक्य कार्यवृत्तातून काढून टाकण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : या शब्दप्रयोगाबद्दल माननीय मंत्री महोदयांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 25101...)

श्री. गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, या देशामध्ये दारुपासून जे उत्पन्न मिळते ते शासनाला भूषणावह नाही असे माझेही मत आहे. शासकीय दारु नसेल तर गावठी दारु निर्माण केली जाते आणि परिणामी अशा विषारी दारुमुळे लोकांचे बळी जातात. गावठी दारु निर्माण करण्याचे परवाने देणार काय ? असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला होता. गोवा राज्यामध्ये तशा प्रकारे परवाने दिलेले आहेत. मी सांगितले की, ज्या राज्यामध्ये समाज जागरुक आहे, महात्मा गांधींच्या विचारांचा पुरस्कार करणारे लोक आहेत अशा लोकांना एकत्र आणून त्यांना ही भूमिका पटवून दिली आणि त्यांनी सहमती दर्शविली तर याबाबतीत शासन विचार करील.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : "गांधीवादी" असे शब्दप्रयोग कार्यवृतातून काढून टाकण्यात येतील असे निदेश मी दिलेले आहेत.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मावळ तालुक्यातील (जि. पुणे) आढळे बुद्रुक येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत वर्गफळा अंगावर कोसळल्याने अंकिता घोटकुले व भाग्यश्री घोटकुले या दोन विद्यार्थीनींचा मृत्यू झाल्याबाबत**

**(६) * २८७५९ श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **ग्रामविकासमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालुक्यातील (जि. पुणे) आढळे बुद्रुक येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत वर्गफळा अंगावर कोसळल्याने अंकिता घोटकुले (वय ७ वर्षे) व भाग्यश्री घोटकुले (वय ५ वर्षे) या दोन विद्यार्थीनींचा मृत्यू होऊन दोन विद्यार्थीनी जबर जखमी झाल्याची घटना दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजी घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) मृत्युमुखी पडलेल्या विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांना कोणत्या स्वरुपाची मदत केली आहे ?

**श्री. रणजित कांबळे, श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) सदर घटनेबाबत प्रथमदर्शनी जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर दिनांक १७.२.२००७ रोजी तळेगांव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे.

(४) मृत्यूमुखी पडलेल्या विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांना नियमानुसार आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मावळ तालुक्यातील (जि. पुणे) आढळे बुद्रुक येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत वर्गफळा अंगावर कोसळल्याने अंकिता घोटकुले (वय 7 वर्षे) व भाग्यश्री घोटकुले (वय 5 वर्षे) या दोन मुलींचा मृत्यू झाला.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.28759............. श्री.गुरुनाथ कुळकर्णी....

सभापती महोदय, 7 वर्षे आणि 5 वर्षे वयाच्या दोन निष्पाप मुलींना आपला प्राण गमवावा लागला. जिल्हा परिषदेच्या शाळेत या मुली शिकत होत्या. त्या वर्गखोलीतील फळा खाली पडला किंवा तो कोसळला आणि या दोन मुलींचा मृत्यू झाला. पोलीस स्टेशनमध्ये या संदर्भातील तक्रार दाखल केल्यानंतर ती नेमकी कोणाविरुध्द केली जाणार आहे? या घटनेला कोण जबाबदार आहे?ज्या दोन बालकांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई दिली गेली आहे का? असल्यास केव्हा दिली? दिली नसल्यास नुकसानभरपाई देण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, चार व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. शिक्षण समितीच्या अध्यक्षा सरपंच श्रीमती निवेदिता कटके, शिक्षण समितीचे सचिव, ठेकेदार आणि ज्युनिअर इंजिनिअर यांच्याविरुध्द पोलीस केस दाखल केली आहे.

श्री.गुरुनाथ कुळकर्णी : जो शिक्षक जबाबदार आहे, ज्याच्याकडे या वर्गाची जबाबदारी दिली होती, त्या वर्गातील फळा नादुरुस्त असेल तर त्याबाबत त्यांनी उपाययोजना केली नाही आणि तो फळा पडल्याने या दोन बालकांचा मृत्यू झाला. याची जबाबदारी कोणावर येते?

श्री.रणजित कांबळे : ही घटना घडली ती सर्वशिक्षा अभियानामध्ये जे ॲम्फिथिएटर बांधले होते त्याठिकाणी घडली. सकाळी 10.30 वाजता शाळा बंद झाली. असे असताना या मुली तेथे खेळत होत्या. फळा पडल्यामुळे स्वाभाविकच जबाबदारी शिक्षण समितीची आहे, बांधकाम ज्यांनी केले त्यांच्यावर जबाबदारी येणार आहे. शिक्षण समितीचे अध्यक्ष, सचिव, ठेकेदार आणि जे.ई. यांनी हे बांधकाम केले होते, त्यांच्याविरुध्द पोलीस तक्रार दाखल केली आहे. त्यांच्यावर कलम 304(अ) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. ॲम्फिथिएटरमध्ये जोत्यावर ब्लॅकबोर्डसाठी विटांची भिंत तयार केली होती. तो ब्लॅकबोर्ड विटांचा होता. तो ब्लॅकबोर्ड पडला आणि मुलींच्या अंगावर विटा पडल्या.

**सभापती** : सन्माननीय राज्यमंत्र्यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, उत्तरामध्ये वर्गफळा पडल्याचे म्हटले आहे. परंतु तोंडी उत्तर देत असताना भिंत बांधली होती, त्या भिंतीवर फळा म्हणून रंगविले होते असे आपले म्हणणे दिसते. शाळा संपल्यानंतर त्याठिकाणी मुली खेळत होत्या असेही सांगितले आहे. शाळा संपल्यानंतर तेथे विद्यार्थी असणे हे सुध्दा चुकीचे आहे. त्यादृष्टीने शिक्षकांच्या संदर्भात विचार करणे गरजेचे आहे असे सन्माननीय सदस्यांचे मत आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.28759..........

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, ही संशोधन करण्यासारखी बाब आहे. 4X3 चा फळा असतो. याठिकाणी फळ्याची भिंत पडली असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. या प्रकरणी केवळ मुख्याध्यापकाचा दोष नाही. या घटनेची पूर्ण चौकशी झाली पाहिजे. नेमकी भिंत पडली की फळा पडला?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, भिंतीवरच फळा होता. ती भिंत पडल्यामुळे बांधकामाच्या संदर्भात चौकशी करणे आवश्यक ठरले. ज्यांनी बांधकाम केले त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे. जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता या बांधकामाची चौकशी करीत आहेत. त्यांच्यासोबत डेप्युटी इंजिनिअरची चौकशी चालू आहे. सर्वशिक्षा अभियानांतर्गत ॲम्फिथिएटर बांधण्यात आले. या बांधकामाच्या कन्सल्टन्सी सर्विसेस क्वालिटी सुपरव्हिजनसाठीचे काम आर्किटेक्ट ॲण्ड अलाईड सर्विसेस यांना दिले होते. त्यांच्याविरुध्द सुध्दा शासन कारवाई करणार आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 28759 .........**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात जे लेखी उत्तर दिलेले आहे तेच मुळात चुकीचे आहे. शाळेतील वर्गफळा अंगावर कोसळल्याने कु. अंकिता घाटकुले तसेच कु. भाग्यश्री घाटकुले अशा लहान मुलींचा मृत्यू झालेला आहे. या ठिकाणी प्रश्न विचारण्यात आला की, मुलींच्या अंगावर फळा पडल्यामुळे त्यांचा मृत्यू झालेला आहे का? त्यावर होय असे उत्तर देण्यात आलेले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात चुकीचे उत्तर देण्यात आले असल्यामुळे हा प्रश्न आपण राखून ठेवावा अशी विनंती आहे. ही घटना 17 फेब्रुवारी, 2007 रोजी घडलेली आहे, आज 30 मार्च आहे. इतके दिवस घटना घडून सुध्दा या प्रश्नाच्या संदर्भात योग्य उत्तर आलेले नाही. खरे म्हणजे शाळेतील फळा हा काही फार मोठा नसतो. लाकडी फळा अंगावर पडल्याने काही मृत्यू येत नसतो. फळा पडून मुलींचा मृत्यू झाला आहे की, भिंत अंगावर पडल्यामुळे मुलींचा मृत्यू झालेला आहे असा प्रश्न या ठिकाणी निर्माण झालेला आहे. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, भिंत पडून मुलींचा मृत्यू झाला असेल तर आपण तेथील शिक्षकांवर काय कारवाई केलेली आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, ओपन थिएटरमध्ये ही घटना घडलेली आहे. ओपन थिएटरमध्येच शाळा भरवली जात असे. ओपन थिएटरच्या भिंतीला काळा रंग लावून फळा बनविण्यात आला होता. या भिंतीचा काही भाग पडल्यामुळे मुलींचा मृत्यू झालेला आहे. ज्यावेळेस ही घटना घडली त्या दिवशी शनिवार होता व शाळा 10.30 वाजता सुटली होती. शाळेची सुट्टी झालेली असतांना देखील काही मुली त्या ठिकाणी खेळत होत्या. शाळा बंद झाल्यानंतर 3 तासानंतर सदर घटना घडलेली आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांना मोकळया जागेत शिक्षण दिले जाते. ओपन थिएटरमध्ये मुलांचे वर्ग भरविले जातात.

श्री. शिवाजीराव पाटील : सभापती महोदय, चुकीच्या मार्गाने या प्रश्नाची चर्चा सुरु आहे असे मला वाटते. सर्वशिक्षा अभियानामध्ये शाळा खोल्यांचे बांधकाम केले जात असते व भिंतीवरच लाकडी फळा लावला जात असतो. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, ही घटना घडली त्यावेळेस शाळेची सुट्टी झाली होती त्यामुळे या प्रकरणात शिक्षकांचा काय संबंध आहे? ज्याने निकृष्ट बांधकाम केलेले आहे त्याच्यावर गुन्हा नोंदला गेला पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 28759** .........

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण नजरेसमोर आणा की, भित आहे, भिंतीला प्लॅस्टर लावून व त्यावर काळा रंग लावून फळा केलेला आहे. या फळयाचे वजन किती असणार आहे? हा फळा एकदम कसा काय पडू शकतो? फळयाचा काही भाग पडल्यामुळे मुलींचा मृत्यू झालेला आहे. जर भिंतीवरील फळयाचा काही भाग पडल्यामुळे मुलींचा मृत्यू झाला असेल तर त्यासंदर्भात आपण शिक्षण सभापतीला कसे काय जबाबदार धरु शकता. या घटनेत शिक्षण सभापती प्रत्यक्ष जबाबदार कसे आहेत? फळयाचा भाग सुटतो आहे, फळा डब-डब वाजतो आहे हे त्या ठिकाणच्या शिक्षकाला कळले असेल तर त्याने त्यासंदर्भात अगोदरच तक्रार का केली नाही? त्यामुळे या घटनेत शिक्षकांला सुध्दा जबाबादार धरणार आहात काय?

श्री. रणजित देशमुख : सभापती महोदय, मी आपल्याला पुन्हा सांगू इच्छितो की, या ठिकाणची शाळा ओपन थिएटरमध्ये भरवली जात होती, ॲम्पी थिएटरमध्ये, खुल्या मैदानात भरवली जात होती. या ठिकाणच्या भिंतीचे बांधकाम नोव्हेंबर महिन्यात झाले होते. यासंदर्भात चौकशी सुरु आहे. या घटनेच्या संदर्भात एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर तसेच डेप्युटी सीईओ चौकशी करीत आहेत. या घटनेत जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर ॲक्शन घेतली जाईल.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MAP/ SBT/ 11:45

ता.प्र.क्र.28759........

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न विचारण्यात आला होता की, प्राथमिक शाळेत वर्गफळा कोसळून दोन मुलींचा मृत्यू झाला आहे काय ? याचे उत्तरे "होय" असे देण्यात आले. खरे म्हणजे हे चुकीचे उत्तर आहे. फळा नव्हे तर भिंतीवरच फळा रंगविण्यात आला होता ती भिंत पडली असे उत्तर दिले असते तर योग्य झाले असते. या प्रश्नाच्या बाबतीत ज्या अधिकाऱ्यानी सभागृहाची दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे त्यांच्यावर त्वरित कारवाई करण्याचे निदेश आपण द्यावेत जेणेकरुन यापुढे कोणत्याही अधिकाऱ्याची अशाप्रकारे चुकीची उत्तरे देण्याची हिम्मत होणार नाही. तेव्हा मंत्रिमहोदय संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार आहे ?

**सभापती** : मी सन्माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, वर्गफळा अंगावर कोसळून दोन विद्यार्थीनींचा मृत्यू झाला काय या प्रश्नाचे उत्तरे "होय" असे देण्यात आलेले आहे. त्यामुळे सर्वांचा असा समज झाला की, वर्गफळा कोसळून दोन विद्यार्थीनींचा मृत्यू झाला. खरे म्हणजे "भिंतीवरच रंगविलेला फळा कोसळून दोन विद्यार्थीनींचा मृत्यू झाला" असे उत्तरात नमूद करावयास पाहिजे होते. तेव्हा यापुढे बिनचूक उत्तरे येतील याची काळजी घेण्यात यावी. या अधिवेशनाच्या दरम्यान त्या शाळेला भेट द्यावी व ज्यांनी गलथानपणा केलेला आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असा मी निदेश देत आहे.

श्री.रणजित कांबळे : होय.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सर्वशिक्षा अभियानातंर्गत शाळाखोल्या बांधल्या जातात. या शाळाखोल्या बांधण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांवर सोपविण्यात आलेली आहे काय ? मुख्याध्यापकांचे काम शाळाखोल्या बांधण्याचे नाही. सर्वशिक्षा अभियानातंर्गत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. यासाठी शिक्षक संघटनांनी देखील विरोध केलेला आहे. तेव्हा मुख्याध्यापकांवरील ही जबाबदारी काढून ती बांधकाम खात्याकडे दिली जाईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, शाळाखोल्याचे बांधकाम कॉन्ट्रॅक्टर करतात फक्त सुपरव्हीजन करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांवर दिलेली आहे आणि हा केंद्र शासनाचा निर्णय आहे. तसेच मुख्याध्यापक हे त्या समितीचे सचिव असतात.

---------------- ..2..

**राज्यात खाजगी संस्थांना 2141 शाळा नव्याने सुरु करण्यास दिलेली मंजूरी रद्द करण्याच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे**

**(7) * 25196 श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक 22273 ला दिनांक 14 डिसेंबर, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात खाजगी संस्थाना 2141 शाळा सुरु करण्यास दिलेली मंजुरी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी दिनांक 7 व 18 जुलै, 2006 चे आदेशाने रद्द केली. यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(2) मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या "जैसे थे" आदेशाप्रमाणे राज्य शासनाने किती शाळा बंद केल्या आहेत.

(3) बंद केल्या नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वसंत पुरके** : (1), (2) व (3) रिट याचिका क्र. 2897/2006 मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शाळा परवानगी आदेश रद्द करुन शाळांच्या परवानगीसाठी बृहत आराखडा तयार करुन नव्याने प्रस्ताव मागवून पुढील कार्यवाही करावी असे आदेश दिले होते. त्यानुसार संबंधित शाळांचे आदेश रद्द करण्यात आले आहेत. तद्‌नंतर परवानगी रद्द केलेल्या शाळांच्या काही संस्थाचालकांनी मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केल्या आहेत. त्यापैकी काही याचिकांवर मा. सर्वोच्च न्यायालयाने जैसे थे चे आदेश दिले आहेत. विशेष अनुमती याचिका क्र. 19055/06 वर मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्र. 2897/06 च्या निर्णयास अंतरीम स्थगिती दिली आहे. याचिका क्र. 2897/06 च्या संदर्भात शासनाच्या वतीने प्रतिज्ञापत्र दाखल करण्याच्या सूचना शिक्षण संचालकांना देण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, रिट याचिका क्र.2897/2006 मध्ये माननीय उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शाळा परवानगी आदेश रद्द करुन शाळांच्या परवानगीसाठी बृहत आराखडा तयार करुन नव्याने प्रस्ताव मागवून पुढील कार्यवाही करावी असे आदेश दिले होते. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, बृहत आराखडा तयार झाला आहे काय, असल्यास तो वर्तमानपत्रात प्रसिध्द केला काय ? काही याचिकांवर माननीय सर्वोच्च न्यायालयाने "जैसे थे" चे आदेश दिलेले आहेत. तेव्हा या संदर्भात मी मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, आतापर्यंत राज्यात किती शाळा सुरु आहेत ?

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25196.........

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायलयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार बृहत आराखडा तयार करण्यात आला असून फक्त पाच जिल्ह्यांची माहिती यावयाची आहे. बृहत आराखडा प्रसिध्द करण्याबाबत सदस्यांनी प्रश्न विचारला होता त्याबाबत सांगू इच्छितो की, याची देखील व्यवस्था केली जाईल. शाळांचे आदेश रद्द केल्यानंतर काही संस्थाचालक सुप्रीम कोर्टात गेले. सुप्रीम कोर्टाने काही याचिकांवर जैसे थे चे आदेश दिले असून अंतरिम स्थगिती दिलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय उच्च न्यालयायाच्या नागपूर खंडपीठाने रद्द केलेल्या शाळांची संख्या किती आहे ? त्यापैकी काही संस्थाचालक सुप्रीम कोटात गेल्यावर सुप्रीम कोर्टाने जैसे थे चे आदेश दिले आहेत. हा निर्णय फक्त न्यायालयात गेलेल्या संस्थाना लागू आहे की, महाराष्ट्रातील सर्व संस्थाना लागू आहे ? याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25196...

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, काही याचिकांवर माननीय सर्वोच्च न्यायालयाने "जैसे थे" चा निर्णय दिलेला आहे व काही ठिकाणी अंतरिम स्टे दिलेला आहे. यासंदर्भात शासनाची अशी भूमिका आहे की, या सर्व शाळा नियमित व्हाव्यात व त्या दृष्टीनेच शासनाने कोर्टामध्ये प्रतिज्ञालेख सादर केलेला आहे. सध्या ही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी दोन महत्वाचे प्रश्न आहेत. बृहत आराखडयाचा पहिला प्रश्न न्यायप्रविष्ठ नाही. परंतु याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी आता जे उत्तर दिले व या प्रश्नास जे लेखी उत्तर दिले आहे, त्यामध्ये विसंगती आहे. याठिकाणी लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, "माननीय सर्वोच्च न्यायालयाने माननीय उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक 2897/06 च्या निर्णयास अंतरिम स्थगिती दिली आहे." तसेच, त्या अगोदर असे म्हटले आहे की, "त्यापैकी काही याचिकांवर माननीय सर्वोच्च न्यायालयाने "जैसे थे" चे आदेश दिले आहेत." परंतु याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी दोन्ही प्रश्न न्यायप्रविष्ठ असल्याचे सांगितले, ते चुकीचे आहे. त्यामुळे याठिकाणी माझा प्रश्न असा आहे की, बृहत आराखडा आपण महिना-दोन महिन्यांत तयार करावा, परंतु लोकांना कळले पाहिजे, तो बृहत आराखडा आपण फायनल केव्हा करणार आहात ? तसेच, या सर्व शाळांची सद्य:स्थिती काय आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, बृहत आराखडयाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. एक किंवा दीड महिन्यांत आम्ही बृहत आराखडा तयार करु. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नास मी सांगू इच्छितो की, अनेक शाळांना स्थगिती दिलेली आहे आणि काही शाळांच्या बाबतीत "जैसे थे"चे आदेश आहेत. याबाबतीत गोंधळाची स्थिती असल्यामुळे सर्वच शाळा नियमित करण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न आहेत व तीच शासनाची भूमिका आहे. याबाबतीत शासनाने सुप्रीम कोर्टाकडे प्रतिज्ञालेख सादर केलेला आहे की, जेणेकरुन सर्व शाळा नियमित होतील.

-------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कामकाजात झालेल्या आर्थिक आणि प्रशासकीय घोटाळ्याची चौकशी**

**(८) * २६६८४ श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **कामगारमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कामकाजात झालेल्या आर्थिक आणि प्रशासकीय घोटाळयाची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने चौकशी पूर्ण केली आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी करण्यात येत असलेली चौकशी पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच सदर प्रकरणी करण्यात येत असलेल्या चौकशीच्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गणेश नाईक** : (१) नाही,
(२) अद्याप चौकशी चालू आहे.
(३) मा. उच्च न्यायालयाने समितीला चौकशी पूर्ण करण्यासाठी ६ महिन्यांची मुदत दिलेली आहे.

श्री.राजेंद्र जैन : सभापति महोदय, मैंने यह प्रश्न पूछा था कि, क्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडल के कामकाज के बारे में आर्थिक एवं प्रशासकीय घोटाले की जांच करने के लिए नियुक्त की गई समिति की जांच पूर्ण हो गई है ? माननीय मंत्री जी ने इसका उत्तर " नहीं " में दिया है. उत्तर में यह भी बताया गया है कि माननीय उच्च न्यायालय ने समिति को जांच पूरी करने के लिए 6 माह का समय दिया है. मैं यह जानना चाहता हूं कि जांच में देरी क्यों हो रही है और 6 माह के भीतर जांच पूरी की जाएगी या नहीं ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील झालेल्या भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने तक्रारी आल्यानंतर मुखोपाध्याय समितीची नियुक्ती केली होती. सहा महिन्यांच्या आत या समितीने केलेल्या चौकशीचा अहवाल सादर करावयाचा असून ती मुदत मे महिन्यांत संपत आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा माननीय मंत्रिमहोदयांना पहिला प्रश्न असा विचारावयाचा आहे की, यासंबंधीच्या घोटाळयाचे व भ्रष्टाचाराचे स्वरुप काय आहे ? तसेच, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, माननीय उच्च न्यायालयाने 6 महिन्यांची जी मुदत दिलेली आहे, त्याची तारीख केव्हापासून सुरु होते व केव्हा संपते ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26684...

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, अमरावती येथे कामगार कल्याण भवनाची निर्मिती करण्यासाठी 2 कोटी, 7 लाख रुपये, चंद्रपूर येथील कामगार कल्याण भवनासाठी 2 कोटी, 1 लाख रुपये, नागपूर येथील कामगार कल्याण भवनासाठी 2 कोटी, 81 लाख रुपये, पुणे येथील कामगार कल्याण भवनासाठी 4 कोटी, 73 लाख रुपयांच्या अशा एकूण 19 ठिकाणी कामगार कल्याण भवनाच्या इमारती बांधण्यास सुरुवात केलेली आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**ता.प्र.क्र.26684 पुढे सुरु...........**</u>

श्री.गणेश नाईक........
परंतु, योग्य पध्दतीने कॉंट्रॅक्ट दिले नाही, अंतिम निर्णय घेतांना शासनाची परवानगी घेतली नाही, योग्य ते आदेश देऊन सुध्दा बांधकाम चालू ठेवले, अशा प्रकारचे आरोप आहेत. मे महिन्याच्या अंतिम आठवडयामध्ये मुदत संपली आहे म्हणजे साधारणपणे डिसेंबर महिन्यामध्ये त्यांची मुदत सुरु झाली होती.

-----------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सेंच्युरी मिल बंद केल्याबाबत**

**(९) * २५३६६ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. श्रीकांत जोशी :** सन्माननीय **कामगारमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंच्युरी मिल बंद केल्यामुळे सुमारे ७ हजार कामगार बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) तद्नुसार उक्त कामगारांना नुकसान भरपाई अथवा अन्य देय होणारे लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री. गणेश नाईक** : (१) व्यवस्थापनाने जाहीर केलेल्या स्वेच्छानिवृत्ती योजनेनुसार ६३०१ कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आहे व उर्वरित २७७ कामगार हजेरीपटावर आहेत. तथापि दिनांक १३/१२/२००६ पासून गिरणीचे उत्पादन बंद आहे.

(२) व्यवस्थापनाने जाहीर केलेली स्वेच्छानिवृत्ती योजना स्विकारलेल्या ६३०१ कामगारांना व्यवस्थापनाने एकूण रु. ३१६.१७ कोटी देय रक्कम अदा केली आहे. गिरणीतील कामकाज दि. १३/१२/२००६ पासून बंद असले तरी उर्वरित २७७ कामगारांना वेतन अदा केले जात आहे.

(३) स्वेच्छानिवृत्ती योजना स्विकारलेल्या सर्व कामगारांना व्यवस्थापनाने त्यांच्या कायदेशीर देय रकमा अदा केलेल्या असल्यामुळे कामगारांना नुकसान भरपाई वा इतर कोणतीही रक्कम देय नसल्याने यासंदर्भात कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सेंच्युरी मिल 13 डिसेंबर, 2006 रोजी बंद झाली आहे. ज्या 277 कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारलेली नाही, ते सध्या कोणत्या स्वरुपाचे काम करीत आहेत, स्वेच्छानिवृत्ती घेईपर्यन्त या कामगारांना कामावर ठेवून नियमित वेतन अदा केले जाईल का, तसेच कारखान्यातील उत्पादन ताबडतोब सुरु करुन गिरणी कामगारांना काम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, या कंपनीमध्ये एकूण 6578 कामगार कार्यरत होते. त्यापैकी 5215 कायम स्वरुपी कामगार, 862 बदली कामगार व 501 अन्य कर्मचारी, अधिकारी कंपनीत काम करीत होते. त्यापैकी 6301 कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली असून 277 कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारलेली नाही व ते सध्या कार्यरत आहेत. तथापि, या कामगारांना आजपर्यन्त पगार देण्यात आलेला आहे. जोपर्यन्त या कामगारांचे सेवाशर्तीच्या अनुषंगाने हिशेब पूर्ण होत नाहीत तोपर्यन्त त्यांचे पगार चालू राहतील.

..3..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.25366 पुढे सुरु..........</u>**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय कामगार मंत्र्यांना विचारु इच्छितो की, नोव्हेंबर, 2006 मध्ये जो करार झाला त्याप्रमाणे एकूण सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी 50 दिवसांचा पगार व त्या व्यतिरिक्त 1,10,000/- रुपये कामगारांना अदा करणे आवश्यक असतांना ते त्यांना देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे का ? कामगारांना स्वेच्छानिवृत्ती दिल्यानंतर एकूण 1,12,604 चौ.मी.जागेपैकी काही जागा नियम 58 अनुसार म्हाडा व मुंबई महानगरपालिकेला देण्यात येईल, असे बिर्ला ग्रुपने लेखी लिहून दिले असतांनाही एक इंच जमीनही या कंपनीने म्हाडा किंवा मुंबई महानगरपालिकेला दिलेली नाही, हे खरे आहे का ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, या कंपनीची एकूण जमीन 1,20,024 चौ.मी.एवढी आहे. सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण यांनी असे सांगितले आहे की, व्यवस्थापनाने म्हाडा किंवा मुंबई महानगरपालिकेला जमीन देण्याचे कबूल केले आहे. कामगारांना स्वेच्छानिवृत्ती दिल्यानंतर सदर कारखाना बंद करण्यासाठी कंपनीने कामगार आयुक्तांकडे अर्ज केलेला आहे. अर्ज करतांना हा धंदा नफ्यात राहिलेला नाही, जर योग्य वेळी कंपनी बंद केली नाही तर कामगारांची देणी देण्यासाठी कंपनीकडे पैसे शिल्लक उरणार नाहीत, अशी भिती व्यक्त केली आहे. या अनुषंगाने 6301 कामगारांना कंपनीने 310 कोटी 17 लाख रुपये अदा केलेले आहेत. सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे जर कंपनीने जागा देण्याबाबत कबूल केले असेल तर ही जागा विकासकाला विकण्यापूर्वी कंपनी ज्यावेळी परवानगीसाठी शासनाकडे येईल त्यावेळी म्हाडा किंवा मुंबई महानगरपालिकेला जागा देण्याबाबतची बाब तपासून पाहण्यात येईल व नंतरच अंतिम परवानगी देण्यात येईल.

यांनतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KGS/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर..... 12:00

ता.प्र.क्र.25366........

श्री.मधुकर चव्हाण : महोदय, या ठिकाणी त्या जागांवर बांधकामही सुरु झालेले आहे. यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेने उच्च न्यायालयामध्ये ॲफीडेव्हिट केलेले आहे. सदर ठिकाणी बांधकाम सुरु झाले आहे याची माहिती मुंबई महानगरपालिकेकडे नाही, हे आपले विधान चुकीचे आहे. मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य अभियंत्यांनी दिनांक 10 ऑगस्ट,2005 रोजी प्रतिज्ञा - पत्र सादर केलेले आहे. गिरणी कामगारांच्या अंतर्गत कामगार संघटनेने तक्रार केली की, आम्हाला देय देणी अद्यापपर्यंत अदा करण्यात आलेली नाहीत. याबाबत मघाशी मी उल्लेख केला होता परंतु आपण उत्तर दिले नाही प्रत्येक माणसामागे आपण 50 दिवसांचा पगार व एक लाख दहा हजार रुपयेही अद्याप दिलेले नाहीत आणि जे 316.17 कोटी रुपये दिले ते म्हणता ते मनमानीने दिलेले आहेत. दिनांक 10 ऑगस्ट,2005 रोजी त्या ठिकाणी बांधकाम सुरु झाले हे आम्हाला माहित नाही असे प्रतिज्ञा - पत्र मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य अभियंत्याने सादर केलेले आहे, हे खरे आहे काय ?

श्री.गणेश नाईक : या ठिकाणी अशा प्रकारचा कुठलाही करार झाल्याची माहिती माझ्याकडे नाही आणि तशा प्रकारचा करार झाला असल्यास व्यवस्थापनाच्या कराराच्या अनुषंगाने जी काही देणी देय होती, ती दिलेली नसल्यास किंवा व्यवस्थापनाने कामगार संघटनेच्या व व्यवस्थापनाच्या कराराच्या अनुषंगाने पूर्तता केलेली नसेल तर ती व्यवस्थापनाला पुर्तता करावयाला लावण्याची शासनाची तयारी आहे. गिरणीमालकांनी जर म्हाडाला,महापालिकेला जागा देण्याचे कबूल करुनही ती दिलेली नसेल तर त्याची ताबडतोब योग्य ती तपासणी केली जाईल त्यानंतर शासन गिरणी व्यवस्थापनास देय असलेली देणी देण्यासाठी शासन त्यांना भाग पाडेल आणि त्या ठिकाणी चालू असलेले बांधकाम ताबडतोब रोखण्याचे आदेश देण्यात येतील.

श्री.नितीन गडकरी : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरातून या सभागृहाचे समाधान होत नाही. सदस्यांनी कामगारांना देय असलेल्या देणीबाबत प्रश्न विचारल्यावर माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर आले की, व्यवस्थापनाने जाहीर केलेल्या स्वेच्छानिवृत्ती योजनेनुसार स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेल्या 6301 कामगारांना व्यवस्थापनाने एकूण रु.316.17 कोटी देय रक्कम अदा केली आहे. सदर हिशोब हा गिरणी व्यवस्थापनाचा होता, मिलमालकांचा होता परंतु गिरणी कामगारांच्या संघटनेने दिलेल्या हिशोबाप्रमाणे देणी देण्यात आली आहेत का ? कामगार

M-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KGS/ KTG/

12:00

ता.प्र.क्र.25366........

श्री.नितीन गडकरी......

युनियनच्या न्याय्य मागण्यांनुसार ज्या मागण्या होत्या, त्या पूर्ण करण्यात आल्या का ?याचे उत्तर आपल्याकडून मिळणे अपेक्षित होते, याची माहितीही आपल्याकडून ताबडतोब मिळणे आवश्यक होते. कामगारांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना पैसे देण्यात आलेले आहेत काय ? कामगारांच्या न्याय्य मागण्या पूर्ण केल्या नसल्यास, त्या कधी, केव्हा,कशाप्रकारे पूर्ण करण्यात येतील ? याबद्दलची सर्व माहिती आपल्याकडे आता उपलब्ध नसेल तर हा प्रश्न स्थगित केला पाहिजे. कामगारांना देण्याकरिता जाहीर करण्यात आलेल्या जागा डेव्हलप करण्यास सुरुवात झाली ही माहिती मुंबई महानगरपालिकेच्या अभियंत्यांकडे नाही, हे काय चालले आहे ? हे मिलमालक सरकारचे जावई आहेत का ? या बांधकामावर लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी.

श्री.अरविंद सावंत : या बांधकामास ताबडतोब स्थगिती द्यावी.

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जी बाब आणली की, कामगारांच्या मागण्या हया कराराचा भाग असतील किंवा तसे न्यायालयाचे आदेश असतील तर त्या कराच्या अनुषंगाने त्या ठिकाणी कामगारांना वेतन व नुकसान भरपाई कामगारांना देण्याचे आदेश शासनाकडून देण्यात येतील.

( गोंधळ )

श्री.नितीन गडकरी : माननीय मंत्री महोदय, आपण वस्तुस्थिती सांगावी.

श्री.गणेश नाईक : महोदय, कामगारांना करारानुसार योग्य आणि देय अशी नुकसान भरपाई दिली गेली नसेल तर ती ताबडतोब देण्याचे निदेश दिले जातील आणि त्या गिरणी मालकांनी शासनाला कबूल केलेल्या जागा दिल्या नसतील तर त्या देण्याचे निदेश ताबडतोब दिले जातील.

श्री.नितीन गडकरी : यासंदर्भात आम्ही तारांकित प्रश्न विचारल्यावर कायदेशीररित्या किती रुपये मिल कामगारांना देय आहेत, याबाबत आपल्या विभागाने ताबडतोब योग्य ती माहिती घ्यावयाला पाहिजे होती.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. प्रश्नोत्तराचा तास संपून चार मिनिटे झालेली असतांनाही सदर प्रश्न गिरणी कामगारांच्या जिव्हाळयाचा प्रश्न असल्यामुळे त्यावर

M-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KGS/ KTG/

12:00

ता.प्र.क्र.25366........

**सभापती**.....

सभागृहामध्ये चर्चा सुरु होती. माननीय मंत्री महोदयांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, या प्रश्नाबाबत आपण दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची बैठक बोलवा. आपले धोरण हे कामगारांना पूरक असे धोरण असते आणि यादृष्टीने ते सर्व कृतीत देखील उतरले पाहिजे, कारण आपले धोरण हे गिरणी कामगारांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असे धोरण आहे. या अनुषंगाने कामगार संघटनांना दिलेली याबाबतीतील आश्वासने व कामगार संघटना आणि गिरणी मालक यांच्यात झालेला करार, न्यायालयाने याअनुषंगाने दिलेले आदेश या सर्वांची पूर्ण खातरजमा करा आणि हा प्रश्न पूर्ण मार्गी लावा.

प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे.

------------

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सन 2004-05 चा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

डॉ.सुनील देशमुख (पाटबंधारे राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2005-06 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचा (औरंगाबाद) सन 2005-06 चा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा सन 2004-05 चा नववा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>औचित्याच्या मुद्याबाबत.</u>

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो. मी मागील अधिवेशनामध्ये चिकन गुनियासंबंधीचा अहवाल मागितला होता. मी आपल्याला तसे पत्र देखील दिले हाते. अद्याप तो अहवाल मला मिळालेला नाही. सभापती महोदय, मला तो अहवाल कसा मिळेल, यासंदर्भात आपण मला मार्गदर्शन करावे.

**सभापती** : माननीय आरोग्य मंत्र्यांना व आपल्याला माझ्या दालनात बोलावून मी आपल्याशी याबाबत चर्चा करीन.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला न्याय मिळाला पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आपल्याला न्याय मिळेल.

-------

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, रेशन दुकानामध्ये निकृष्ट दर्जाचा गहू दिला जातो, हे मी काल औचित्याच्या मुद्याद्वारे आपल्या निदर्शनास आणून दिले होते. आपण शासनाला याबाबत निवेदन करण्याचे निदेश दिले होते. शासन याबाबत निवेदन केव्हा करणार आहे ?

**सभापती** : संसदीय कामकाज मंत्र्यांना मी काल याबाबतचे निवेदन करण्याची सूचना दिलेली आहे. सभागृहाचे आजचे कामकाज संपेपर्यंत शासनाने निवेदन करावे.

------

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका अत्यंत महत्वाच्या विषयावर औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल सभागृहाला सादर झालेला आहे. राज्यामध्ये 36 लाख बेरोजगारांची नोंद झालेली आहे, असे त्या अहवालामध्ये नमूद केलेले आहे. युती शासनाच्या काळात बेरोजगार युवकांना रोजगार मिळावा म्हणून बेरोजगार युवकांना झुणका भाकर केंद्रे देण्यात आली होती. या राज्यामध्ये हजारो युवक झुणका भाकर केंद्राच्या माध्यमातून आपली उपजीविका करीत होते. त्यांना झुणका भाकर केंद्रासाठी युती शासनाने जागा आणि अनुदान दिले होते. परंतु आघाडी शासन सत्तेवर आल्यानंतर अनुदान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3....

रद्द करण्यात आले. तरीही बेरोजगार युवकांनी त्या जागेवर झुणका भाकर केंद्र चालवून आपला उदरनिर्वाह चालू ठेवला. तीन दिवसापूर्वी झुणका भाकर केंद्राच्या जागा खाली करण्यासंदर्भात संबंधितांना नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत. सभापती महोदय, बेराजगार युवकांच्या उपजीविकेचे साधन हिरावून घेण्याचे काम हे शासन करीत आहे व म्हणून याबाबत आपल्याला लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. मागच्या वेळी माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे यांनी यासंदर्भात शासनाने बैठक घेऊन मार्ग काढावा, अशा प्रकारचे निदेश दिले होते. शासनाने पाठविलेल्या नोटीसीमुळे झ ुणका भाकर केंद्र चालविणा-या युवकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाने त्यांचे अनुदान बंद केले आहे. झुणका भाकर केंद्राच्या बांधकामासाठी 50 टक्के रक्कम शासनाने आणि 50 टक्के रक्कम त्या युवकांनी खर्च केली आहे. एकवेळ शासनाने झुणका भाकर केंद्राचे अनुदान बंद केले तरी चालेल, त्यांच्याकडून बांधकामाचे अनुदान टप्प्याटप्प्याने वसूल केले तरी चालेल.

यानंतर श्री.गागरे .......

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

आपण यामध्ये लक्ष घालण्याची गरज आहे. झुणका भाकर केंद्र चालविणाऱ्यांना संरक्षण देण्यात यावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी झुणका भाकर केंद्राच्या प्रश्नाला वाचा फोडली आहे. यापूर्वी झुणका भाकर केंद्राच्या प्रश्नावरुन सभागृहात चर्चा झालेली आहे. सध्या हा प्रश्न माननीय मुख्यमंत्री व मंत्रिमंडळासमोर प्रलंबित आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी हा विषय मंत्रिमंडळासमोर मांडून सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, मला आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, झुणका भाकर केंद्राच्या समस्या ज्वलंत आहेत. जोपर्यंत त्यांच्या समस्येबाबत अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत त्यांना देण्यात आलेल्या नोटीसा मागे घेण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी यांच्या मार्फत स्थगित करण्यासाठी आपण हातभार लावला पाहिजे. झुणका भाकर केंद्र चालकांना संरक्षण दिले पाहिजे, या केंद्राद्वारे बेरोजगार तरुण व्यवसाय करुन पोट भरण्याचा प्रयत्न करतात, हया विषयावर मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय होणार आहे, तोपर्यंत त्यांना संरक्षण देण्यात यावे अशी मी विनंती करतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी झुणका भाकर केंद्राबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. माझी विनंती आहे की, झुणका भाकर केंद्रांना संरक्षण देण्यात यावे. याबाबत मी सांगू इच्छितो की, माननीय सभापतींची भेट घेण्यासाठी बेरोजगार होत असलेले झुणका भाकर केंद्रांचे चालक विधान भवन परिसरात आलेले आहेत. आपण त्यांना भेट देऊन त्यांचे सांत्वन केले तर फार बरे होईल. आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री महोदयांना तशा प्रकारचा मेसेज दिला तर बरे होईल. जोपर्यत कॅबीनेटचा निर्णय होत नाही तोपर्यत त्यांना आश्वासित करण्यासाठी योग्य ते निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या काळात या प्रश्नाबाबत त्यांच्या प्रतिनिधीसह मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, " शहानिशा करुन त्यांचे प्रश्न सोडविण्यात येतील. झुणका भाकर केंद्र चालक चांगले काम करीत आहेत, त्यांच्यावर अन्याय होणार नाही, त्यांच्या बाबतीत अत्यंत सहानुभूतीपूर्वक निर्णय घेण्यात येईल" असे माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते. .....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ KTG/

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, डॉ.दीपक सावंत, श्री.उल्हास पवार यांनी सभागृहात महत्वाचा प्रश्न मांडला आहे. यापूर्वीसुध्दा नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात सभागृहासमोर याबाबत चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्यांच्या विचाराशी मी व्यक्तिश: सहमत आहे. मुंबई शहर व महाराष्ट्र विविध जाती धर्मांच्या लोकांना सामावून घेत आहे. मुंबई शहर व राज्यामध्ये स्वत:चे जीवन उभे करण्याचे प्रयत्न झुणका भाकर केंद्र चालक करीत आहेत. त्या अनुषंगाने त्यांच्या व्यवसायाचे संरक्षण होणे गरजेचे आहे. श्री.उल्हास पवार यांच्यासह शिष्टमंडळ माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलेले आहे. याबाबत मी मुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चा करणार आहे. ज्या केंद्रावर गैरप्रकार होत नसतील, जे चांगल्या प्रकारे व्यवसाय करीत असतील, त्यांना संरक्षण देण्यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील. माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री त्या विभागाचे प्रमुख आहेत. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी झुणका भाकर केंद्राबाबत सभागृहाच्या भावना अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मंत्र्यांना सांगाव्यात. जोपर्यंत मंत्रिमंडळाचा धोरणात्मक निर्णय होत नाही तोपर्यंत झुणका भाकर केंद्रांना दिलेल्या नोटीसा स्थगित करण्याच्याही या सभागृहाच्या भावना अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांकडे कळविण्यात याव्यात.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी मी परवानगी देतो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, इयत्ता 10 वीच्या परीक्षा या राज्यात नुकत्याच पार पडल्या. त्या कशा पद्धतीने झाल्या आणि किती गाजल्या, आपल्या या सभागृहामध्ये देखील त्या गाजल्या, याची माहिती आपणा सर्वांनाच आहे. सभापती महोदय, अनेक ठिकाणी पेपरफुटीचे प्रकार झाले. विशेषत: बीड, परळीमध्ये दोन वेळा हे प्रकार घडले आहेत शिवाय औरंगाबाद मध्ये देखील घडले. तेथे तर विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी सकाळीच प्रश्नपत्रिका उपलब्ध झाल्या. तेव्हा एकंदरीत या परीक्षा मंडळाच्या कार्यपद्धतीबद्दलच प्रश्न निर्माण झालेला आहे म्हणून माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी याबाबत विशेष लक्ष घालून या मंडळाच्या अधिकाऱ्यांवर काही ठोस कारवाई करावी अशी अपेक्षा मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करतो.

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्री यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी याची नोंद घ्यावी आणि ज्या पद्धतीने बीड आणि औरंगाबादमध्ये पेपरफुटीचे प्रकार घडले आहेत ते प्रकार यापुढे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी तसेच ज्यांच्यामुळे हे प्रकार घडले आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.

प्रा. वसंत पुरके : होय.

**सभापती** : मी यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांना त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी देत आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, राज्यामध्ये भ्रूण हत्यांमुळे मुलींच्या संख्येत झालेली चिंतनीय घट या महत्त्वाच्या विषयासंबंधात मला येथे औचित्याचा मुद्दा मांडावयाचा असल्याने आपण मला या थोडा अधिक वेळ द्यावी अशी मी सुरूवातीलाच विनंती करतो. सभापती महोदय, सन 2001 च्या जनगणनेनुसार दरहजारी 927 इतके स्त्रियांचे प्रमाण असताना राज्यामध्ये 6 वर्ष वया खालील मुलींची संख्या ही दरहजारी 913 इतकी खालावली आहे. कोल्हापूर जिल्हयातील सर्वच तालुक्यांतील मुलींचे प्रमाण हे लक्षणीय घटलेले आहे. प्रामुख्याने कोल्हापूरमध्ये ते 839 इतके झालेले आहे, सांगलीमध्ये 851, साताऱ्यात 878, जळगावमध्ये 880, अहमदनगरमध्ये 884, बीडमध्ये 884, उस्मानाबादमध्ये 890, सोलापूरमध्ये 895 आहे. सभापती महोदय, या नऊ जिल्ह्यात

...... पी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त ....

स्त्रियांची संख्या दरहजारी 900 पेक्षा कमी आहे. याचे प्रमुख कारण भ्रूण हत्येसंबंधीच्या कायद्याची परिणामकारकरित्या अमलबजावणी या राज्यामध्ये होत नाही हे आहे. परिणामी राज्यातील स्त्रियांचे घटते प्रमाण रोखण्यामध्ये महाराष्ट्रासारखे पुरोगामी राज्याला अपेक्षेप्रमाणे यश आलेले नाही ही बाब चिंतनीय आहे. सभापती महोदय, मध्यंतरी राज्यातील 18 प्रसूतीपूर्व गर्भलिंग तपासणी केंद्रामध्ये पथकाने धाडी घालून हे प्रकार उघडकीस आणले आहेत. हे प्रकार असेच होत राहिल्यास राज्यातील स्त्रियांचे प्रमाण प्रचंड प्रमाणात कमी होईल आणि त्यातून अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतील. तरी यासाठी शासनाने विशेष लक्ष घालून भ्रूण हत्या विरोधी कायद्याची परिणामकारक अमलबजावणी करावी यासाठी मी हा गंभीर प्रश्न या औचित्याच्या मुद्याद्वारे येथे उपस्थित करीत आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औचित्याच्या मुद्याद्वारा जो विषय या ठिकाणी मांडला आहे त्यासंबंधात मला एक निवेदन करावयाचे आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी म्हटले की, 18 प्रसूतीपूर्व गर्भलिंग तपासणी केंद्रावर धाडी घालू भ्रूण हत्येचे प्रकार उघडकीस आणले. सभापती महोदय, समाननीय सदस्यांनी जी माहिती येथे दिली आहे ती तितकीशी बरोबर नाही. ती दुरूस्त व्हावी म्हणूनच मी येथे आपल्याला सांगू इच्छितो की, तो भ्रूणहत्येचा प्रकार नव्हता तर तेथे सोनोग्राफी तपासण्याचे रेकॉर्ड ठेवलेले नव्हते. आज यामुळे डॉक्टर्स मंडळींमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. कारण रूटीन प्रसूतीपूर्व तपासणी अनेक अनेक स्त्रिया करून घेत असतात आणि त्यांचा रेकॉर्ड पी फॉर्ममध्ये ठेवावा लागतो. पण तो योग्य प्रकारे ठेवला जात नाही असा तो प्रकार होता. तेव्हा त्यांची ती बाजू देखील ऐकून घेतली पाहिजे. आणि त्यांच्या तपासणीचे रेकॉर्ड चांगल्या प्रकारे मेंटेन केले जाईल हे पाहिले पाहिजे एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक अत्यंत चिंतनीय परिस्थिती या ठिकाणी औचित्त्याच्या मुद्याद्वारा मांडली आहे. स्त्रियांच्या लोकसंख्येमध्ये होणारी घट, भ्रूण हत्या याबाबतीत आरोग्य मंत्र्यांनी येथे निवेदन करावे आणि त्यात सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त आणि डॉ. दीपक सावंत यांनी दिलेली माहिती व सांगितलेली परिस्थिती या दोन्हींबाबत खुलासा व्हावा. तरी येथे उपस्थित मंत्र्यांनी आरोग्य मंत्र्यांना याबाबत सूचना द्यावी.

प्रा. वसंत पुरके : ठीक आहे.

( यानंतर श्री. सरफरे ....क्यू 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो. विधान भवनामधील दोन्ही उपहारगृहांमध्ये सध्या एवढी प्रचंड गर्दी असते. त्यामुळे आमदारांना बसण्याकरिता जागा मिळत नाही. तळमजल्यावर आमदारांकरिता नवीन उपहारगृह बांधण्यात आले आहे त्या उपहारगृहामध्ये आमदारांव्यतिरिक्त इतर लोकांची जास्त गर्दी असते. त्याचबरोबर या उपहारगृहामध्ये पुरविण्यात येणाऱ्या पदार्थांचा दर्जा अतिशय खराब असतो. खायला देण्यात आलेली मैद्याची पोळी जर झटकली तर खाली पीठ पडते. सभापती महोदय, "मिड-डे" या वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे की, ग्रीन व्हेजिटेबल आणि सूप यांचा आहारामध्ये समावेश नसेल तर भविष्य काळात माणसाला वेगवेगळे 10 रोग होण्याचा संभव जास्त असतो. त्यामध्ये ओबेसिटी, किडनीचे आजार, डायबेटीज, ब्लड प्रेशर, कॅन्सर, प्रिमॅच्युअर एजिंग, हार्ट ट्रबल इत्यादी आजार होण्याचा संभव जास्त असतो. सभापती महोदय, हा "मिड-डे" चा अंक आपणास सादर करतो. उपहारगृहामध्ये आमदारांना जर चांगले जेवण मिळाले तर सकाळी 10 वाजल्यापासून रात्री 10 वाजेपर्यंत सभागृहामध्ये काम करण्याची आमची तयारी आहे. आपल्या सहयोगाने आम्ही युरोपच्या दौऱ्यावर गेलो होतो. त्याठिकाणी जेवणाची व्यवस्था अतिशय उत्तम प्रकारची होती. त्यामध्ये ग्रीन व्हेजिटेबल आणि सूप दिले जात होते. आमदारांकरिता करण्यात आलेल्या व्यवस्थेच्या ठिकाणी अन्य कुणालाही प्रवेश देण्यात येत नव्हता. तेव्हा विधान भवनमधील तळमजल्यावरील उपहारगृहामध्ये आमदारांव्यतिरिक्त इतरांना प्रवेश निषिध्द करण्यात यावा. त्यामुळे आमदारांना डिग्निटी आणि स्टेटस मिळेल. आज या दोन्ही उपहारगृहामध्ये कुणीही प्रवेश करीत असल्यामुळे आमदारांना जेवण मिळत नाही. कुणीही प्रवेश करीत असल्यामुळे तेथील व्यवस्थेचे पूर्णपणे वाटोळे झाले आहे. त्यादृष्टीने आपण निश्चितपणे कारवाई करावी. आणि पुढील अधिवेशनापूर्वी याबाबत चांगला परिणाम झालेला आम्हाला बघावयास मिळावा अशी आपणास विनंती आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दयाला माझे समर्थन आहे. विधान भवनमधील उपहार गृहामध्ये आणि आमदार निवास येथील उपहारगृहामध्ये मिळणाऱ्या पदार्थांचा दर्जा चांगला नसतो. या संदर्भात ज्यावेळी वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून येते त्यावेळी महाराष्ट्रातील जनतेला वाटते की, आमदारांची ही अवस्था आहे तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

गोरगरीब जनतेची काय स्थिती होत असेल. तेव्हा उपहारगृहामध्ये आमदारांना चांगल्या दर्जाचे जेवण मिळण्याबाबत आपण लक्ष द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आमदार निवासातील उपहारगृहासंबंधी मी माहिती घेतली असता चारही आमदार निवासातील उपहारगृहाचा ठेका एकाच ठेकेदाराकडे देण्यात आला असल्याचे समजते. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये गव्हाचे मोठया प्रमाणावर उत्पादन होत असतांना आम्हाला या उपहारगृहामध्ये गव्हाच्या चांगल्या चपात्या मिळत नाहीत. एवढेच नव्हेतर आम्हाला ज्वारीची भाकरी सुध्दा मिळत नाही. त्यादृष्टीने या उपहारगृहामध्ये व्यवस्था झाली पाहिजे अशी माझी सूचना आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आमदार निवास उपहारगृहामध्ये नवीन सिंधी कॉट्रॅक्टर नेमण्यात आला असून तो धारवाड येथील आहे. त्याला यापूर्वी कोकण रेल्वेमध्ये कॉट्रॅक्ट देण्यात आले होते. कोकण रेल्वेमध्ये अतिशय निकृष्ट दर्जाचे जेवण मिळते हे कोकणातील सर्व आमदारांना माहीत आहे. त्यादृष्टीने चारही आमदार निवास उपहारगृहांमध्ये आमदारांकरिता जेवणाची व्यवस्था चांगल्या दर्जाची असावी अशी माझी सूचना आहे.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी माननीय सदस्यांकरिता असलेल्या उपहारगृहासंबंधी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला. तळमजल्यावरील व दुसऱ्या मजल्यावरील दोन्ही उपहारगृहे मंत्रालयातील चौरस आहार उपहारगृहामार्फत चालविली जातात. या उपहारगृहामधील खाद्य पदार्थांचा दर्जा चांगला कसा राहील या अनुषंगाने मी स्वत: प्रयत्न करीन. त्याकरिता माननीय विरोधी पक्षनेत्यांसह सभागृहातील काही माननीय सदस्यांना मी चर्चेकरिता माझ्याकडे बोलावून घेईन. तळमजल्यावरील उपहारगृहामध्ये आमदारांव्यतिरिक्त इतर लोकांची गर्दी होता कामा नये. याबाबतीत लोकसभेचा अनुभव असा आहे की, राज्यातील खासदारांना भेटण्याकरिता तेथील सेंट्रल हॉलमध्ये त्या त्या राज्यातील आमदार आणि माजी खासदारांना प्रवेश मिळतो. लोकसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये इतर वेळी अत्यंत महत्वाच्या बैठका होतात. त्याचबरोबर खासदारांना चांगल्या दर्जाचे जेवण दिले जाते. त्याप्रमाणे विधान भवनमधील सेंट्रल हॉलमध्ये व्यवस्था करता येईल काय, ही बाब तपासून घेण्याचे मी ठरविले आहे. त्या अनुषंगाने मी विचार करीत असून त्याबाबत अजून निर्णयापर्यंत पोहोचलो नाही. तळमजल्यावरील उपहारगृहामध्ये आमदारांव्यतिरिक्त इतरांना प्रवेश देण्यास आपण निर्बंध घातले तर आमदारांसमवेत आलेल्या चार लोकांना बाहेर ठेवावे लागेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. सभापती...**

आणि हे करणे शक्य होईल असे वाटत नाही. परंतु विधान भवनमधील सेंट्रल हॉलमध्ये तशाप्रकारची व्यवस्था करणे शक्य आहे. त्यादृष्टीने जरुर पुढील आठवडयामध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांबरोबर अन्य काही माननीय सदस्यांना माझ्याकडे चर्चेकरिता बोलावून घेण्यात येईल. त्यावेळी आमदारांना दिल्या जाणाऱ्या जेवणाऱ्या दर्जाविषयी देखील चर्चा करण्यात येईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझी एक नम्र सूचना आहे. दिल्लीमध्ये लोकसभा आणि राज्यसभा याच्यामधे सेंट्रल हॉल आहे. त्या ठिकाणी दोन्ही सभागृहाचे सदस्य येऊन बसतात आणि सर्वसाधारणपणे राजकारणची चर्चा करतात. त्याचबरोबर त्या ठिकाणच्या कॅन्टीचेही पदार्थही ते घेतात. त्या ठिकाणी राजकीय देवाण-घेवाण होत असते. आपल्या सेंट्रल हॉलचा तसा उपयोग करण्याबाबतची आपली सूचना योग्य आहे.

**सभापती** : यावर गांभीर्याने विचार केला जाईल. कॅन्टीनमधील पदार्थांच्या गुणवत्तेच्या दृष्टीने देखील मी स्वत: लक्ष देईन.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्यादृष्टीने महत्वाचा प्रश्नाच्या संबंधात औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशनच्या वतीने महाराष्ट्रातील हजारो शेतकऱ्यांनी आज आझाद मैदानावर शेतकऱ्यांचे आदरणीय नेते प्रा.एन. डी. पाटील साहेब आणि शेतकऱ्यांचे तारणहार श्री.नागनाथअण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू केलेले आहे. अनेक वर्षे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वीज दरवाढीचा फटका बसत आहे. त्याचबरोबर गेल्या काही वर्षामध्ये विजेच्या भार नियमनामुळे शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झालेले आहे. शेतकऱ्यांनी लक्षावधी रुपये खर्च करून सहकारी शेती पाणीपुरवठा संस्था निर्माण करून उपसा सिंचन योजना सुरु केलेल्या आहेत. पण आता बारा-बारा, चौदा-चौदा तास विजचे भार नियमन केले जात असल्यामुळे शेतीला पाणीपुरवठा होऊ शकत नाही. त्यामुळे पिके वाळत चाललेली आहेत. सध्या जे विजेचे भार नियमन केले जात आहे त्या संदर्भात महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशनने आजचे आंदोलन सुरू केलेले आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या विजेच्या बिलांची पोकळ थकबाकी वर्षानुवर्षे दाखविली जात आहेत. ही थकबाकी कमी करावी. त्याचबरोबर कृषी संजीवनी योजनेस पुन्हा मुदतवाढ देण्यात यावी. तसेच सरकारी पाणीपट्टीमध्ये 1999 साली वाढ केलेली होती ती वाढ रद्द करण्याबाबत माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी आश्वासन दिले होते, त्याप्रमाणे त्यांनी ती वाढ रद्द केली. आताही तशाच प्रकारचा निर्णय पाणीपट्टीच्या संबंधाने घ्यावा..

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, औचित्याचा मुद्दा हा एक-दीड मिनिटामध्ये मांडावयाचा असतो. आपण थोडक्यात सांगावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : या मागण्यांच्या संबंधात प्रतिसाद देण्याबाबत आपण माननीय मुख्यमंत्री महोदयांना, शासनाला निदेश द्यावेत.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महादयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी ऊर्जेच्या संबंधाने आणि पाटबंधाऱ्याच्याबाबतीत अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याबाबत संबंधित मंत्री महोदय निवेदन करतील.

डॉ.सुनील देशमुख : ठीक आहे.

--

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ KGS/

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**सभापती** : 93 च्या सूचनांच्या अगोदर आज आपल्यासमोर 260 अन्वेय दोन प्रस्ताव चर्चेसाठी आहेत. त्यापैकी काल मराठी भाषेच्या वापरासंबंधीचा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे व काल त्यांनी जवळपास अडीच तास भाषण केलेले आहे.त्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू करून पूर्ण करावयाची आहे तसेच त्यानंतर कोकणाच्या विकासासंबंधीचा प्रस्ताव चर्चेला घ्यावयाचा आहे. त्यामुळे मी सभागृहाच्या सहमतीने असे सांगू इच्छितो की, आजच्या दिवसाच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना 3 एप्रिल 2007 रोजी घेण्यात येतील. 3 एप्रिल रोजी ज्या लक्षवेधी सूचना या घ्यावयाच्या आहेत त्याच्या अगोदर आजच्या लक्षवेधी सूचना दाखविण्यात येतील.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आमच्या ज्या अर्धा-तास चर्चा होत्या त्या आज घेण्यात येतील असे पीठासीन अधिकाऱ्यांनी सांगितले होते. त्या अर्धा-तास चर्चा लॅप्स होणार आहेत की घेण्यात येणार आहेत ?

**सभापती** : आपण एकदा सकाळी लवकर विशेष बैठक घेऊन अर्धा-तास चर्चा घेतली होती तशा पध्दतीचा निर्णय घ्यावा लागेल. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एखादी चर्चा लॅप्स झाली तर सदस्यांना काय वेदना होतात याची मला कल्पना आहे. त्या चर्चा लॅप्स होणार नाहीत, त्यावर चर्चा होईल, एवढेच मी सदस्यांना सांगतो.

यानंतर श्री.शिगम....+

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये सूचना**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. श्रीकांत जोशी, नितीन गडकरी व पाशा पटेल, वि.प.स.यांनी "महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभागातील पदवीधर सहाय्यक अभियंता, श्रेणी-2 यांची मागील आठ वर्षापासून एकही पदोन्नती न झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व पाशा पटेल, वि.प.स. यांनी "पिंपळगावराजा येथील जिल्हा परिषद हायस्कूल केंद्राच्या 14 व ऊर्दू पूर्व माध्यमिक जिल्हा परिषद शाळेच्या 12 खोल्या अशा एकूण 26 खोल्या शालांत परीक्षेसाठी असतानाही पिंपळगावराजा येथे शालांत परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांची व्यवस्था न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी "ठाणे जिल्ह्यातील 13 तालुक्यातील बहुसंख्य भागात राहात असलेल्या आदिवासी समाजातील लोकांच्या विकासासाठी गेल्या 5 वर्षात कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात येऊनही 10 हजार बालके कुपोषित असल्याचे आढळून आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी, वि.प.स. यांनी "भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371(2)मध्ये दिलेल्या शक्तीचा वापर करुन माननीय राज्यपालांनी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांतर्गत पाटबंधारे विकास क्षेत्रासाठी निधीचे समनिहाय वाटप करण्याच्या दृष्टीने दिनांक 15.12.2001 रोजी निर्गमित केलेले निदेश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण शासनास निवेदन करण्यास सांगितलेले आहे. परंतु यासंबंधी दोन मिनिटांमध्ये माझे म्हणणे मांडण्यास मला परवानगी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : नियम 93 अन्वेच्या सूचनांवरील निर्णय दिल्यानंतर सन्माननीय सदस्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यास मी संधी देईन.

सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील व सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी "सांगली-मिरज परिसरातील आर्थिकदृष्टया डबघाईला आलेल्या काही सहकारी बँका व पतसंस्थांमध्ये सुरु असलेला भ्रष्ट कारभार व नियमबाह्य कर्ज वितरक आणि संचालकांकडून संस्थेच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करण्यासाठी होत असलेली टाळाटाळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

आता सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. नियम 93 अन्वये सूचना देण्याच्या बाबतीत "रिसेण्ट ऑकरन्स" हा क्रायटेरिया आहे. याबाबतीत रिसेण्ट ऑकरन्स असा आहे की, दिनांक 13 मार्चला शासनाने एक शासन निर्णय काढलेला आहे. सदरहू शासन निर्णय आम्हाला काल-परवा मिळाला. शासन निर्णय सन्माननीय सदस्यांना मिळण्याची व्यवस्था नसते. परंतु आम्हाला असे कळले की, तेथे काही तरी विस्तव पेटलेला आहे. यामध्ये अर्जन्सी अशी आहे की, महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाड्याच्या बाबतीत अत्यंत विचित्र अशा प्रकारची स्थिती निर्माण झालेली आहे. सूचनेमध्ये असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, कायद्यामध्ये स्पष्ट तरतूद आहे. प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार त्या महामंडळांना राहातील. शासनाने काल-परवा जी.आर. काढलेला आहे. विदर्भ आणि मराठवाड्याच्या लोकमानसावर तीव्र आघात करणारा हा विषय आहे. सन्माननीय पाटबंधारे मंत्र्यांनी आणि सन्माननीय वित्त मंत्र्यांनी सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनाशी संपूर्णपणे विसंगत, माननीय राष्ट्रपतींच्या आदेशांची अवहेलना करणारा, माननीय राज्यपालांचे निदेश पायाखाली तुडविणारा आणि या राज्याच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने मान्य केलेल्या कायद्याचा सरळ सरळ भंग करणारा हा शासन निर्णय आहे. सभापती महोदय, आपण शासनास निवेदन करण्याचे आदेश दिले त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. परंतु

..3..



MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. किल्लेदार 12:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख...)

आपणास आग्रह आहे की, सर्व गोष्टी या ठिकाणी आहेत. त्यामुळे आजच्या आज यासंबंधीचे निवेदन झाले पाहिजे. सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये अतिशय वाईट प्रतिक्रिया उमटलेल्या आहेत. अशा प्रकारे हुकूमशाही आणि गुलामगिरीसारखी वागणूक दिली जाणे योग्य नाही. म्हणून सभापती महोदय, शासनाला आजच्या आज निवेदन करण्याचे निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपणाकडे संरक्षण मागतो. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी बिल पास करुन त्याचे कायद्यामध्ये रुपांतर केलेले आहे. त्यानुसार विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रकल्पांना मान्यता देण्याचे अधिकार हे त्या त्या विभागातील कॉम्पिटण्ट ॲथॉरिटीला देण्यात आलेले आहेत. घटनेच्या अनुच्छेद 372(2)(8) नुसार माननीय राज्यपालांनी डायरेक्शन्स देऊन महामंडळांना अधिकार दिलेले आहेत. सभापती महोदय, विधिमंडळाने पास केलेल्या कायद्याचे हे शासन पालन करीत नाही, माननीय राज्यपालांच्या निर्देशांचे पालन करीत नाही. उलट दिनांक 13 मार्चला जी.आर.काढून सगळे अधिकार वित्त विभागाकडे घेण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. हे कृत्य पूर्णपणे गैरसंविधानिक आहे, गैरकायदेशीर आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहानी कायदा केलेला आहे. या कायद्याला जी.आर.ने छेद देता येत नाही. कायद्याला जी.आर.ने छेद देणे हे असंविधानिक आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

या संदर्भात आपण शासनाला तातडीने खुलासा करण्यास सांगावे. यावेळी विदर्भाकरिता, मराठवाड्याकरिता आणि कोकणाकरिता पैसा मिळाला, तो खर्च होऊ नये अशी भावना त्यामागे आहे का? असा संशय निर्माण होत आहे. त्यामुळे ताबडतोबीने सभागृहाचे कामकाज स्थगित करुन शासनाला खुलासा करण्यास सांगावे. आमच्या अस्तित्वाचा आणि अस्मितेचा प्रश्न आहे. सगळ्या गोष्टी तयार आहेत. फक्त शासनाने खुलासा करावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 93 अन्वये जी सूचना देण्यात आली ती सूचना देण्याचा उद्देश एकच आहे, तो म्हणजे सन 2005-06, 2006-07 वर्षांमध्ये विदर्भासाठी जो निधी दिला गेला त्या निधीचे योग्यप्रकारे नियोजन झाले नाही, निधी खर्च झाला नाही. यावर्षी सन 2007-08 च्या बजेटमध्ये 1898 कोटी रुपयांचा निधी विदर्भासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. मराठवाड्यासाठी सुध्दा निधी उपलब्ध करुन दिला आहे. अमरावती विभागासाठी 1526 कोटी रुपयांची तरतूद होणार आहे. निधी जरुर दिला आहे. परंतु असे करीत असताना त्यामध्ये एक मेख मारुन ठेवली आहे. जे नवीन प्रकल्प असतील त्या नवीन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देताना 13 मार्चच्या ज्या जी.आर.चा उल्लेख सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी केला, त्या जी.आर.मध्ये सुरुवातीला असे सांगण्यात आले आहे की, अधिकार आम्ही त्या त्या विभागाला देत आहोत. परंतु शेवटच्या वाक्यात असे म्हटले आहे की, प्रशासकीय मान्यता देत असताना वित्त व नियोजन विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. म्हणजे त्या जी.आर.ला काही अर्थ उरलेला नाही. म्हणून या संदर्भात विदर्भ, मराठवाड्यातील जनतेच्या दृष्टीने स्पष्ट खुलासा झाला पाहिजे. आजच्या आज या संदर्भात शासनाने निवेदन केले पाहिजे अशाप्रकारची मी मागणी करतो.

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदय, घटनेच्या कलम 371(2) च्या अनुषंगाने जी शासनाची सविस्तर भूमिका आहे, विदर्भ आणि मराठवाड्यात जो अनुशेष असणारा भाग आहे..........

श्री.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, आपण निर्णय देण्यापूर्वी मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, सन 2007-08 या वर्षाकरिता जी रु.4051.16 कोटीची तरतूद करण्यात आली आहे त्यामध्ये उर्वरित महाराष्ट्राकरिता रु.871.13 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या निधीमध्ये कोकणासाठी किती रक्कम ठेवण्यात आली आहे याची सुध्दा सविस्तर माहिती देण्यात आली पाहिजे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**The Chairman :** Rest of Maharashtra includes Konkan as on today.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, 871 कोटी रुपयांची विगतवारी करताना त्यामध्ये कोकणासाठी किती निधी देण्यात आला आहे याची माहिती कळली पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय नियोजन व अर्थमंत्री आणि जलसंपदा मंत्री यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, घटनेच्या कलम 371(2) च्या अनुषंगाने सभागृहात चर्चेची संधी आपल्याला लाभली आहे. या अनुषंगाने सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी आज सायंकाळपर्यंत या प्रश्नासंबंधी शासनाने सविस्तर निवेदन करावे अशी इच्छा व्यक्त केली आहे. शासनाकडून आज निवेदन करण्यात येईल का?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, किमान दोन दिवसांचा अवधी देण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मंगळवार, दिनांक 3 एप्रिल, 2007 रोजी या नियम 93 च्या सूचनेसंबंधी शासनाने सविस्तर निवेदन करावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहाने बिल मंजूर केले. हे सभागृह कायदेमंडळ आहे. सभागृहामध्ये मंजूर केलेल्या कायद्याला जी.आर.काढून सुधारणा करता येते का? आपल्या दालनामध्ये या विषयाबाबत बैठक झाली होती. माननीय राज्यपालांचे निर्देश हे ॲडव्हायझरी आहेत की मॅण्डेटरी आहेत? माननीय राज्यपालांच्या यावेळच्या निर्देशात ते आलेले आहे. त्या विरुध्द जाऊन शासनाने भूमिका घेतली आहे. असे का चालू देत आहात?

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, बाहेरुन माहिती मागवावयास वेळ लागेल असे असते तर ती गोष्ट वेगळी आहे. आपली जर खात्री झाली की, हा प्रश्न राज्यातील प्रादेशिक असमतोलाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे तर आपण योग्य तो निर्णय घ्यावा. कायद्याचा नंबर, कायद्यातील तरतूद आम्ही आमच्या सूचनेमधील निवेदनात कोट केलेली आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख....

सभापती महोदय, आपली जर खात्री झाली तर आपण त्यासंदर्भात शासनाला न विचारता आदेश दिले पाहिजेत. प्रशासनाला आदेश द्या असे मी आपल्याला सांगत नाही. माझे म्हणणे असे आहे की, कायद्याचे पुस्तक सभागृहात उपलब्ध आहे, 13 मार्च रोजीचा शासन निर्णय आपल्याकडे उपलब्ध आहे. आता फक्त आपली खात्री व्हावयाला पाहिजे की, महाराष्ट्राच्या प्रादेशिक असमतोलाच्या दृष्टीने अत्यंत घृणास्पद गोष्ट या ठिकाणी झालेली आहे. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांना आजच्या आज निवेदन करण्याच्या संदर्भात आपण आदेश द्यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : जसे मी या विषयाच्या संदर्भातील आपले विचार ऐकले तसेच या ठिकाणी वित्त विभागाचे मंत्री सुध्दा उपस्थित आहेत त्यामुळे त्यांनाही याबाबतीत औपचारिकपणे विचारणे गरजेचे आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी जे वक्तव्य केले आहे त्यात मला थोडी दुरुस्ती करावयाची आहे. आपण मंत्रिमंडळाकडून किंवा शासनाकडून कोणतीही ॲडिशनल माहिती मागवत नाही. हे सभागृह भारतीय घटनेप्रमाणे चालावण्याची जबाबदारी आपली आहे. आपण या सार्वभौम सभागृहाचे माननीय सभापती आहात. या सभागृहात आपल्या मार्गदर्शनाखाली आम्ही बील मंजूर केलेले आहे. या बिलाची प्रत सुध्दा आमच्याकडे आहे. बिलास जी.आर.ने सुधारणा केल्याची प्रत सुध्दा आता आमच्याजवळ आहे. सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा, कोकण या रिजनच्या कॉम्पीटन्ट ॲथोरिटीला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार त्वरित देण्यात यावेत असा माननीय राज्यपाल महोदयांचा आदेश आहे परंतु शासन चार वर्षापासून हा आदेश पाळत नाही. यासंदर्भात ॲडव्होकेट जनरलची मिटिंग आपल्या चेंबरमध्ये झाली होती त्याचे रेकॉर्ड सुध्दा आपल्याकडे आहेत. शेवटी आम्हाला न्याय देणे ही आपली जबाबदारी आहे. सरकारने काम कायद्याप्रमाणे करावे असे आपण शासनाला सांगावे. हे शासन गैरपध्दतीने काम करीत आहे त्यामुळे या ठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदय काय उत्तर देणार आहेत ? नाही तर आम्ही जे म्हणत आहोत ते चुकीचे आहे असे आपण सांगा. कायद्याचा प्रश्न, संविधानाचा प्रश्न, सभागृहाच्या नियमांचा प्रश्न आम्ही आपल्याला विचारलेला आहे. कायदा

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

धाब्यावर बसविला जात असतांना, माननीय राज्यपाल महोदयांचे निर्देश धाब्यावर बसवले जात असतांना, घटनेला धाब्यावर बसवले जात असतांना , कॅबिनेटला धाब्यावर बसविले जात असतांना , आपण मंत्रीमहोदयांना निवेदन करण्यास एवढा अवधी का देत आहात? यासंदर्भात 10 मंत्र्यांनी माननीय राज्यपालांकडे जाऊन पत्र दिले असे असतांनाही माननीय मंत्री महोदय, मंगळवारी निवेदन कसे काय करु शकतात? त्यामुळे यासंदर्भात आपण निर्णय द्यावा व यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांना त्वरित खुलासा करावयास सांगावा अशी विनंती आहे.

**सभापती** : या प्रश्नाच्या अनुषंगाने आपल्या सर्वांचे जे विचार आहेत, जी मते आहेत ती मी ऐकलेली आहेत. याबाबतीत यापूर्वी अनेक वेळा या सदनामध्ये, या मूलभूत प्रश्नावर आपण सातत्याने चर्चा केलेली आहे. त्या अनुषंगाने मी संबंधित मंत्र्यांना एवढेच विचारले की, आज या विषयाच्या संदर्भात सविस्तर निवेदन करणे आपल्याला शक्य आहे काय? याचा अर्थ ते सांगतील त्यावर मी अवलंबून आहे, असे नाही. संसदीय पध्दतीमध्ये ज्यावेळेस विरोधी पक्षाकडून काही विषय मांडले जातात त्यावेळेला त्याच्याशी संबंधित असणारे मंत्री त्वरित माहिती देऊ शकतील काय हे विचारणे आवश्यक आहे. या निवेदनाच्या संदर्भात वित्तराज्यमंत्र्यांचे काय म्हणणे आहे?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, याबाबतीत मी 3 तारखेला सविस्तर निवेदन करीन.

**सभापती** : या विषयाच्या संदर्भातील सविस्तर निवेदन आज करणे शक्य होणार नाही काय?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, आज या विषयाच्या संदर्भात निवेदन करणे शक्य होणार नसल्यामुळे, यासंदर्भातील सविस्तर निवेदन 3 तारखेला करण्यात येईल.

**सभापती** : या विषयाच्या संदर्भातील निवेदन शासनाने 3 तारखेला करावे असे मी या संदर्भात रुलींग देत आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात कायद्याचा नंबर, कायद्याची तरतूद तसेच इतर सर्व माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे मी शांतपणे ऐकलेले आहे. शासनाचे याबाबतीत काय म्हणणे आहे असे शासनाला विचारणे हे सुध्दा माझे कर्तव्य आहे. त्याप्रमाणे संबंधित मंत्री महोदयांकडे मी विचारणा केली व त्यानंतर मी निर्णय दिलेला आहे. ....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यासंदर्भात आपल्याकडे सर्व माहिती उपलब्ध आहे. ही सर्व माहिती आम्ही आपणास दाखववावयास तयार आहोत. यासंदर्भात जी.आर. कसा काढलेला आहे तो आपण बघावा अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यापूर्वी सुध्दा या विषयावर येथे अनेकवेळा चर्चा झालेली आहे. माझ्या दालनात देखील चर्चा झालेली आहे. किंबहुना........

( काही सन्माननीय सदस्य आपापली जागा सोडून पुढे येतात )

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण 13 मार्च रोजीचा जी.आर. पहावा....

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांना दिनांक 3 एप्रिल रोजी निवेदन करण्यास सांगितलेले आहे. त्यांच्याकडून निवेदन आल्यानंतर आपण चर्चा करु. मी पुन: एकदा शासनास निदेश देत आहे की, या संदर्भात दिनांक 3 एप्रिल रोजी सविस्तर निवेदन करावे. तसेच जो जी.आर.काढण्यात आलेला आहे तो स्थगित करता येईल का याबाबत पहावे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : मी या संदर्भात निर्णय दिलेला आहे. मी मंत्रिमहोदयांना सविस्तर निवेदन करण्यासाठी 3 एप्रिलपर्यंत मुदत दिलेली आहे. 371 (2) च्या अनुषंगाने माननीय मंत्रिमहोदय दिनांक 3 एप्रिल रोजी सविस्तर निवेदन करतील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण आमच्यावर सरळ सरळ अन्याय करीत आहात. आपण दिनांक 13 मार्च रोजीचा जी.आर.पहावा. कायद्याच्या विरुध्द त्यांना असे वागता येईल काय ?

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : मी माझा निर्णय कायम ठेवून सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.47 वाजता 10 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**<u>( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री.भास्कर जाधव )</u>**

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 12.58 मिनिटांनी, 15 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

--------

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती, श्री.भास्कर जाधव)**

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 1 वाजून 14 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

-------------

यानंतर कुमारी धनश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्कर जाधव )**

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**तालिका सभापती** (श्री. भास्कर जाधव ) : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 2.00 वाजेपर्यंत तहकूब करीत आहे.

सभागृहाची बैठक 1वाजून 25 मिनिटांनी, 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.

यानंतर कु. जयश्री...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर )**

**सभापतीस्थानी : माननीय सभापती**

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, म.वि.प.नियम 93 अन्वये अतिशय महत्वाच्या कायद्याविषयी चर्चा सुरु करतांना मला असे सांगावयाचे आहे की, हा कायदा महाराष्ट्र राज्य, राजपत्र, पृष्ठ क्रमांक 293-316 मध्ये अंतर्भूत करण्यात आलेला आहे. सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 18 मध्ये खंड 11 च्या उपखंड "च" मध्ये हा कायदा दिलेला आहे. या कायद्याची प्रत आपल्यासमोर आहे. हा कायदा दिनांक 04 मे, 2005 रोजी महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्द झााला आहे. या कायद्यामध्ये अशी स्पष्ट तरतूद आहे की, **कोर्ट, हायकोर्टाने** विदर्भ, मराठवाडयातील पाटबंधारे व तत्सम प्रकल्पांना प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित पाटबंधारे विभागाकडे राहतील. कायद्यात ही तरतूद असतांना आम्हा सर्व लोकांच्या मनामध्ये अशी भावना निर्माण झाली आहे की, कायद्यात तरतूद असतांना त्या तरतुदीच्या विरोधात जाऊन दिनांक 29 नोव्हेंबर 2006 च्या शासन निर्णयापासून 13 मार्च, 2007 च्या शासन निर्णयापर्यन्त जे जे शासन निर्णय काढले आहेत ते कायद्यातील तरतुदींशी विसंगत आहेत व ते गळचेपी करणारे आहेत. आमचे असे म्हणणे आहे की, यासंदर्भात माननीय राज्यपालांचे जे निदेश आहेत, जी कॉन्स्टिटयूशनल प्रोव्हिजन आहे, त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. या शासन निर्णयाच्या बाबतीत असे सांगावयाचे आहे की, दोन्ही सभागृहांनी एकमताने कायदा संमत केला आहे आणि त्यास माननीय राज्यपालांची संमती देखील मिळाली आहे. तेव्हा या कायद्याची अंमलबजावणी करणे शासनावर बंधनकारक आहे. कायद्यातील तरतुदींच्या विरोधात काढण्यात आलेले हे चार-पाच शासन निर्णय रद्द करुन माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार व कायद्यातील तरतुदीनुसार, कायद्याची अंमलबजावणी करणारे शासन निर्णय निर्गमित करुन ते येत्या दोन-तीन दिवसांमध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवावेत, असे निदेश आपण शासनाला द्यावेत, अशी मी आपल्याला विनंती करतो. असे केल्याने प्रादेशिक असमतोलाच्या इतिहासामध्ये हा एक लॅण्डमार्क होईल. कायद्यात तरतूद असतांना सुध्दा त्याची अंमलबाजावणी होत नाही. या कायद्याचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे व ते व्हावे, अशी मी आपल्याला नम्रपणे विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाच्या विरोधात व कायद्यातील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KTG/ KGS/ 14:00

प्रा.बी.टी.देशमुख.....

तरतुदींच्या विरोधात असलेले हे चार-पाच शासन निर्णय निदान विदर्भ, मराठवाडयासाठी तरी रद्द करावेत व आता पुढील दोन-तीन दिवस कार्यालयीन सुटी असल्यामुळे शासनाने याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवावी, अशा प्रकारची मी विनंती करतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या कायद्यात दुरुस्ती होत असतांना किंवा त्याचे वर्डिंग करीत असतांना त्यामध्ये काही त्रूटी राहू नयेत याकरिता मी विंनती करतो की, माननीय राज्यपालांनी विभागीय मंडळांना अधिकार देण्याचे जे निदेश दिलेले आहेत, ते राज्य शासनावर बंधनकारक आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .........

तसेच, दोन्ही सभागृहांनी संमत केलेला कायदा राज्य सरकारवर बंधनकारक आहे. माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश, सभागृहाने संमत केलेल्या कायद्यातील तरतुदी व शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयांमध्ये तफावत असल्याने हे शासन निर्णय रद्द करावेत व यासंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती येत्या तीन-चार दिवसामध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवावी, अशी माझी विनंती आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र या भागातील अनुशेष दूर करण्यासाठी जी विशेष तरतूद करण्यात आलेली आहे, त्यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला आहे. विशेषत: या भागात सिंचनाचा अनुशेष आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशाची अंमलबजावणी करीत असतांना शासनाने यापूर्वी जे शासन निर्णय काढलेले आहेत त्यामध्ये तफावत आहे. यामुळे जो कायदा सभागृहामध्ये संमत झाला आहे, त्यानुसार शासन निर्णय असावयास हवेत. परंतु जे शासन निर्णय काढण्यात आले आहेत त्या शासन निर्णयाचा आणि सभागृहाने संमत केलेल्या कायद्याचा काहीही संबंध नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कायद्यानुसार शासन निर्णय काढला तर त्यातील तफावत दूर होईल. सन्माननीय सदस्यांनी कायद्याप्रमाणे तरतूद व्हावी अशी जी सूचना केलेली आहे, त्या सूचनेला मी अनुमोदन देतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी नियम 93 अन्वये सूचना मांडलेली आहे. दिनांक 31 मार्च रोजी जो शासन निर्णय काढलेला आहे त्यातील शेवटच्या परिच्छेदामध्ये असे नमूद केलेले आहे की, "..असे असतांना प्रकल्पाला मंजुरी घेत असतांना नियोजन विभाग आणि वित्त विभाग यांची पूर्व परवानगी घेऊन प्रशासकीय मान्यता द्यावी." ही मूळ मेख आहे व हे दाखविण्याचा सन्माननीय सदस्यांचा उद्देश आहे. कायद्यानुसार हे वाक्य वगळले तरच विदर्भाला न्याय मिळू शकतो, त्याप्रमाणे आपण निदेश द्यावे, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाचे तंतोतंत पालन होईल. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी जो कायदा पास केला आहे त्याच्या विरोधात कोणताही शासन निर्णय काढण्यात आला असेल, मग तो 31 मार्चचा शासन निर्णय असेल किंवा पूर्वीचा शासन निर्णय असेल हे सर्व शासन निर्णय तीन दिवसाच्या आत रद्द करण्यात येतील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याबाबत अतिशय महत्वाची कामगिरी सभागृहात झ ाालेली आहे. सभापती महोदय, याबाबतचे शासकीय आदेश तीन-चार दिवसात सभागृहाच्या पटलावर ठेवावेत असे आपण आदेश द्यावेत, अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सभापती** : सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या नेत्यांना माझ्या दालनात बोलावून मी चर्चा केलेली आहे. त्या चर्चेला सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी उपस्थित होते. घटनेच्या कलम 371(2) प्रमाणे माननीय राज्यपालांनी निदेश दिलेले आहेत. माननीय राज्यपालांच्या निदेशाच्या अनुषंगाने दोन्ही सभागृहामध्ये कायदा पास झालेला आहे. सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.18 च्या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राचे जे प्राधिकरण आहे त्या ठिकाणचे कामकाज या कायद्याच्या अनुषंगाने बंधनकारक राहील. दिनांक 13 मार्चचा शासन निर्णय असेल किंवा अन्य शासन निर्णय असतील ते शासन निर्णय सभागृहामध्ये चर्चा झाल्याप्रमाणे रद्द होतील. याबाबतची कार्यवाही तीन-चार दिवसामध्ये पूर्ण करावी आणि शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी सभागृहाचा आणि आपला आभारी आहे.

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य केल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण स्वत: या विषयावर दालनात चर्चा करण्यासाठी वेळ दिला आहे, मागास भागाला न्याय मिळवून दिल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. सभागृहाचे नेते उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील, अर्थराज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांना व सरकारला धन्यवाद देतो. आमच्याकडून काही चुका झाल्या असतील तर त्या माफ करण्याचे मोठेपण आपण दाखववावे, अशी विनंती करतो. धन्यवाद.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वरील विषयावरील चर्चेत पाऊण तास गेला आहे. म्हणून माझी विनंती आहे की, काल ठरल्याप्रमाणे आता टॅक्सेशनचे बील चर्चेला घेण्यात यावे, तसेच मराठी भाषेसंबंधीचा व कोकणासंबंधीचा असे दोन प्रस्ताव आपल्या समोर चर्चेला आहेत, या प्रस्तावांना न्याय मिळाला पाहिजे, त्यामुळे आजचे इतर कामकाज 3 तारखेला घेण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, आज टॅक्सेशनचे विधेयक मंजूर होणे आवश्यक आहे. आज विधानसभेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर विधान परिषदेच्या सभागृहात मांडण्याची परवानगी प्रस्तावावरील चर्चेदरम्यान देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

**सभापती** : मी माननीय अर्थराज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांना सांगू इच्छितो की, आज टॅक्सेशनचे विधेयक विधानसभेने मंजूर केल्यानंतर विधान परिषदेच्या सभागृहात मांडण्याची आपणास प्रस्तावावरील चर्चेदरम्यान परवानगी देण्यात येईल. नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेसाठी 2 तास 30 मिनिटे वेळ निश्चित केला होता. परंतु या प्रस्तावावर श्री.दिवाकर रावते यांनी 2 तास 50 मिनिटे भाषण केलेले आहे. आता या प्रस्तावावरील चर्चा उत्तरासह 4.00 वाजेपर्यंत संपली पाहिजे. दुपारी 4 नंतर कोकणच्या प्रस्तावावर चर्चा सुरु करण्यात येईल.

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KTG/ KGS/

**पृ.शी.**: राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणे.

**मु.शी.**: राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणेबाबत सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.मधुकर चव्हाण, श्री.अरविंद सावंत, श्री.संजय केळकर, डॉ.नीलम गो-हे, श्री.रामनाथ मोते, श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबई हायकोर्टाच्या नावाबाबत माझा मुद्दा आहे. आजही मुंबई हायकोर्टास "बॉम्बे हायकोर्ट" असेच नाव आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी मी श्री.डोणगावकर, सचिव, विधी व न्याय विभाग यांना पत्र लिहिले होते, तसेच मुख्यमंत्री महोदयांनाही पत्र लिहिले होते.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

विधी सचिव श्री.डोणगावकर यांना मी जे पत्र लिहिले होते त्याच्या उत्तरात श्री.डोणगावकर यांनी म्हटले आहे की, "वरील विषयावरील माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना उद्देशून लिहिलेले आपले दिनांक 8 ऑगस्ट 2005 चे पत्र कृपया पहावे. सदर पत्रास अनुलक्षून आपणास कळविण्यात येते की, 'बॉम्बे हायकोर्टाचे नाव मुंबई हायकोर्ट' असे बदलण्याबाबतच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने ना हरकत दर्शविली आहे व माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने केंद्र शासनास प्रकरण सादर करण्यात आले आहे." तेव्हा सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या प्रस्तावावरील आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये हा निर्णय केव्हा होईल, केंद्राकडून केव्हा याचे उत्तर अपेक्षित आहे याबाबत खुलासा करावा एवढीच अपेक्षा व्यक्त करून मी थांबतो. धन्यवाद.

*****

...... सीसी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपला प्रस्ताव मांडताना अतिशय विस्तृतपणे मराठी भाषेच्या वापरासंबंधातील शासनाचे वेगवेगळे आदेश वाचून दाखविले आहेत. त्याच्या खोलामध्ये मी जात नाही. मात्र या निमित्ताने कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांनी मध्यंतरी झालेल्या जागतिक मराठी परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी केलेल्या भाषणातील मराठी भाषेविषयीच्या आपल्या भावना व विचार व्यक्त करणारी वाक्ये मी आपल्याला येथे वाचून दाखवून मी माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, जागतिक मराठी परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी त्यांनी केलेले भाषण खरे तर या सभागृहाच्या पटलावर अधिकृतपणे येणे आवश्यक आहे म्हणून मी त्यातील काही वाक्ये, मजकूर येथे पुन्हा उद्‌घोषित करतो. सभापती महोदय, कविश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणतात .. " महाराष्ट्राच्या आणि मराठीच्या राजधानीत एक अपूर्व सोहळा संपन्न होत आहे. मायभाषेच्या हाकेला प्रतिसाद देऊन आपण अनेक राज्यांतून, अनेक देशांतून येथे आला आहात. ज्ञानेश्वर, एकनाथ हे तर मराठी मातीतच जन्मलेले. सातासमुद्रापलिकडून आलेल्या फादर स्टीफन्सननेही 'परिमळामाजी कस्तुरी' असे जिचे वर्णन केले आहे त्या मराठी माऊलीच्या आप्तस्पर्शासाठी, अनेक अडचणी ओलांडून आपण ही वाटचाल केली आहे. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो." सभापती महोदय, पुढे ते खंत व्यक्त करताना असे म्हणतात.. " आपण परप्रांतात, परदेशात राहत आहात. तेथील भाषांचा स्वीकार करणे, त्यात पारंगत होणे हे आपले कर्तव्यच आहे. पण ते बजावत असताही आपण आपल्या मायभाषेवरील प्रेम देवघरातील समईसारखे जागत ठेवले आहे. खेद या गोष्टीचा की, खुद्द महाराष्ट्रात मराठी भाषेची परिस्थिती शोचनीय आहे. मराठी भाषा समर्थ आहे, पण तिच्या सामर्थ्या संबंधी साशंक असलेली आम्ही तिची अपत्ये मात्र दुबळी आहोत. तेव्हा आमचे वैर कोणत्याही भाषेशी नाही आणि मावशीच्या मायेने आमचे पालन करणाऱ्या इंग्रजीशी तर नाहीच नाही. मावशी बाईने आता आईच्या घराचा कब्जा पुन्हा आईकडे द्यावा एवढीच आमची मागणी आहे. म्हणून आपल्यापुढे प्रश्न आहे तो इंग्रजीच्या बहिष्काराचा नाही तर मराठीच्या संरक्षणाचा आणि संवर्धनाचा." सभापती महोदय, त्याही पुढे जाऊन कविश्रेष्ठ म्हणतात की, "मुंबईमध्ये वावरताना मात्र हे शहर महाराष्ट्रात आहे की उत्तर प्रदेशात वा इंग्लंडमध्ये आहे असा संभ्रम निर्माण होतो. ही परिस्थिती बदलायची असेल तर शासनाने त्यासंबंधी निर्णय घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात

...... सीसी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

असलेल्या प्रत्येक व्यवहाराशी होणारा शासकीय आणि निमशासकीय संवाद मराठीतून झाला तरच ही परिस्थिती हलके हलके सुधारण्याची शक्यता आहे. या मराठीवरील लोकभाषा म्हणून सर्वात मोठे संकट आहे ते शिक्षणाच्या क्षेत्रात. .... इंग्रजी माध्यमाच्या, विशेषत: मिशनच्या शाळा हणजे जमिनीवर टेकायला पाय नाहीत आणि आकाशात झेपावयास पंख नाहीत अशा त्रिशंकूचे कारखाने झाल्या आहेत. कॅन्सरचा रोग चाहूल न लागू देता शरीरात शिरतो आणि ओळख न देता वाढत राहतो. शरीराचा नाश आवाक्यात आला की तो प्रगट होतो. सध्या गंभीरपणाने न जाणवणारी ही इंग्रजी माध्यमाची लाट देखील अशाच स्वरूपाची आहे. 50-60 वर्षांनंतर मराठीपण संपूर्णत: हरवलेला आणि सकस इंग्रजीकरणापर्यंत न पोहोचलेला असा एक अस्मिताहीन, बाजारातील समाज आपल्याला येथे निर्माण करावयाचा आहे का याचा विचार नेत्यांनी, विचारवंतांनी आणि मुख्यत: शासनाने प्रामुख्याने करणे आवश्यक आहे असे वाटते." सभापती महोदय, महाराष्ट्रातील अन्य भाषिकांसंबंधात ते आपल्या भाषणात असे म्हणतात की, ....

( यानंतर श्री. सरफरे .....डीडी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

महाराष्ट्रातील मुस्लिमांनाच उर्दू माध्यमाची गरज का वाटावी? इंग्रजी माध्यमाच्या लाटेत वाहत जाणाऱ्या पालक वर्गालाही दोष देता येणार नाही. इंग्रजीचा आश्रय घेतल्याशिवाय आपल्या वंशाचे दिवे लखलखणार नाहीत हा त्यांचा समज आपल्या भाषाविषयक धोरणांच्या गोंधळातून उत्पन्न झालेला आहे." सभापती महोदय, मराठी भाषेविषयी अतिशय उद्‌बोधक असे विचार कुसुमाग्रजांनी याठिक्‌णी मांडले आहेत. "इंग्रज गेले, पण इंग्रजी राहिली आहे. सर्व वरिष्ठ व्यवहारात आणि समाजाचे नेतृत्व करणाऱ्या वरिष्ठांच्या मनातही देहाला बांधणाऱ्या दृश्य साखळदंडापेक्षा मनाला बांधणारे अदृश्य साखळदंड फार अधिक भक्कम असतात." काल यासंबंधी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला आहे. पुन्हा ते पुढे असे म्हणतात की, "शुध्दतेच्या कर्मकांडात रुतलेल्या आणि त्यामुळेच प्रगतीला पराड्‌मुख झालेल्या भाषा मृत या सदरात कशा जमा होतात, हे इतिहासाने दाखविलेले आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार)**

त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "समाजाची प्रगती व क्रांती स्वभाषेच्या किनाऱ्यावरच पेरता येते. असे क्रांतिकारकांच्या प्रणेत्याने म्हटलेले आहे. संस्कृत भाषा देवे केली ! प्राकृत काय चोरापासून झ ाली? असा संतप्त प्रश्न संत एकनाथांनी विचारला होता."मराठी भाषेचा संदर्भ म्हणून सांगतो. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "संस्कृतचे स्तोम माजवून तेव्हाचा पुरोहितवर्ग आपली सत्ता समाजावर गाजवत होता. आज त्या पुरोहित वर्गाची जागा इंग्रजीत पारंगत असलेल्या चार-पाच टक्के लोकांनी घेतली आहे. या पाच टक्केवाल्यांच्या प्रस्थापित हितसंबंधासाठी आठ कोटी लोकांचे भवितव्य धोक्यात लोटायचे कां, याचा विचार गंभीरपणे व्हायला हवा." अशाप्रकारे मराठी भाषेच्या चाललेल्या गळचेपी संबंधी अतिशय मार्मिक भाषण कुसुमाग्रजांनी केले आहे. ते असे म्हणतात की, "कागदोपत्री मराठी भाषा ही राजभाषा झालेली आहे. पण व्यवहारात तिचा हा अधिकार फारसा मान्य झाल्याचे दिसत नाही. डोक्यावर सोनेरी मुकुट आणि अंगावर फाटके कपडे अशा अवस्थेत ती मंत्रालयाच्या दाराशी उभी आहे. सरकारी आणि निमसरकारी संस्थांत मराठीला अद्यापही खालच्या मानेनेच वावरावे लागते." पुढे ते असे म्हणतात की, "मुंबई ही महाराष्ट्रातील मराठी भाषिकांची जीवनधात्री माता आहे. या माऊलीच्या वत्सल सावलीत कोणीही यावे, राहावे, निर्वाहसाधना करावी- अवश्य. "हे विश्वचि माझे घर" हा संतांचा संदेश मातीत रुजलेला आहे. पण आठ कोटींच्या या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

आईला धनसत्तेच्या बळावर आपली बटीक करण्याचा प्रयत्न कोणी करु नये. मंत्रालयात जाऊन मंत्र्यांशी वा मुख्यमंत्र्यांशी आपण मराठीत बोलू शकतो. पण कोणत्याही हॉटेलात वेटरशी वा दुकानातील विक्रेत्यांशी आपल्याला हिंदीत वा इंग्रजीत बोलावे लागते. याचे आपल्याला वाईट वाटते."

सभापती महोदय, शेवटचे एक-दोन परिच्छेद वाचून दाखवितो आणि त्यानंतर मी दुसऱ्या मुद्दयावर येतो. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "ख्रिस्ती धर्मसंस्थांनी म्हणजे कॉन्व्हेंटसनी आपले शिक्षण विषयक धोरण आमूलाग्र बदलले ही एक चिंतेची आणि खेदाची बाब आहे. आज कॉन्व्हेंटची शाळा म्हणजे मुलांना महागडा गणवेष घालायला लावणारी, भरमसाठ फी आकारणारी, मुलांनी आणि त्यांच्या पालकांनीही चोवीस तास इंग्रजी बोललें पाहिजे असा आग्रह धरणारी शाळा, असे समीकरण झालेले आहे." या भूमिकेमध्ये ते पुढे असे म्हणतात की, "आता हे सूत्र बाजूला फेकून त्यांनी एकदम धनिकवणिक बाळाचे संपूर्ण विदेशीकरण करण्याचे नवे धोरण स्वीकारलेले दिसतें". पुढे त्यांनी असे म्हटले आहे की, "मराठी माध्यमाच्या अभ्यासक्रमात जी प्रतिष्ठा इंग्रजीला असते, किमान तेवढी प्रतिष्ठा इंग्रजी माध्यमांच्या अभ्यासक्रमात मराठीला देण्यात शासनाला कोणती अडचण आहे? स्वभाषेपासून मुलांना दूर नेणे म्हणजे त्यांची सामाजिक पाळेमुळें खणून काढणे आहे.इंग्रजी माध्यमाने मुलांचे इंग्रजीही फार भक्कम होते असे नाही. " सभापती महोदय, मी शेवटच्या दोन ओळी आपणास वाचून दाखवितो."तो सर्व समाजाचा प्रश्न आहे हे ध्यानात घेऊन शासनाने सर्वांचे सहकार्य घेतले तर या संकटावर मात करणे कठीण आहे असे मला वाटत नाही. जगातील सर्व प्रगल्भ भाषांना जे साधले ते मराठीलाही साधता येईल".

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु..

सभापती महोदय, न्यायालयासंबंधी काही निर्णय या ठिकाणी झालेले आहेत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 348 (1) अन्वये उच्च न्यायालयाच्या कामकाजाची भाषा इंग्रजी आहे. त्यामुळे पक्षकाराला रिट व अपिला सोबत दाखल करावयाच्या कागदपत्राचे इंग्रजीतून भाषांतर करावे लागते त्यामुळे पक्षकारांना काही हजार रुपयापर्यन्त भुर्दंड पडतो. राज्याची न्यायालयाची भाषा इंग्रजी व प्रादेशिक भाषा, शासन व्यवहाराची भाषा अशी विसंगती राहू नये, म्हणून उच्च न्यायालयाचे निकालपत्र, आदेश, हुकुमनामे वगळून अन्य सर्व कामकाज शासन व्यवहाराच्या भाषेतून करता यावे यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 348 (2) ची तरतूद आहे. या तरतुदीन्वये संविधानाच्या अनुच्छेद 345 अन्वये शासन व्यवहाराची भाषा कायदा करून झाल्यानंतर त्या भाषेस उच्च न्यायालयात प्राधिकृत भाषेचा दर्जा देण्यासाठी म्हणजे मराठी भाषेचा दर्जा देण्यासाठी राज्याच्या राज्यपालांनी त्याबाबतचा प्रस्ताव राष्ट्रपती महोदयांना पाठवून त्यांची पूर्वसंमती घ्यावयाची व राजभाषेस उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा घोषित करावयाची अशी ही तरतूद आहे. अनेक राज्यांनी या तरतुदीचा वापर करून, त्यांच्या भाषांचा राज्यातील शासन व्यवहाराची भाषा, त्या राज्याच्या उच्च न्यायालयाची भाषा घोषित केलेली आहे. मग महाराष्ट्र शासन असा आग्रह या कलम 348 (2) अन्वये कोर्टाच्याबाबतीत का धरत नाही ?

सभापती महोदय, मराठी राजभाषा अधिनियम,1964 अन्वये मराठी भाषा सन 1965 पासून राज्याच्या शासन व्यवहाराची भाषा झाली आहे. याबाबतचा सविस्तर अभ्यासपूर्ण उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी केला. त्यानंतर लगेच अनुच्छेद 348 (2) अन्वये सन 1965 मध्ये मराठी भाषा मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा करणे आवश्यक होते. परंतु सन 1995 मध्ये विधिमंडळाच्या कामकाजाची भाषा मराठी झाली आणि सन 1998 मध्ये मराठी भाषा जिल्हा पातळीपर्यन्तच्या न्यायालयांची कामकाजाची भाषा झाल्याने मराठी भाषा मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा होणे अतिशय गरजेचे झालेले आहे, हे करण्यासाठी शासनाला एक नवीन पैशाचा खर्च येणार नाही. आमच्या काळामध्ये 1995 ते 99 पर्यन्त आम्ही मराठी भाषेच्या वापराची जिल्हा पातळीपर्यन्त प्रक्रिया पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न केला. पण आजपर्यन्त मराठी भाषेला उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा म्हणून दर्जा घटनेच्या अनुच्छेद 348 (2) अन्वये मिळालेला नाही.
त्यामुळे पक्षकारांना उच्च न्यायालयात रिट व अपील दाखल करताना त्या सोबत दाखल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सरु....

करावयाच्या कागदपत्रांपैकी मराठीत असलेल्या कागदपत्रांचे इंग्रजीत भाषांतर करून द्यावे लागते व त्या कामी काही हजार रूपयात भुर्दंड सोसावा लागतो. जे गरीब कज्जेदार असतात ते न्यायालयात न्याय मागण्यासाठी जातात, त्यांना ते पैसे द्यावे लागतात. मराठी भाषा संरक्षण व विकास संस्था शासनाकडे सदर विषयात सातत्याने पाठपुरावा करत आहे. परंतु शासन त्याची दखल घेत नाही. मराठी भाषा मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्व परवानगीची आवश्यक नाही.

महाराष्ट्र विद्यापीठने देखील अधिनियम,1994 चे कलम 5 (55) अन्वये विद्यापीठांनी स्वत: पुढाकार घेऊन महाविद्यालयीन शिक्षणासाठी मराठी माध्यम उपलब्ध करून द्यावयाचे आहे. महाराष्ट्रातील एकाही विद्यापीठाने या तरतुदीचा वापर केलेला नाही व शासनाच्या संबंधित खात्याने यात लक्ष घातलेले नाही. त्यामुळे ज्यांना मराठी माध्यमातून महाविद्यालयीन शिक्षण घ्यावयाचे आहे त्यांना महाविद्यालयाचे दरवाजे कायमचे बंद आहेत, याला जबाबदार कोण ? शासनच जबाबदार आहे. शासनाने याबाबत कधी आग्रह केला नाही. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने कधी आग्रह केला नाही. दुसरे आणखी काही मुद्दे आहेत ते मी या ठिकाणी मांडतो आहे. .

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जे इलेक्ट्रॉनिक चॅनल्स आहेत त्यांचा समाजावर अतिशय लवकर प्रभाव पडतो. मराठीमध्ये "इ मराठी, झी मराठी, सह्याद्री, असे चॅनल्स आहेत. त्याचबरोबर "मी मराठी" हे अधिकारी बंधूंचे चॅनल आहे. टाटा स्कायचे 100 चॅनेल असलेले सेट टॉप बॉक्स इमारतींवर बसविलेले आहेत. परंतु ते मराठी चॅनेलचे प्रक्षेपण करत नाहीत. आपण दक्षिण भारतात गेला तर त्या ठिकाणी तामिळ भाषेचे 12 चॅनेल्स चालतात,पश्चिम बंगाल बंगाली भाषेचे चॅनेल्स चालतात. आंध्र प्रदेशमध्ये तेलगू भाषेचे चॅनेल्स चालतात, केरळमध्ये त्यांच्या भाषेतील चॅनेल चालतात. आपण टाटांना महाराष्ट्रामध्ये सवलती देतो. त्यांच्यावर मराठी चॅनेल दाखविण्याबाबत केंद्र सरकाकडून बंधन आणणे आवश्यक आहे. त्यांच्यावर तशी अट का घालत नाही ? आत्याधुनिक यंत्रणेच्या माध्यमातून फक्त चारच चॅनल्स मराठीमधील आहेत. रात्री 11-12 वाजल्यानंतर महाराष्ट्रामध्ये, मुंबई शहरामध्ये चॅनेल्स चालवितात त्यांच्यावर बंधन घातले पाहिजे. एकतर धनिकांनी मराठी माणसांची गळचेपी केलीच आहे. या टाटा स्कायवर मराठी चॅनेल दाखविण्याचे बंधन आणले पाहिजे, तसे केंद्र सरकारला कळवून बंधन घालणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

त्याचप्रमाणे आपल्याला आठवत असेल की, पंडित जवाहरलाल नेहरु असताना हिंदी भाषा ही राष्ट्रभाषा करावी अशातऱ्हेचा निर्णय झाला होता. त्यावेळी तमिळनाडूमध्ये राष्ट्रध्वज जाळण्यात आले. आम्ही हिंदी बोलणार नाही, आम्ही आमच्याच भाषेत बोलणार अशातऱ्हेचे प्रचंड आंदोलन झाले आणि त्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरु यांना माघार घ्यावी लागली तसेच हिंदी बरोबर इंग्रजी भाषेचाही आपण वापर करावा असा आग्रह त्यांना धरावा लागला. काल भाषण करीत असताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्वेषाने काही शब्द वापरले असतील. त्याचा अर्थ असा की, काँग्रेस पक्षाने सवंग लोकप्रियतेसाठी या देशातील भाषा या सांस्कृतिक एकतेचा देशात कधी उपयोग केला नाही. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचे मराठीपण जपण्यासाठी भाषेचा काळजीपूर्वक उपयोग केला नाही. आज मुलांना मराठी माध्यमाच्या शाळेत घालणे म्हणजे कमीपणाचे लक्षण समजले जाते. काही दिवसांनी आपली मुले "संत तुकाराम" न म्हणता " संत ठुकाराम" म्हणतील. त्याचप्रमाणे "संत ज्ञानेश्वर" न म्हणता "संत ग्यानेश्वर" म्हणतील. "ऊसाचा रस" न म्हणता " शुगर केन पाणी " म्हणतील. त्यांना साधी रामरक्षा येणार नाही. त्यांना साहित्याची माहिती होणार नाही. जर मराठी भाषा प्रगल्भ झाली नाही, जर मराठी भाषेचा प्रभाव सर्वदूर झाला नाही तर वाईट परिस्थिती निर्माण होईल. एक तर आज सर्व ग्रंथालये बंद पडली आहेत. टी.व्ही. चॅनेल्समुळे आता पूर्वीसारखे कोणी अंक वाचत नाहीत. पूर्वी वर्तमानपत्रातील छोट्या छोट्या बातम्या वाचल्या जावयाच्या. आता या चॅनेल्समुळे लोक बातम्या वाचत नाहीत अशा प्रकारचा त्या चॅनेल्सचा प्रभाव आहे. ग्रंथालये बंद पडलेली आहेत. शाळेमध्ये काही तरी शिकवावयाचे म्हणून मराठी शिकवले जाते. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मराठी भाषेसंबंधीचा विषय अतिशय गांभीर्याने मांडलेला आहे त्याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये आणि महाराष्ट्रात काही ठिकाणी आयमॅक्स, मल्टीप्लेक्स थिएटर्स निर्माण झालेली आहेत. अनेक ठिकाणी जुळी, तिळी सिनेमागृहे निर्माण झालेली आहेत. माननीय सांस्कृतिककार्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी मागील दोन तीन अधिवेशनांमध्ये असे सांगितले होते की, या सगळ्या सिनेमागृहांना वर्षातून काही आठवडे सक्तीने मराठी चित्रपट दाखविण्याचा आग्रह करु. आपल्या माध्यमातून माझे शासनाला आव्हान आहे. मुंबईमध्ये ज्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण .....

ठिकाणी रुपम सिनेमागृह होते त्या ठिकाणी आयमॅक्स झालेले आहे. वडाळा येथे ॲडलॅब झालेले आहे. आपल्या विधान भवनाच्या बाहेर आयनॉक्स थिएटर झालेले आहे. ही सिनेमागृहे ही अट किती पाळतात हे शासनाने सांगावे. मराठी सिनेमांना मुंबईमध्ये आणि अन्य शहरांमध्ये थिएटर्स मिळत नाहीत. यादृष्टीने या बाबीचा उपयोग करणे आवश्यक आहे. ज्यांनी मराठी भाषेच्या माध्यमातून कला क्षेत्रामध्ये कलेचा अविष्कार मनोरंजनाच्या माध्यमातून, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सगळ्या समाजापर्यंत नेला आणि आपली कला टिकवून ठेवली अशा किती मराठी कलावंतांना जीवन गौरव पुरस्कार मिळाले ? आपण स्क्रीन पुरस्कारांचा कार्यक्रम पाहतो. आपण निवृत्त झालेल्या मराठी भाषिक चित्रपट कलावंतांना फक्त 500 रुपये मानधन देतो. आपण त्यांना 1 हजार रुपये सुध्दा मानधन देऊ शकत नाही.

सभापती महोदय, विमानतळावरील परिस्थितीच्या बाबतीत मी सांगू इच्छितो. आम्ही सभागृहातील काही सदस्य परदेशामध्ये गेलो होतो. त्या ठिकाणी विमानामध्ये सुध्दा पहिल्यांदा त्यांच्या भाषेत उद्‌घोषणा केली जाते आणि त्यानंतर इंग्रजी भाषेतून उद्‌घोषणा केली जाते. मुंबईतील विमानतळावर मात्र पहिल्यांदा इंग्रजीतून "This is Chhatrapati Shivaji Maharaj Terminal" अशी उद्‌घोषणा केली जाते. त्यानंतर हिंदीतून "यह छत्रपती शिवाजी टर्मिनल है" अशा पध्दतीची उद्‌घोषणा केली जाते. या महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये आल्यानंतर आपण सक्ती केली पाहिजे की, विमानामध्ये पहिल्यांदा "आता आपण छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर थोड्याच वेळात उतरणार आहोत" अशा पध्दतीची उद्‌घोषणा केली पाहिजे. डोमॅस्टिक विमानतळावर सुध्दा तीच परिस्थिती आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : डोमॅस्टिकला मराठीत काय म्हणतात ?

श्री. मधुकर चव्हाण : डोमॅस्टिकला मराठीमध्ये आंतरदेशीय असा शब्द आहे.(अडथळा) आमची मुले किमान स्वदेशात शिकून इंग्रजी बोलतात. पण आपण आमच्या देशावर लादण्यासाठी सर्वच परदेशातून आणले आहे. केवळ भाषाच नाही तर आपल्या पक्षाच्या प्रमुखपदी परदेशी व्यक्ती आणली आहे. आपल्याकडे आपल्या पक्षाचे नेतृत्व करण्यासाठी या देशातील माणूस नाही. माझी शासनाला विनंती आहे. हा विषय अतिशय महत्वाचा आहे. याबाबत विचार केला नाही तर आपली भाषा संपेल. आपले साहित्य कोणी वाचणार नाही.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 14:35

(श्री. मधुकर चव्हाण....)

क्रौंचवध कोणीही मुलगा वाचणार नाही. कोणी पूर्वीची नाटके वाचणार नाहीत. रामरक्षा कोणी वाचणार नाही. कोणी रामायण, महाभारत वाचणार नाही. एवढेच नव्हे तर ज्या महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे जे साहित्य मराठीमध्ये लिहिलेले आहे ते साहित्य कोणी वाचणार नाही. सभापती महोदय, मराठी भाषेबद्दल आपल्या मनामध्ये प्रेम निर्माण झाले पाहिजे. या महान साहित्यिकांनी एका ठराविक चौकटीत राहून जीवन कसे जगावे हे आपल्या साहित्यामध्ये सांगितलेले आहे. जीवनामध्ये आलेल्या अनुभूतीचा आविष्कार म्हणजे साहित्य. हे साहित्य मराठी भाषेमध्ये जास्त आहे. हिंदी भाषेमध्ये अशा प्रकारचे साहित्य जास्त नाही. हे मराठीतील साहित्य किती लोकांना माहीत आहे ? सभापती महोदय, आज महाराष्ट्रामध्ये जी चॅनेल्स दाखविली आहेत त्यावर बंधने घातली पाहिजेत. ..(अडथळा).. मी इंग्रजीचा द्वेष करीत नाही पण त्या भाषेचा गुलाम देखील होऊ इच्छित नाही. ज्या लोकांनी 150 वर्षे या हिन्दुस्थानाला चिरडले त्यांचा आपणाला पुळका का यावा हे मला कळत नाही. इंग्रजी भाषा हे वाघिणीचे दूध आहे असे मी समजत नाही. आमची मराठी भाषा वाघिणीचे दूध आहे, आमची संस्कृत भाषा वाघिणीचे दूध आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये मराठी भाषेसंबंधी बौध्दिक पातळीवर चर्चा होत असताना मध्येच कोणी टिंगळटवाळी करणे इष्ट नाही. आमची ही माय मराठी आपला पदर पसरुन मला घरात घ्या अशी विनवणी करीत दारात उभी आहे. असे असताना या विषयावर कॉमेन्टस् होणे अपेक्षित नाही.

**तालिका सभापती** : या गोष्टी दोन्ही बाजूने सांभाळल्या पाहिजेत.

श्री. मधुकर चव्हाण :सभापती महोदय, मराठी भाषेच्या शाळा ओस पडत चाललेल्या आहेत. डॉ. शिरोडकर हायस्कूल, आर.एम.भट हायस्कूल, शिवाजी विद्यालय या शाळांमध्ये मराठी भाषेतून शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या रोडावलेली आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळामध्ये मात्र छोटया आणि मोठ्या शिशुवर्गात 80-90 मुले असतात. इंग्रजी आले पाहिजे हे मी समजू शकतो. पण त्याच बरोबर मराठी भाषेकडे दुर्लक्ष होता कामा नये. मराठी भाषेबद्दल विद्यार्थ्यांमध्ये प्रेम आणि आकर्षण असले पाहिजे. त्यासाठी राज्यकर्ता हा द्रष्टा असावा लागतो. पिढीचे भवितव्य घडविण्याची दृष्टी त्याच्याकडे असावी लागते. आजच्या परिस्थितीमध्ये हे राज्यकर्ते कोणती पिढी घडविणार आहे ?

..2..

(श्री. मधुकर चव्हाण...)

सभापती महोदय, आपण संत वाड.मयाचे अभ्यासक आहात. आता संत तुकारामाचे अभंग, गाथा कोण वाचणार आहेत ? संत तुकारामाची वैकुंठाला जाण्याची वेळ आली त्यावेळी त्यांनी अभंग लिहिला. हा अभंग असा आहे :

शेवटची विनंती संतजनी परिसावी,<br>
विसर न तो पडावा माझा देवा तुम्हाशी<br>
आता फार बोलू काय अवघे पाय विदीत<br>
तुका म्हणे पडतो पाया, करा छाया कृपेची

संत ज्ञानेश्वरांनी म्हटलेले आहे की, "माझा म-हाठीचा बोलू कवतिके, अमृतातेही पैजा जिंके " अशी ही मराठी भाषा अमृतासारखी आहे. अमृत म्हणजे ज्यातून जीवन मिळते, संजीवनी मिळते, प्रेरणा-सचेतना मिळते, चांगली दृष्टी मिळते. त्या अमृतासारखी आमची मराठी भाषा आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात ज्याप्रमाणे निसर्ग माणसाला मार्गदर्शन करतो त्याप्रमाणे मराठी भाषेमध्ये खूप पूर्वीपासून लिहिले मराठीचे वाड.मय हे मार्गदर्शनाप्रमाणे आहे. हा अमृतानुभव आपण संपविणार आहात काय ? एका कवितेमध्ये असे म्हटलेले आहे की, "बघ आई आकाशात सूर्य हा आला, पांघरुनी अंगावर भरजरी शेला" या दोन ओळीमध्ये किती सुंदर निसर्गचित्रण रेखाटलेले आहे. सभापती महोदय, मराठी भाषा ही वैभव संपन्न आहे. तिची कीर्ती वाढायला पाहिजे. तिचे वैभव वाढायला पाहिजे यासाठी हा प्रस्ताव मांडतांना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पोटतिडिकेने ज्या ज्या गोष्टी करण्यास सांगितल्या आहेत त्या शासनाने केल्या पाहिजेत. मी कवी माधव ज्युलियन यांच्या दोन ओळी वाचतो. " मराठी असे आमुची मायबोली, तिचे पुत्र आम्ही तिचे पांग फेडू" मराठी भाषेचे पांग फेडायचे असेल तर मराठी भाषेच्या संदर्भात आपण जे जे ठराव आणलेले आहेत, जे जे निर्णय घेतलेले आहेत ते तात्काळ अंमलात आणले पाहिजेत. नाही तर एक दिवस असा येईल की, आपल्या घरातून सर्व निघून जाईल. आज पालकांना सांगितले जाते की, विद्यार्थ्यांचे इंग्रजी चांगले व्हायचे असेल तर त्यांच्या बरोबर मराठीमध्ये बोलू नका.

नंतर श्री. भोगले..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 14:40

श्री.मधुकर चव्हाण........

ज्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला, ज्यांनी इंग्रजांची सत्ता मुळासकट उखडून फेकून दिली ते भगतसिंग मराठीतून शिकले नाहीत? लोकमान्य टिळक मराठीतून शिकले नाहीत? ज्यांच्या इंग्रजी भाषेचा इंग्लंडमध्ये गौरव झाला ते गोपाळकृष्ण गोखले मराठीतूनच शिकले. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाला मानवतेचा अधिकार प्राप्त करुन दिला ते मराठीतून शिकले नाहीत? महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू मराठीतून शिकले नाहीत? ज्यांनी समाजामध्ये क्रांती घडवून आणली, स्वातंत्र्य मिळवून दिले, वैचारिक ठेवा दिला, साहित्य दिले ते सगळे मराठी भाषेत आहे. आज भारतातील जे प्रांत आहेत, जगातील देश आहेत त्यांना आमची मराठी भाषा अमृतासारखी आहे. मराठी भाषेची गळचेपी चालली आहे. मराठी भाषेवर अन्याय झालेला आहे आणि तो शासनाच्या माध्यमातून झालेला आहे. त्यावर अंकुश असणे आवश्यक आहे. शासनाकडून उत्तर दिले जाईल ते सजेशन फॉर ॲक्शन असे नको. भान ठेवून निर्णय घ्यावेत. आम्ही भान ठेवून बोललो आहोत. तुमचे शासन बेभान होऊन निर्णय घेते आणि भान ठेवून अंमलबजावणी करीत नाही. म्हणून या ठिकाणी जे बोलले गेले आहे त्याला उत्तर देत असताना मराठी भाषेबद्दल शासनाने चांगला निर्णय घेतला आहे अशा प्रकारचे उत्तर यावे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र !

--------

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, एका अत्यंत धीरगंभीर विषयाला वाचा फुटली आहे. कोणी म्हणतो मला रडू येते, कोणी म्हणतो मराठीची गळचेपी होते. खरे काय होते हे पक्षाभिनिवेष बाजूला ठेवून सभागृहाने धीरगंभीर चर्चा करुन एकमेकांना दोष न देता विचार मांडले तर या चर्चेला चांगले स्वरुप आणि रुप मिळाले असते. श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्या बंगल्याला नाव दिले मातोश्री. आम्हाला शिवसैनिकांचा रास्त अभिमान आहे. ज्या मासाहेबांनी आपल्या घरात सैनिकांना मुलाबाळांप्रमाणे वाढविले, लहानाचे मोठे केले त्या मासाहेबांचे आपण पूजन करता त्याचा आम्हाला रास्त अभिमान वाटतो. पण भाषण करताना आपण काय भाषा वापरता? मायचं लुगडं फेडणारी औलाद, हे भाषण? ज्या महाराष्ट्राने मराठी भाषेचा झेंडा जगभर रोवला, ज्या मराठी मातीत तुम्ही जन्माला आलात, ज्या आईचे दूध तुम्ही प्यायलात, आमची आई विमानामध्ये प्रसूत झाली होती का? ज्या भाषेचे प्रेम तुम्हाला आहे तसे ते आम्हालाही आहे. आपण आईचे अस्तित्व मानता, आईचे स्थान मानता. स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी हे मानणारे आम्ही आहोत.

तुझा हात परिस,
माझा लोखंडी झुला,
हात परिस लागता,
झुला सोन्याचा झाला

असे मानणारे आम्ही. आईच्या लुगड्याला हात कोण घालू शकतो? कोण कपाळकरंटा? कोण दळभद्री? ज्या मुख्यमंत्र्यांनी, ते मुंबईत असताना म्हणाले की, लोंढ्यांविषयी गांभीर्याने बोलावे लागेल, एकत्र बसावे लागेल, चर्चा करुन हा प्रश्न सोडवावा लागेल ते? हा प्रश्न मुंबईच्या दृष्टीने कुठेतरी धोकादायक वाटतो हे म्हणण्याचे धारिष्ट्य मुख्यमंत्र्यांनी दाखविले. 1994 ते 1999 या काळात आपण सत्तेत होतात. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना मी विचारु इच्छितो. ते डॉक्टर आहेत. त्यांची डिग्री कोणती? बी.ए.एम.एस. की, एम.बी.बी.एस.? डॉक्टर हा इंग्रजी शब्द आहे. डॉक्टरला मराठीत वैद्य म्हटले जाते. असे असताना सन्माननीय सदस्य आपल्या नावाचा उल्लेख वैद्य दीपक सावंत असा का करीत नाहीत? दुसरे सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब हे आपल्या नावापूर्वी ॲडव्होकेट असा शब्द वापरतात. वास्तविक ॲडव्होकेट हा इंग्रजी शब्द आहे.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...........

सभापती महोदय, भाषेविषयी असूया नसावी. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अतिशय सुंदर भाषण केले. परंतु भाषण करीत असताना शेक्सपीअरच्या इंग्रजी वाड.मयाची मराठी वाड.मयाशी तुलना करणे चुकीचे आहे. दुसऱ्या भाषेविषयी असूया असण्याची गरज नाही. माझे साहित्य जगश्रेष्ठ आहे हे सांगण्यासाठी शेक्सपीअर कुठे जन्मला हे सांगण्याची काय गरज आहे? आमचे साहित्य श्रेष्ठ होते. 700 वर्षे या साहित्यावर आम्ही जगलो, वाढलो म्हणून तर मराठी भाषा टिकून आहे. इंग्रजीचे आक्रमण होत असताना आपण एकत्र येऊन मराठी भाषा टिकावी म्हणून लढतो आहोत असे चित्र आहे का?

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुध्दारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड....

आपण आईच्या आईला आजी म्हणतो. मग माननीय प्रमोद नवलकर यांनी नाना-नानी पार्क काढला तो काय गुजराथी लोकांसाठी काढला आहे काय?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रस्तावावरच आपले विचार व्यक्त करावयास पाहिजेत परंतु त्यांचा सारा रोख हा शिवसेनेवरच आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा रोख शिवसेनेवर नाही. शिवसेनाच मराठी भाषेची शिलेदार आहे काय? माननीय उध्द्व ठाकरे यांनी मराठीच्या संदर्भात मोर्चा काढला तर आम्ही सुध्दा त्यात सामील होऊ.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना आपण प्रस्वावावरच बोलण्यास सांगावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : काल सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते अडीच तास मराठीच्या प्रस्तावावर बोलले तेव्हा आम्ही त्यांचे सर्व विचार शांतपणे ऐकून घेतले होते. या ठिकाणी मराठी भाषेच्या संदर्भात जो प्रस्ताव दिलेला आहे तो अतिशय गंभीर आहे. सी.बी.एस.सी. शाळेत मराठी भाषा कम्पलसरी करावी ही आमची भूमिका आहे. तसेच सी.बी.एस.सी. शाळेत मराठी भाषा कम्पलसरी राहील हे त्या संस्थेने देखील मान्य केलेले आहे. आम्ही काँग्रेस पक्षाचे असलो, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असलो तरी आम्ही मराठीचा विचार कधीही सोडलेला नाही. माझी माय मराठी जगली पाहिजे अशी आमची प्रामाणिक भूमिका आहे. माय मराठीच्या प्रामाणिक भूमिकेने सी.बी.एस.सी. आणि आय.सी.एस.सी. शाळेत मराठी भाषा सक्तीची करण्याची भूमिका आम्ही घेतलेली आहे तसेच या शाळेत मराठी भाषा सक्तीची राहील हे त्या शाळेने सुध्दा मान्य केलेले आहे.

सभापती महोदय, ज्या प्रमाणे तामिळनाडू राज्यात "तामिळ" भाषा, आंध्रप्रदेशामध्ये "तेलगू" भाषा, गुजरात राज्यात "गुजराथी" भाषेची सक्ती केली जाते, त्याच प्रमाणे माझी माय मराठी भाषा जगवावयाची असेल तर मराठी भाषा सक्तीची केली पाहिजे ही काही एका पक्षाची भूमिका आहे असे नसून मराठी भाषेवर प्रेम करणा-या सा-या मराठी माणसांची भूमिका आहे. मराठी भाषेचा

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड....

ठेका काही एकाच पक्षाने घेतलेला नाही, आपणच फक्त मराठी भाषेचे पालनहार करणारे, रक्षण करणारे आहात हे समजू नये. सभापती महोदय, आम्ही दुस-या भाषेविषयी कधीही असूया धरली नाही. दुस-या भाषेविषयी असूया धरली तर तो विरोधाभास होईल. माणसाला प्रत्येक भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे, कुठल्याही भाषेची असूया बाळगू नका असे कवी कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेमध्ये म्हटलेले आहे. आपण आयुष्यभर विद्यार्थी म्हणून जगत असतो. माणसाने प्रत्येक भाषा शिकली पाहिजे. प्रत्येक मराठी माणसाला आपली माय मराठी भाषा बोलता आली पाहिजे. मराठी भाषेवर बोलत असतांना आपण दुस-या भाषेवर द्वेष भावनेने बोलणे हे काही योग्य नाही. त्यामुळे अशा विषयावर बोलत असतांना आपण काय बोलतो आहोत त्याचे भान ठेवले पाहिजे. सभापती महोदय, मला कोणावरही टिका करावयाची नाही, कोणी केलेल्या भाषणावर बोलावयाचे नाही. परंतु आम्हाला हे का बोलावे लागत आहे याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. या प्रस्तावावर बोलत असतांना आम्ही, चर्चेच्या माध्यमातून बोलत असतांना आम्ही आपल्याला रोखण्याचा प्रयत्न केला नाही, हरकतीचे मुद्दे उपस्थित करुन आपले विचार थांबविण्याचा प्रयत्न केला नाही. आम्ही अनेक वर्षापासून आपली भाषणे शांतपणे ऐकलेली आहेत, आपल्या भाषणात व्यत्यय यावा यासाठी आम्ही कधीही खाली बसून बोललो नाही हे आपण कसे विसरता? सभापती महोदय, केवळ आपल्या वयाचा, आपल्या अनुभवाचा, आपल्या कामाचा, आपल्या ज्ञानाचा, आपल्या व्यक्तिमत्वाचा आदर ठेवून आम्ही आपल्याबद्दल कधीही अपशब्द काढले नाही किंवा तशा प्रकारची भूमिकाही घेतली नाही. याचा अर्थ आम्हाला काही कळाले नाही असे नाही तर मराठीच्या संस्कृतीनेच आम्हाला हे शिकवले आहे. मराठी भाषेच्या संस्कृतीनेच आम्ही आपली अरेरावी सहन करु शकलो. सभापती महोदय, आम्ही मायकल जॅक्सनच्या संदर्भात कधी बोललो नाही, शिवसेना प्रमुखांना आम्ही कधीही बाळ ठाकरे अशा एकेरी नावाने संबोधले नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड.......

आम्ही त्यांना बाळासाहेब ठाकरे म्हणून संबोधितो. ही संस्कृती आम्हाला मराठीने दिलेली आहे. आमच्या आईने दिलेली आहे. त्या आईच्या लुगड्या विषयी बोललात तेव्हा आमच्या तोंडात देखील शिव्या आल्या, पण त्या आईच्या संस्कृतीचे, या मातीच्या संस्कृतीचे नाते आम्ही तुटू दिले नाही. .

सभापती महोदय, याठिकाणी टाटा स्काय डिश ॲटींनाचा उल्लेख झाला. याठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब उपस्थित झालेले आहेत. मी त्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, जर "मी मराठी" वाहिनी दाखविली जात नसेल तर त्यासाठी आपल्याला जबरदस्तीची भूमिका घेऊन आदेश द्यावे लागतील. माझ्या राज्यात जर मराठी वाहिनी दाखविली जात नसेल तर त्यासाठी शासनाला काहीतरी भूमिका घ्यावी लागेल. त्यासाठी आपण सर्वजण एकत्र आले पाहिजे. यामध्ये कोणत्याही पक्षाचा पडदा येता कामा नये. जेथे जेथे मराठीचे हित असेल मग ते सामाजिक असो, आर्थिक असो तेथे पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून एकत्र आले तर कुठे बिघडले ?

सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संस्कृत ही राष्ट्रभाषा व्हावी असे म्हटले नव्हते. घटना समितीचा वाद मसुदा मी वाचून आलेलो आहे. या माणसाला वर्गाची पायरी चढू दिली नाही. ते संस्कृत ही राष्ट्रभाषा व्हावी असे कसे सांगतील ? ज्या दोन टक्के समाजाने त्यांचा समाज चिरडण्याचा प्रयत्न केला त्या दोन टक्के समाजाची भाषा राष्ट्रभाषा व्हावी असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कसे बोलतील. संस्कृत ही राष्ट्रभाषा व्हावी असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले असे रेकॉर्डवर आलेले आहे ते चुकीचे आहे आणि ते रेकॉर्डवर राहता कामा नये.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. संस्कृत ही भाषा केवळ ब्राह्मण समाजाची नाही. दोन टक्के समाजाची नाही. तर ती या देशातील भाषा होती. ती सर्व समाजाची भाषा होती. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी असे म्हणावे की, "संस्कृत ही भाषा केवळ आम्हीच शिकली पाहिजे, तो आमचा अधिकार आहे. संस्कृत भाषा कोणाला शिकविता येणार नाही. संस्कृत भाषा येत नव्हती म्हणून एकलव्याला परत जावे लागले." संस्कृत भाषा ही ब्राह्मण समाजाची नाही ती सर्व समाजाची भाषा आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी ब्राह्मण समाजाचा उल्लेख केलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी ते वाक्य माझ्या तोंडी घालू नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला धरुन एवढेच सांगू इच्छितो की, " घटनेतील आठव्या शेड्युलमध्ये या देशाच्या भाषा कोणत्या असाव्यात याची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये संस्कृत भाषा 14 व्या क्रमांकावर आहे. तेव्हा ती अधिकृत भाषा आहे. भारतात ज्या भाषा आहेत त्यामध्ये संस्कृत भाषा देखील आहे. ही माहिती घटनाकारांनी दिलेली आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मसुदा समितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर नव्हते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना संस्कृत ही राष्ट्रभाषा व्हावी असे वाटत होते असे म्हणणे चुकीचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मुद्दे खोडून काढण्याचा अधिकार आहे. मी काल माझ्या भाषणात पुणे येथील दैनिक सकाळमध्ये एक पत्र आले होते ते मी याठिकाणी वाचून दाखविले. तो माझा शोध नाही. परंतु सन्माननीय सदस्य असे सांगत आहेत की, जणू काही ते घटना समितीच्या टेबलावर बसले होते आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे कधी बालले नाहीत अशा अविभार्वात बोलत आहेत. त्यांना मुद्दे खोडून काढण्याचा अधिकार आहे. मी वाचलेल्या पत्राच्या संदर्भात अमुक अमुक खंडामध्ये असे असे लिहिलेल आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगावे. असा प्रतिवाद होऊ शकतो. मी माझ्या घरचे काही सांगितलेले नाही.

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी पु.ल.देशपांडेच्या हरी तात्यासारखे बोलू नये.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी माझ्या नावाचा उल्लेख करुन सांगितले की, आपण एकत्र आलो तर महाराष्ट्रात कोणती मराठी वाहिनी दिसणार नाही ? आता जी "मी मराठी" नवीन मराठी वाहिनी लॉंच झालेली आहे, ती चालविण्यासाठी आम्ही हट्ट धरला होता. परंतु मी त्यांना आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, चॅनल्सच्या संदर्भात केंद्र शासनाचा कायदा आहे. ज्या काही प्रादेशिक वाहिन्या आहेत

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ KTG/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 14:55

ॲड.अनिल परब....

त्या प्रत्येक राज्यांनी स्वतंत्रपणे चालविल्या पाहिजेत, परंतु त्या व्यतिरिक्त इतर काही करण्यासाठी तसे होत नाही. त्यामुळे प्रत्येक राज्यांवर तसे कम्प्लशन असावे यादृष्टीने मी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन आग्रह धरत आहे. या कामाच्या बाबतीत कृपया सन्माननीय सदस्यांनीही मला सहकार्य करावे, ही विनंती.

श्री.जितेंद्र आव्हाड : जरुर करु.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, टाटा स्कायबाबत...

**तालिका सभापती** : याठिकाणी मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रस्तावावर चर्चा करण्याच्या दृष्टीने आपण मनापासून भरपूर वेळ दिलेला आहे. त्यामुळे या विषयाचे गांभीर्य व आत्मीयता यास कुठेही गालबोट लागता कामा नये, एवढी आपण सगळयांनी काळजी घेऊ या.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, याठिकाणी टाटा स्कायचा विषय माननीय श्री.चव्हाण साहेबांनी मांडला. त्यात टाटा स्काय किंवा इतरांचा 100-100 वाहिन्यांचा ग्रुप वा बुके असतो. त्यामध्ये आपल्या राज्यातील भाषेव्यतिरिक्त इतर राज्यांतील भाषेमधील वाहिन्या दाखविल्या जातात. त्यामुळे मला असे वाटते की, आपल्या राज्यामध्ये आपण मराठी वाहिन्या अग्रक्रमाने दाखविण्याच्या दृष्टीने आग्रह धरला पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, महाराष्ट्र प्रशासकीय सेवा आणि भारतीय प्रशासकीय सेवा या दोन वेगवेगळया सेवा असून त्यांना आपण एमपीएससी आणि युपीएससी म्हणतो. हे प्रचलित शब्द असल्यामुळे त्यामध्ये मराठी आणि इंग्रजी असे काही होणार नाही. परंतु याबाबतीत शासनाने काहीतरी धोरण ठरवले पाहिजे, असे मला वाटते. तामिळनाडू, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार राज्यांमध्ये स्टेट केडरवाईज टाईमबाऊंड प्रमोशन दिले जाते व प्रमोशन देऊन प्रशासकीय सेवेत आणले जाते. त्यांचे व भाषेचे नाते घट्ट असल्यामुळे अशाप्रकारे त्यांना प्रशासकीय सेवेत आणून जिल्हाधिकारी पदावर नेऊन बसवले जाते. शेवटी, भाषा ही संस्कृतीची वाहक असते. त्यामुळे तळागाळातील माणसांच्या शब्दांतील वेदना ओळखण्यास त्या भाषेचे ज्ञान आवश्यक असते. हे आपल्याला कळायला हवे. त्यामुळे हा विषय शासनाने गांभीर्याने घ्यावयास हवा, असे मला वाटते. आज अहमदनगरच्या व नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना मराठीच

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...

येत नसेल तर, 7/12 वरील पटवाऱ्यांनी व तलाठयांनी टाकलेली नांवे चुकीचे आहेत असे जेव्हा रडत रडत तेथील गरीब माणसे त्यांना सांगत असतील तर त्यांच्या शब्दातील वेदना त्या जिल्हाधिकाऱ्यांना कशा समजतील व ते त्यांना कोणता न्याय देतील ? त्यामुळे ज्याप्रमाणे केडरवाईज प्रशासकीय सेवेत टाईमबाऊंड प्रमोशन तामिळनाडू, आंध्रप्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश राज्यांनी दिले त्याप्रमाणे आपणही द्यावे. आपल्या प्रशासकीय सेवेतील उप जिल्हाधिकारी हा महाराष्ट्र प्रशासकीय सेवेची परीक्षा देऊन आलेला असतो. मी याठिकाणी वारंवार मागणी करत आलो आहे की, आपण याबाबतीत टाईमबाऊंड प्रमोशन ठेवा, परंतु आपण तसे करत नाहीत. कारण, याबाबतीत आपल्यावर आयएएस लॉबीचे प्रचंड प्रेशर आहे. त्यामुळेच मी याठिकाणी माननीय ॲड.अनिल परब यांच्या ॲडव्होकटचा व माननीय डॉ.दीपक सावंतांच्या डिग्रीचा उल्लेख केला. हे प्रचलित शब्द आहेत. याठिकाणी भाषेच्या प्रश्नावर वाद असला पाहिजे.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...........

तेव्हा राज्य सेवेतील अधिका-यांच्या कालबद्ध पदोन्नतीचा जो प्रश्न आहे तो अतिशय गंभीर आहे. राज्य सेवेतील पदांचा आढावा गेल्या 17 वर्षांपासून घेण्यात आलेला नाही. कदाचित हे अधिकारी बोलत नसतील, कारण भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी त्यांचे वरिष्ठ अधिकारी असतात, ते काही तरी बरे-वाईट करतील, या भूमिकेतून ते शांत राहतात. म्हणून या निमित्ताने मी अतिशय गांभीर्याने शासनाला असे निवेदन करतो की, यासंदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करावी. तब्बल बारा वर्षानंतर मुंबईला मराठी पोलीस आयुक्त मिळाला, त्याबद्दल आम्हाला निश्चित आनंद झाला. कालबद्ध पदोन्नतीचा विचार शासनाने गांभीर्याने केला तर हा आनंद उपभोगण्यासाठी आम्हाला बारा वर्षांची प्रतिक्षा करावी लागणार नाही. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, कालबद्ध पदोन्नतीसाठी सर्वांनीच बोलले पाहिजे. त्याचप्रमाणे भारतीय प्रशासन सेवेत मराठी तरुण आणावयाचे असतील तर कालबद्ध कार्यक्रम आखावा लागेल. आज मराठी तरुण भारतीय प्रशासन सेवेच्या परीक्षांना बसत नाहीत, त्यांना या परीक्षांकडे आकर्षित केले पाहिजे. कारण, ही सेवा अतिशय महत्वाची आहे, या संवर्गातूनच अंतिम न्यायनिवाडा होत असतो. भारतीय प्रशासन सेवेत मराठी तरुण असला पाहिजे, या भूमिकेशी मी ठाम आहे. या सेवेत जर मराठी तरुण आला तर तो या भाषेचे संस्कृतिशी असलेले नाते समजू शकेल, या भाषेचे दु:ख समजू शकेल. मात्र, हे दु:ख, हे नाते परप्रांतीय जिल्हाधिका-यांना समजत नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे या चर्चेच्या निमित्ताने जो विषय सभागृहात उपस्थित झाला आहे, तो अतिशय गंभीर आहे.

सभापती महोदय, राज्यात अनेक प्रकारच्या शाळा, येथील भाषेवर अतिक्रमण करणा-या शाळा येत आहेत आणि दुसरीकडे राज्यातील एस.एस.सी.बोर्ड गायब होत आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी अतिशय भावनाविवश होऊन आपल्या भावना येथे मांडल्या. मला त्यांना विचारावयाचे आहे की, ज्यावेळी शिवसेनेची सत्ता राज्यात होती त्यावेळी त्यांनी एस.एस.सी.बोर्डाचे मराठी नामकरण का केले नाही ? वाहनांवर मराठीत नंबरप्लेट लावण्याची सक्ती का केली नाही ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी राज्याचा परिवहन मंत्री असतांना माझे फाईलवरील नोटिग काढून बघा,मी स्वहस्ताक्षरात नोटिंग करत होता, टाईप करुन घेत नव्हतो.

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

तसेच, हे सर्व नोटिंग मराठीत करत होतो. वाहनांवर मराठीत नंबरप्लेट लावण्याबाबतचे आदेश काढण्याकरिता मी सतत काम करीत होतो. परंतु, केंद्राच्या परवानगीशिवाय आपण हे करु शकत नव्हतो. सभागृहात याच विषयावर एक लक्षवेधी सूचना देण्यात आलेली आहे. त्या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात शासनाने असे म्हटले आहे की, परिवहन कायदा हा केंद्राचा असल्यामुळे त्यानुसारच राज्याला काम करावे लागते, त्यामुळे मराठीत नंबरप्लेट लावण्याबाबतचे आदेश आम्ही काढू शकलो नाही. मात्र, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाहनांवर वाहन क्रमांकाची एक पाटी मराठीत लावण्याचा निर्णय आम्ही घेतला. तसेच, खाजगी वाहनधारकांना आपल्या वाहनांवर मराठीत वाहन क्रमांकाची पाटी लावण्याची मुभा देण्यात आली, असे करतांना वाहनाच्या कोणत्याही भागात इंग्रजीतील पाटी लावावी, असे एका परिपत्रकान्वये सूचित केले होते.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, जाता जाता एवढेच सांगतो की, मुंबई वगळता संपूर्ण महाराष्ट्रात मराठी भाषा घट्ट पायावर उभी आहे, धोका आहे तो आर्थिक राजधानीचा. आर्थिक राजधानीचेही आपले स्वतःचे दुःख आहे. ही राजधानी प्रगतीच्या वाटेवर आहे. पण प्रगतीच्या वाटेवर मराठी अडसर ठरते, असे कुणाला वाटत असेल तर त्याला मुंबईत राहण्याचा अधिकार नाही, हे देखील आम्ही स्पष्टपणे सांगतो व हीच आमची भूमिका आहे. तुम्हीच मराठीचे रक्षणकर्ते आहात, असे समजू नका, आम्हाला बरोबर घ्या, आम्ही याबाबतीत आपल्या बरोबर आहोत. सन्माननीय शिक्षणमंत्री आजच्या या चर्चेला उत्तर देणार आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही हा प्रश्न अतिशय गांभीर्याने घेतला आहे. नागपूर अधिवेशनामध्ये सी.बी.एस.सी. व आय.सी.एस.सी.शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची करणार काय ? अशा प्रकारचा प्रश्न आम्ही विचारला होता. मराठी भाषा सक्तीची करण्यात येईल, असे उत्तर आपण त्यावेळी आम्हाला दिले होते. ज्या पध्दतीने मुंबईमध्ये स्थित्यंतर येत आहे, कितीतरी शाळांचे रुप बदलले जात आहे, ते पाहता वीस वर्षानंतर येणा-या पिढीला 'अ' 'आईचा' असतो हे कळणार नाही, असे शंभर टक्के मला वाटते. पुढच्या पिढीला 'अ' 'आईचा' कळण्यासाठी म्हणजेच मराठी जीवंत ठेवण्यासाठी मुंबईकडे शासनाने विशेष लक्ष द्यावे.

यानंतर कुमारी धनश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड सुरु...

मुंबई मध्ये मराठी जिवंत ठेवण्यासाठी आपण प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी मुंबईकडे विशेष लक्ष आपण दिले पाहिजे. ही मराठी भाषा जगली तरच आपला महाराष्ट्र जगणार आहे. आणि तरच तो नावारुपाला येणार आहे. हे आपण विसरता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना मी हे सांगू इच्छितो. आम्ही दिनांक 5 जानेवारी रोजी ,एक पुस्तक प्रकाशित करीत आहोत. आतापर्यंत ज्या कवींनी मराठी भाषेमध्ये आईविषयी कविता लिहिलेल्या आहेत त्या सर्व कवितांचा साधारणत: 300 कवितांचा संग्रह करुन हा कवीतासंग्रह प्रकाशित करण्यात येणार आहे. कवी श्री. माधव ज्युलियन, कुसुमाग्रज, श्री. ना.धो महानोर यांच्या व्यतिरिक्त जे कवी आतापर्यंत नावारुपास आलेले नाहीत परंतु त्यांच्या कवीतांमध्ये वेदना आहेत, शब्दामध्ये प्रेम आहे. त्यांच्या देखील कवितांचा या पुस्तकामध्ये समावेश आहे. 'माय' अर्थात आईच्या कविता आई असताना ते आई नसताना असे नाव आम्ही या पुस्तकास दिलेले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन श्री. दि. 5 जानेवारी रोजी सुशीलकुमार शिंदे करणार आहेत. हे प्रकाशन ते मराठीच्या प्रेमापोटी करणार आहेत. या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळयास आपण सर्वांनी देखील यावे.बॉम्बे स्कॉटिश वरचा मोर्चा जेथे मराठी शिकवले जात नाही त्या मोर्चाचे नेतृत्व उध्दव ठाकरे यांनी करावे त्यात आम्ही नक्की सामील होऊ. मराठी भाषा जगावी ही केवळ तुमचाच नव्हे तर महाराष्ट्राचा प्रयत्न असला पाहिजे त्यास सर्वांनी साथीला उभे राहिले पाहिजे अशी आमची इच्छा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे, तो माझा व्यक्तिगत प्रस्ताव नाही. हा संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रतिमेचा प्रश्न आहे.शासकीय मराठी भाषेची गळचेपी आहे हा त्यातील गाभा आहे. स्वातंत्र्याला 50 वर्षे होऊनसुध्दा मराठीची ही अवस्था आहे या बाबतीत आपण ठोस पाऊल उचलले पाहिजे. सभापती महोदय, अजून 10 सदस्यांना बोलावयाचे आहे. या चर्चेची मर्यादा 4 वाजेपर्यंत असेल तर आपण ही वेळेची मर्यादा वाढवून मंगळवारी सकाळी घ्यावी. त्याला विस्तृत उत्तरही सामान्य प्रशासन विभागाकडून आले पाहिजे. तसेच 50 वर्षानंतर तरी मराठीच्या संदर्भात ठोस पावले उचलली गेली पाहिजेत अशी मी विनंती करतो.

श्री. जितेद्र आव्हाड : सभापती महोदय, सभागृहातील सगळी घडयाळे ही इंग्रजीत आहेत. त्यातील एखादे घडयाळ मराठीत असेल तर बरे होईल.

..2..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आपले निवडणूक चिन्ह मराठीत आहे ना ? भावनेतील आशय महत्वाचा आहे,तो येथे आला पाहिजे. मुद्यांची पुनरावृत्ती होऊ नये. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आपले भाषण सुरु करतील.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र सदस्यांद्वारे नियुक्त ) : सभापती महेदय, माझ्यावर बोलण्यासाठी वेळेचे बंधन असेल तर मी बोलत नाही . मी खाली बसतो.

**तालिका सभापती** : नाही आपल्ययावर बोलण्याचे बंधन नाही.मी आपणास विनंती करतो की, आपल्याला वेळेची कालमर्यादा पाळणे आवश्यक आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मराठी भाषा सर्व ठिकाणी अनिवार्य करण्याचा जो प्रस्ताव आहे तो सर्वांच्या अस्मितेचा प्रस्ताव आहे. मराठी राजभाषा झालेली आहे मात्र ती अजूनही अंमलात येत नाही अशी तिची अवस्था आहे त्यामुळे त्या विषयी सर्वांना मते मांडण्यास अनुमती आपण दयावी अशी माझी विनंती आहे. विधान परिषदेतील नियम 260 अन्वये विरोधी पक्षाचा प्रस्ताव गुरुवार दिनांक 29 मार्च 2007 रोजी मी मांडू इच्छितो या शीर्षकाखाली श्री दिवाकर रावते यांनी या सभागृहात हा मराठी भाषेच्या संदर्भात प्रस्ताव मांडला आणि या प्रस्तावाच्या समर्थनार्थ 2 तास 20 मिनिटे त्यांनी युक्तीवाद केला. हा प्रस्ताव अडीच तासाचा आहे. एकच सन्माननीय सदस्य एवढा वेळ बोलल्यानंतर बाकीच्या सदस्यांना बोलण्यास वेळ मिळाला नाही. त्यामुळे मी अशी विनंती करतो की, या प्रस्तावावर ज्यांना बोलावयाचे असेल त्यांना आपण पूर्ण वेळ बोलू द्यावे.

यानंतर कु, खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.......

सदर प्रस्तावावरील चर्चा जर आज संपणार नसेल तर उर्वरित चर्चा मंगळवारी ठेवण्यात यावी. या प्रस्तावाचे सविस्तर उत्तर येईपर्यंत हा प्रस्ताव लावून धरावा, अशा प्रकारची भूमिका सर्वांच्याच मनामध्ये आहे आणि त्या दृष्टिकोनातून या चर्चेला सुरुवात झालेली आहे. या सभागृहामध्ये अनेकप्रकारे हा विषय मांडला गेला, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हा विषय मांडतांना सन 1960 सालापासून ते आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेबद्दलचे जे जे नियम, पत्रके, इन्स्ट्रक्शन्स तयार केले, या संदर्भात त्यांनी विवेचन केले. तारीख, वार ,सगळया प्रस्तावांची भाषा कशी असावी, त्याची अंमलबजावणी कशी व्हावी, शासनाने कोणत्या प्रकारे हे सर्व निर्णय घेतले,या संदर्भातील सगळया भूमिका त्यांनी काल सभागृहामध्ये मांडल्या आणि त्या संपूर्णत: ऑथेन्टिक आहेत, अतिशय स्पष्ट आहेत, कायदेशीर आधार घेऊन मांडलेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बोलतांना माझ्या मनात विचार येतो की, या संयुक्त महाराष्ट्रातील मी पहिला कार्यकर्ता आहे, माय मराठीची ही लढाई सन 1955 पासून सुरु झालेली आहे, त्यावेळी मी 11वीमध्ये शिकत होतो, नोव्हेंबरमध्ये त्यावेळी हे आंदोलन झाले, त्या आंदोलनामध्ये माझ्या वर्गातील माझ्या शेजारच्या बाकावर बसणारा एक श्री.सिताराम धनाजी पवार नावाचा मुलगाही सहभागी झाला होता, तो मुलगा फ्लोरा फाऊंटनमध्ये माझ्या बाजूला गोळी लागून मृत्यू पावला. त्यानंतरच्या सगळया संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मी भाग घेतला होता आंदोलनामध्ये मीही पोलिसांचा मार खाल्ला होता, एवढी या चळवळीची सुरुवात जुनी आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा ही आमची चळवळ होती. त्यावेळचे अनेक गाजलेले नेते व पुढारी मंडळीही या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते, स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांची काय भूमिका होती हे मला माहित आहे. त्यावेळी स्व.यशवंतरावजी चव्हाण यांच्यासोबत दोन दिवस राहण्याची, त्यांच्यासोबत त्यांच्याशी बसून बोलण्याची संधी मला मिळाली होती. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची माय मराठीबाबत वा संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्याबाबत परखड भूमिकाही आम्हाला ज्ञात आहे, स्वर्गीय यशवंतरावजी यांना सगळया विषयांमध्ये एक प्रकारची गोडी होती मग तो विषय नाटयाचा असो किंवा क्रीडेचा असो. स्व.चव्हाण यांनी कुठल्या विषयाला स्पर्श केला नाही, असा कोणताही विषय नाही,एवढे ते बहुश्रूत नेतृत्व होते. या सगळया त्यांच्या भूमिकेकडे आम्ही एक महाराष्ट्राचे

NN-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

सुसंकृत नेतृत्व म्हणून पाहत होतो. या पाश्वभूमीवर हा सगळा प्रस्ताव ज्यावेळी महाराष्ट्रामध्ये आला त्यावेळी मराठी माणसाकडे,मराठी भाषेकडे दुर्लक्ष झाले, सदर विषयाबाबतची ही व्यथा आजची नसून खूप जूनी आहे. ही जी महाराष्ट्राच्या नेतृत्वाची परंपरा आहे, ती खूप जुनी आहे. मोगलांचे राजे आपल्याकडे होते,महाराष्ट्रामध्ये होते, छत्रपती शिवप्रभूंच्या रुपाने आपण ते राज्य महाराष्ट्रातून खालसा केले. संपूर्ण देशामध्ये पराक्रमाची पूजा करणारी नवीन पिढी त्यांच्या नेतृत्वाखाली उभी राहिली होती. शिवप्रभूंनी महाराष्ट्राला आचार दिले,विचार दिले,राज्यकारभार कसा चालावा,राज्यभाषा कशी असावी ? अष्टप्रधान मंडळ म्हणजे काय याची माहिती छत्रपती शिवप्रभूंनी महाराष्ट्राला दिली. शिवप्रभू म्हणजे महाराष्ट्राला लाभलेले एक वरदानच आहे, त्यांनी राज्य कसे असावे, राजा कसा असावा, याचा एक आदर्शच घालून दिला. राज्य कसे असावे यासंदर्भातील छत्रपती शिवप्रभूंचे विचार खरोखरच वाचनीय तर आहेतच परंतु ते फक्त वाचण्याकरिताच नसून कृतीमध्ये देखील आणण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळी महाराष्ट्र राज्यामध्ये अमृतकलश घेऊन स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण आले त्यावेळी दिनांक 01 मे,1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. सर्वसाधारण जनतेची महाराष्ट्र राज्याकडून हीच अपेक्षा होती की, महाराष्ट्र राज्य हे स्वयंपूर्ण व स्वावलंबी असावे, कोणावरही अवलंबून आपले राज्य चालते, अशातला भाग नाही. संपूर्ण देशातील पराक्रमाचा खड्गहस्त म्हणून महाराष्ट्र राज्याकडे पाहावयाला लागेल. सन 1962 मध्ये जेव्हा चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरुंनी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांना देशाचे संरक्षण खाते सांभाळण्यासाठी केंद्रामध्ये बोलाविले, त्यावेळी आचार्य अत्रेंचा " हिमालायाच्या संरक्षणासाठी सहयाद्री धावून गेला " या शिर्षकाखाली एक लेख प्रकाशित झाला होता, तो लेख अजूनही मला आठवत आहे, त्यामध्ये उक्त प्रकारची भाषा त्यांनी आपल्या लेखामध्ये वापरली होती. आचार्य अत्रे हे एक असे व्यक्तिमत्व होते की ते एक चांगले लेखक,कादंबरीकार, विनोदी लेखक कोणती उपमा त्यांना द्यावयाची नाही, हा प्रश्न पडावा इतके बहुढंगी ते व्यक्तिमत्व होते.

यानंतर श्री.बोरले.....

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .......

सन 1957 च्या निवडणुकीत त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मला मिळाली. गिरगाव मतदारसंघातून ते निवडणुकीसाठी उभे होते. आता तो ऑपेरा हाऊस मतदारसंघ झालेला आहे. त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मला मिळाली. 1 मे, 1960 रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. सन 1960 ते 66 या काळामध्ये मी एका कारखान्यामध्ये काम करीत होतो. कारखान्यामध्ये काम करीत असतांना शिक्षण घेत होतो. त्यावेळची व्यथा अशी होती की, मराठी माणसाला सर्व क्षेत्रांमध्ये काम करण्याची संधी मिळत नव्हती. ठराविक क्षेत्रामध्ये मराठी माणसाला काम करण्याची संधी मिळत होती. असे दुर्दैवी चित्र त्यावेळी होते. दिनांक 13 ऑगस्ट, 1960 रोजी मार्मिक साप्ताहिकाचा जन्म झाला. मार्मिक साप्ताहिकातून माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी अनेक व्यंगचित्रे काढली. मार्मिकमधील सुरुवातीची काही व्यंगचित्रे माझ्याकडे अजूनही आहेत. त्या व्यंगचित्रातून राजकारणातील किंवा बाहेरची एकही व्यक्ती सुटलेली नाही. राजकारणातील सर्व व्यक्तींची व्यंगचित्रे मार्मिक साप्ताहिकामध्ये छापून आलेली आपल्याला बघावयास मिळतील. निरनिराळया प्रकारच्या व्यंगचित्राबरोबर त्यांनी उपरोधिक भाषेमध्ये आपले विचार व्यक्त केले. महाराष्ट्राची गरज, महाराष्ट्राच्या वेदना, महाराष्ट्राचे दु:ख, महाराष्ट्राची व्यथा अशा अनेक प्रकारच्या भावनेतून शिवसेना जन्माला आली, हे कोणीही नाकारणार नाही. त्यावेळी मी एका कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून काम करीत होतो. नंतर मी शिवसेनेमध्ये प्रवेश केला. हे मी का सांगतो, कारण मराठी भाषेचा सन्मान वाढावा, देशामध्ये महाराष्ट्र हे कृतीमध्ये आणि सर्वच बाबतीत अग्रणी राज्य ठरावे. महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य आहे, असे वाक्य आपण नेहमी उच्चारतो. महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य आहे, असे आम्ही न म्हणता इतरांनी म्हटले पाहिजे, यावर आमचा जास्त विश्वास आहे. आम्ही स्वत:च आमची पाठ थोपटून घेत आहोत. केरळची जनता असे सांगते की, आमच्या राज्यात शंभर टक्के साक्षरता आहे. आमच्याकडे सर्वात जास्त सुशिक्षित समाज आहे. त्याच प्रमाणे छातीठोकपणे सांगण्याची हिंमत महाराष्ट्रातील सर्व राज्यकर्त्यांना असली पाहिजे. ती आहे काय ? मराठी भाषेचा सन्मान करावा, असे आपण म्हणतो. सर्व ठिकाणी मराठी भाषेचा वापर झाला पाहिजे, असे आपण म्हणतो. परंतु आपण मराठी भाषेची पाठराखण करीत नाही. कवी कुसुमाग्रज यांनी जे उद्‌गार

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .......

काढले ते आजही अतिशय बोलके आहेत. कवी कुसुमाग्रज जर आज असते तर त्यांनी म्हणाले असते की, मी जे बोललो ते सत्य आहे. कोठे आहे मराठी, विधान भवनात आहे, राज्य कारभारात आहे, व्यवहारात आहे, रस्त्यावर आहे, घरात आहे ? कोठे आहे ? मराठी शोधावी लागते. मराठी माणूस शोधावा लागतो, अशी आज परिस्थिती आहे. विधान भवनामधून जे पत्रक येते त्यामध्ये वाक्यरचना चुकीची असते, शब्द चुकीचे असतात. ते पत्रक वाचतांना आम्हाला वेदना होतात. सांगायचे कुणाला ? भाषा सुधारणे म्हणजे साधी गोष्ट नाही. त्यासाठी खूप परिश्रम करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक शब्दात काना, मात्रा, वेलांटी, -हस्व, दीर्घ यांची काळजी घेतली तर मराठी भाषा संपन्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, मराठी भाषेमध्ये काय नाही ? इतर भाषेमध्ये जे संपन्न आहे, ते सर्व मराठी भाषेमध्ये आहे. मराठीमध्ये संत नाहीत, साहित्यिक नाहीत, कवी नाहीत, लेखक नाहीत ? सर्व काही मराठी भाषेमध्ये आहे. मराठीमध्ये कोणता प्रकार नाही. परंतु मराठीला राजदरबाराची मान्यता असावी लागते. परंतु मराठीला राजदरबाराची मान्यता नसेल तर मराठी भाषेचे श्रेष्ठत्व कमी होते की काय, अशी शंका केवळ माझ्या मनातच नाही तर अनेक लोकांच्या मनात निर्माण झाली आहे. "मराठी असावी आमुची मायबोली." कवी कुसुमाग्रज यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी सुमारे 36 वर्षापूर्वी राजव्यवहारात त्यावेळी मराठी विषयावर जे विचार व्यक्त केले होते, ते आपणा सर्वांना माहीत आहेत. मी सर्व उद्धृत करीत नाही. त्यातील थोडासा भाग मी उद्धृत करतो.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .....

तो पुढीलप्रमाणे. " कपाळावरचा घाम पुसणाऱ्या, रस्त्यावरच्या रहदारीत वावरणाऱ्या, चाळीत आणि झोपडीत राहणाऱ्या, कचेऱ्यांत आणि कारखान्यांत राबणाऱ्या कोटयावधी सामान्य माणसांची आणि ती नाकारणारे आहेत सत्तेच्या मयूरासनावर बसलेले, संगमरवरी कल्पनांच्या लाल किल्ल्यात स्वत:ला बंदिस्त करुन घेणारे, आणि खानदानी पूर्वग्रहांच्या रत्नजडित डब्या हातांमध्ये बाळगणारे " असे वर्णन कुसुमाग्रजांनी केले आहे.

सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला आहे की, शेक्सपीअरची इंग्रजी भाषा जगात राज्य करीत असेल परंतु जगाच्या पाठीवर फक्त शेक्सपीअरच आहे का ? इंग्रजी भाषा जर वाघिणीची भाषा असेल तर, मराठी भाषासुध्दा वाघिणीची औलाद नाही का ? याबाबत मी सांगू इच्छितो की, मराठी भाषाही तेवढी प्रभावी आहे व ती अधिक समर्थपणे आपण वापरु शकतो हे अनेक लेखकांनी व कविंनी दाखवून दिलेले आहे. आपला पाहण्याचा दृष्टीकोन गुलामगिरीचा आहे का ? हे तपासून पाहिले पाहिजे. शासन व समाज व्यवस्थेच्या गुलामगिरीतून मराठीला मुक्त करण्याची आवश्यकता आहे.

कुसुमाग्रजांनी पुढे म्हटले आहे की, "आमचे हात बांधणारे बांधण्यात, कारखाने उभारण्यात आणि संरक्षणाच्या तोफा अभेद्य करण्यात गुंतलेले असताना तुमच्या या इंग्रजी की हिंदी, हिंदी की मराठी अशा शुद्र भाषाविषयक समस्या घेऊन आमच्या समोर येऊ नका असे राज्यकर्ते आम्हाला सांगत असतात" असे ते राज्यकर्त्यांविषयी बोलेले आहेत. चौथा हेन्री या शेक्सपीअरच्या नाटकातील हॉस्पर राजाला सांगतो की, "युध्दाच्या धुमश्चक्रीमधून आम्ही कपाळावरचा घाम आणि अंगावरील रक्त पुसत असताना हा तुमचा राजदूत परिटघडीचे कपडे घालून तपकिरीची रत्नजडीत डबी हातात घेऊन नाजूक हाताने ओठावरुन रेशमी हातरुमाल फिरऊन आम्हाला आपल्या सूचना एखाद्या नखरेल महिलेच्या स्वरात सांगायला लागला तर आमचा संताप अनावर झाल्याशिवाय कसा राहिल ? " असा प्रश्न कुसुमाग्रजांनी विचारला आहे.

सभापती महोदय, भाषा हे समाजाच्या जीवन विकासातील एक आधारभूत आणि सनातन असे तत्व आहे. जीवनातील एक अविभाज्य अंग आहे व तत्व आहे हे विसरुन चालणार नाही. सर्व

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT

श्री.मधुकर सरपोतदार .....

युगांतरात नष्ट होत नाही वा आमुलाग्र बदलत नाही ती फक्त भाषा. भाषा नष्ट होते तेव्हा समाजाचे अस्तित्वच समाप्त होते. कुसुमाग्रज पुढे म्हणताता की, "सर्व परिवर्तनातून समाजाला सोबत करणारी, गेलेल्या काळातील सत्व आजच्या काळापर्यत आणून पोचवणारी आणि पुढच्या काळातील परिवर्तनाला आवश्यक असे पाथेय आजच्या काळात सिध्द करणारी ती समाजाची मायशक्ती आहे. राष्ट्राची नवीन इमारत बांधताना आमचे लक्ष जर फक्त धरणांवर आणि कारखान्यांवर खिळले आणि भाषेचे प्रश्न अवक्षित राहिले तर या बांधकामाला पूर्णत्व येणार नाही".

सभापती महोदय, मी हे सर्व का सांगत आहे ? कारण ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणारे मराठीतील कवीश्रेष्ठ व जेष्ठ साहित्यिक असे महान व्यक्तिमत्व श्री.वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी "राज्यव्यवहारात मराठी" या विषयावर त्यांनी दिलेल्या सूचना आमच्या राज्यकर्त्यांच्या लक्षात का येत नाही ? हे माझ्या मनामध्ये शल्य आहे. मराठी भाषेच्या वापरासाठी मी त्यांची पुनरावृत्ती करीत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काल त्यांच्या भाषणात घटनेच्या 343, 344 कलमात असलेला भाषेबाबतचा उल्लेख सांगितलेला आहे. याबाबत मी सांगतो की, भारतीय संविधानाच्या कलम 344 (4) च्या तरतूदीनुसार गठीत करण्यात आलेल्या संसदीय समितीने सादर केलेल्या अहवालानुसार विचार करुन भारताच्या राष्ट्रपतींनी असे सुस्पष्ट, निसंदिग्ध आणि अंमलात आणण्यायोग्य निदेश दिले की, "भारतीय संघराज्याच्या विविध राज्यामध्ये असलेल्या सर्व केंद्र शासनाच्या कार्यालयांनी आपल्या अंतर्गत व्यवहारासाठी हिंदी व इंग्रजी भाषेचा वापर करावा आणि कोणत्याही संबंधित राज्यातील स्थानिक जनतेशी करावयाच्या व्यवहारात प्रादेशिक भाषेचा वापर करावा" त्यातील तरतुदीची अंमलबजावणी शासनाने केली पाहिजे. तो आपला अधिकार नाही का ? त्याची अंमलबजावणी आपण का करीत नाही ? कोणाला खूश करण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहात ? मराठीला लाथाडून आपण दुसऱ्या भाषेचा उदोउदो करत आहात. आम्हाला दुसऱ्या भाषेचा द्वेष असण्याचे कारण नाही, पण महाराष्ट्रात जी व्यक्ती आयुष्यभर राहात असेल व मराठी भाषा बोलत नसेल तर त्यांना मराठीबद्दल द्वेष वाटत असावा. मराठी बद्दल आपुलकी असती तर त्यांनी मराठी भाषा आत्मसात केली असती ? एखादा मनुष्य लंडन मध्ये राहून इंग्रजी येत नाही, असे म्हटले तर इंग्रज लोक काय म्हणतील ?

नंतर श्री.सुंबरे.....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ....

आम्ही कोकणामध्ये अनेक वर्षे राहिल्यानंतरही मला कोकणातील भाषा कळत नाही असे म्हटले तर तेथील लोक काय म्हणतील ? तसेच मी मुंबईत राहून येथील मराठी भाषा मला कळत नाही असे म्हटले तर येथील लोक काय म्हणतील ? म्हणूनच आमचे म्हणणे असे आहे की, महाराष्ट्र हे एक राज्य आहे आणि या राज्याची एकच भाषा असली पाहिजे आणि ती मराठीच असली पाहिजे. त्या दृष्टीनेच सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी हा प्रस्ताव आणून त्यावर काल दोन तास भाषण केले आहे. सभापती महोदय, .... विविध प्रादेशिक भाषा, शिक्षणाचे आणि शासन व्यवहाराचे माध्यम म्हणून झपाट्याने इंग्रजीची जागा घेत आहेत. प्रादेशिक भाषांनी त्यांचे हक्काचे स्थान प्राप्त करणे हे नैसर्गिकच आहे. त्यात अनैसर्गिक काही नाही. सभापती महोदय, केंद्रीय गृह मंत्रालयाने संसदेसमोर राजभाषांच्या संबंधातील जो शासकीय ठराव 18 जानेवारी 1968 ला स्वीकृत केला आहे त्यातील एक उतारा मी येथे उद्धृत करतो. त्यात असे म्हटले आहे की, "ज्याअर्थी एकतेच्या भावनेस चालना देण्यासाठी आणि देशातील वेगवेगळ्या भागातील जनतेमधील संपर्क सुलभ व्हावा यासाठी भारत सरकारने तयार केलेल्या त्रिभाषा सूत्रांनी राज्य शासनांशी विचार विनिमय करून सर्व राज्यांमध्ये अमलबजावणी करण्याकरिता प्रभावी उपाय योजना करण्यात येण्याची आवश्यकता आहे. " मग आपण ते का करीत नाही ? त्रिभाषा सूत्र आपण घेतले आहे ना ? स्वीकारले आहे ना ? ज्या त्या राज्यामध्ये तेथील भाषेला मायबोलीला राजभाषेचे स्थान दिलेच पाहिजे हा त्यातील मूळ उद्देश आहे. सभापती महोदय, राष्ट्रपतींचा आदेश आणि संसदेचा ठराव यात सुस्पष्टपणे असे नमूद केलेले आहे की, प्रादेशिक भाषा या इंग्रजी किंवा हिंदीला दुय्यम नाहीत तर त्यांना या राष्ट्राच्या शासनाशी होणाऱ्या सर्व व्यवहारात सन्मानाचे स्थान आहे. पण मग याचे पालन का झाले नाही आणि होत नाही. सभापती महोदय, या ठिकाणी मघाशी काही सन्माननीय सदस्यांनी असे विचारले की, शिवसेना नेत्यांची मुले कोणत्या शाळांमध्ये जातात ? पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय शिवसेना प्रमुखांचे मराठी भाषेविषयीचे विचार आणि आदेश देखील स्पष्ट आहेत. कोणाचेही इंग्रजी चांगले होऊ नये, इंग्रजीतून ज्ञान प्राप्त करू नये अशी त्यांची भूमिकाच नाही. तर तुमच्या घरामध्ये संपूर्ण वातावरण हे मराठी असले`पाहिजे. मराठी संस्कृतीशी मिळते जुळते असले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक मुलाने मराठी शिकायलाच पाहिजे. सभापती महोदय, या मुंबईत आणि महाराष्ट्रात शिवसेना उभी राहिली ती मराठी माणसासाठी आणि मराठी भाषेसाठी.

...... 3क्यू 2 ....

श्री. सरपोतदार ....

मराठी माणसाला आणि मराठी भाषेला न्याय देण्यासाठी शिवसेना नेहमीच अग्रेसर राहिली आहे. म्हणूनच एवढे आमदार आणि खासदार शिवसेनेचे निवडून आले आहेत. सभापती महोदय, मी जेव्हा खासदार म्हणून लोकसभेमध्ये निवडून गेलो त्यावेळी तेथे मी संपूर्ण देशाचे चित्र पाहिले. 545 खासदार लोकप्रतिनिधी म्हणून तेथे विविध प्रांतांतून निवडून येतात तेव्हा तेथे एक वेगळेच चित्र पहावयास मिळते. सन्माननीय सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष श्री.अरूण गुजराथी यांनी दोन दिवसापूर्वीच उल्लेख केला की, केंद्र सरकारकडून आपल्याला जो निधी मिळाला पाहिजे तो मिळत नाही. केंद्र सरकार त्याकडे दुर्लक्ष करते. त्याबद्दल मी हरकतीचा मुद्दा उपस्थित करून जे सांगितले तेच आज पुन्हा येथे सांगतो. लोकसभेमध्ये या संदर्भात मी जे पाहिले ते मी सांगतो. लोकसभेमध्ये आपल्याला विविध प्रांतांतून आलेले सगळ्या भाषांतील लोक दिसतात तेव्हा हिंदुस्थान देश किती मोठा आहे याची आपल्याला कल्पना येते. त्यामध्ये आपला महाराष्ट्र हे एक छोटे राज्य वाटते, तुलनात्मकदृष्ट्या तरी असे वाटते. आम्ही केवळ मराठी मराठी करायचे आणि देश तर आपला इतका मोठा आहे मग हिंदुस्थानी, हिंदुस्थानी का म्हणत नाही ? असाही विचार येतो. एक नोंद करण्यासारखी गोष्ट आहे की, ज्या ज्यावेळेस तामिळनाडू राज्यासंबंधात प्रश्न येतो मग तो कोणताही असो, भाषेचा असो, सवलतींच्याबाबतीतील असो वा अन्य कोणताही असो, सर्व पक्षभेद विसरून तामिळनाडूतील सगळे खासदार एकजुटीने उभे राहतात. तीच गोष्ट केरळ राज्याच्या बाबतीतही आहे, पश्चिम बंगालच्या बाबतीतदेखील तीच आहे. परंतु दुर्दैवाने महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र तसे चित्र मला कधीही दिसले नाही. मी जेव्हा जेव्हा महाराष्ट्राचा प्रश्न उपस्थित करीत होतो तेव्हा तो प्रश्न केवळ शिवसेनेचा प्रश्न नसून संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न म्हणून कधीही महाराष्ट्रातील सर्व पक्षीय खासदारांनी उचलून धरलेला नाही. मी खासदार असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख श्री.शरद पवार हे माझ्या बाजूलाच बसत होते. महिला विधेयक आले होते तेव्हाही ते माझ्या बाजूला बसले होते. मी त्या विधेयकावर भाषण केल्यानंतर ते मला म्हणाले होते की, तुम्ही खूप चांगले विचार मांडलेत. पण मी त्याचे उत्तर नंतर देणारच आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... आर 1 ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

तुम्ही त्याचे उत्तर द्या, तुम्हाला उत्तर द्यावे लागेल. परंतु सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा त्यांना त्यावर भाष्य करावयास मिळाले नाही. याचा अर्थ मला एवढेच सांगावयाचे आहे की, महाराष्ट्रामधून 48 खासदार लोकसभेवर निवडून जातात. ते सर्व खासदार एका विचाराने, एका भाषेमध्ये, एका सूरामध्ये, चढया आवाजामध्ये महाराष्ट्राला निधी मिळाला पाहिजे, ग्रँट मिळाली पाहिजे अशाप्रकारे लोकसभेमध्ये विचारीत नाहीत. हा निधी मिळावा म्हणून केंद्र शासनाला विचारण्याची महाराष्ट्र शासनाची कधी हिंमत होत नाही. सर्व पक्षांच्या खासदारांची तत्वे वेगळी आहेत, त्यांचे विचार निराळे आहेत. माननीय मुख्यमंत्री त्याकरिता बैठका घेतात. परंतु त्यामधून जो परिणाम साधावयास पाहिजे तो साधला जात नाही. या दृष्टीकोनातून महाराष्ट्राचे भले झाले तर मराठी भाषेचे भले होईल. महाराष्ट्र दुबळा राहिला तर मराठी भाषेचे भले होणार नाही. सभापती महोदय, याठिकाणी असे म्हटले आहे की, "राष्ट्रपतींचा आदेश आणि संसदीय ठराव होऊन चारपेक्षा अधिक दशकांचा कालावधी लोटला आहे. परंतु महाराष्ट्र राज्यात केंद्र शासनाची कार्यालये, महामंडळे, कंपन्या, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील बँका इत्यादी यंत्रणा त्यांच्या जनतेशी होणाऱ्या दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर करण्यासंबंधातील कायदेशीर तरतुदीची आणि त्यांच्यावर असलेल्या बंधनांची दखलही घेत नाहीत, हे पाहून खेद होतो. अशा लोकांच्या बाबतीत महाराष्ट्रातील अत्यंत सहनशील अशा एक संतश्रेष्ठाने "तुका म्हणजे ऐशा नरा मोजुनी माराव्या पैजारा" असा परखड सल्ला दिला आहे". मला या निमित्ताने प्रश्न विचारावयाचा आहे की, सर्व बँकांमध्ये, शासकीय कार्यालयांमध्ये सर्व ठिकाणी मराठीचा वापर कां होत नाही? हा मुद्दा माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काल उपस्थित केला होता. आपल्या या विधान भवनामध्ये जी पत्रके, विधेयके देण्यात येतात ती सर्व इंग्रजी भाषेमध्ये असतात. ती मराठी भाषेमध्ये कां देण्यात येत नाहीत? या महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये, महाराष्ट्राच्या विधान भवनामध्ये अशाप्रकारची पत्रके मराठीमध्ये कां असू नयेत हा माझा या विधानमंडळ सचिवालयाला प्रश्न आहे? याठिकाणी प्रत्येक गोष्ट इंग्रजीमध्ये असते. सही करतांना सुध्दा ती मराठीमध्ये कां करीत नाही? इंग्रजीमध्ये सही कां लागते? हे काय चालले आहे? यामध्ये जर आपल्याला परिवर्तन करावयाचे असेल तर शासनाच्या मूलभूत भूमिकेमध्ये जोपर्यंत हृदयपरिवर्तन होत नाही तोपर्यंत मराठीचा वापर जितक्या समर्थपणे व्हावयास पाहिजे तितका तो होऊ शकणार नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

श्री. मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, शाळांसंबधी महाराष्ट्र शासनाने एक परिपत्रक काढले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, मराठी भाषा सर्व शाळांमध्ये कंपल्सरी असली पाहिजे, ती आवश्यक आहे. अशाप्रकारचे परिपत्रक सर्व शाळांना गेले आहे. त्यातील काही शाळा ज्यांना आपण मायनॉरिटी स्कूल, अल्पसंख्यांकांच्या शाळा म्हणतो त्या शाळा हायकोर्टामध्ये गेल्या. हायकोर्टामध्ये गेल्यानंतर त्यांनी केलेला रिट पिटीशन फेटाळला गेला. त्यावेळी त्यांनी जे ऑब्जर्व्हेशन काढले ते खूप महत्वाचे आहे. ते इंग्रजीमध्ये असल्यामुळे, त्यांचे न्यायदान इंग्रजीमध्ये असल्यामुळे ते वाचून दाखवितो." The impugned policy decision was taken by keeping in view the large interest of the State, because the official and common businesses are carried on in that State in Marathi language. A proper understanding of Marathi language is necessary for easily carrying out the day-to-day affairs of the people living in the State of Maharashtra and also for proper carrying out of daily administration. Hence, the regulation imposed by the State of Maharashtra upon the linguistic minorities to teach its regional language is only a reasonable one." अशाप्रकारच्या जज्जमेंटव्दारे त्यांनी न्याय दिला. हा विषय जर आपण कुठे घेऊन गेलो तर मेजॉरिटी, मायनॉरिटी म्हणून कुणाला तो झोंबण्याचे कारण नाही. महाराष्ट्रामध्ये राहून मराठी भाषा आपण शिकली पाहिजे. याबाबत तामिळनाडूचे उदाहरण देतो. त्या ठिकाणी आपण इंग्रजीमध्ये बोललो तर त्या लोकांना समजते.परंतु दुसऱ्या भाषेमध्ये बोललेले त्यांना चालत नाही. ते लोक तुमच्याशी तामिळ भाषेत बोलतात. आंध्र प्रदेशमध्ये सर्व ठिकाणी तेलगू भाषेचा वापर केला जातो. त्यांचे विमानतळावरील बोर्ड देखील...

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयासंबंधी सांगू इच्छितो की, नागपूरच्या अधिवेशन सत्रामध्ये यासंबंधी प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने खुलासा केला आहे. ज्या अमराठी शाळा, संस्था आहेत, त्याठिकाणी मराठी हा विषय सक्तीचा करावा अशाप्रकारची भूमिका शासनाने सुप्रिम कोर्टामध्ये मांडली व सुप्रिम कोर्टाने ती मान्य केली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. मराठी भाषेच्या संदर्भातील चर्चा नियम 260 अन्वये कालपासून सुरू झाली. ही अडीच तासाची चर्चा आहे. त्या चर्चेनंतर कोकणाच्या विकासाच्या संबंधातील चर्चा आहे. आताची चर्चा अजून किती वेळ चालणार आहे, याबाबत मार्गदर्शन व्हावे. विधेयकावरील चर्चेच्या संदर्भात वेळेचे बंधन नसते परंतु प्रस्तावावर वेळेचे बंधन आहे.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : ही चर्चा 4-00 वाजेपर्यन्त पूर्णकरण्याचे ठरलेले आहे. पण ही चर्चा 4-00 वाजेपर्यन्त संपली नाही तर थांबवून ती कोकणाच्या विकासाच्या संदर्भतील प्रस्ताव चर्चेला घ्यायचा आणि मराठी भाषेच्या प्रस्तावाची चर्चा मंगळवारी घ्यावयाची किंवा कसे याबाबत सभापती महोदयांकडे विचारणा केलेली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : अगोदर 4-00 वाजेपर्यन्त चर्चा करायची असे ठरलेले होते. कोकणाच्या विकासाच्या संदर्भात चर्चा करायची नाही असे आम्हाला म्हणावयाचे नाही. आम्ही कोकणाचे शत्रू नाही.

सभापती महोदय, भाषेच्या संदर्भात दैनिक "महाराष्ट्र टाईम्स" या दैनिकामध्ये "मराठीचे मारेकरी" असा एक लेख आलेला आहे. त्यामधील सगळाच मजकूर मी वाचत नाही. काही मजकूर वाचतो. "गेल्यावर्षी 2 सप्टेंबर रोजी झालेल्या प्रकाराबद्दल या वर्षी 10 जानेवारी रोजी दिवाकर रावते यांना अटक करणेही हास्यास्पद आहे." गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये महाराष्ट्राचा सारा कारभार ज्या मंत्रालयातून चालतो. त्यातील अधिकाऱ्यांच्या नावाच्या इंग्रजी पाट्या मराठी केल्यामुळे आणि तसे त्यांनी त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला म्हणून सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना अटक करण्यात आली. आपण महाराष्ट्र राज्य हे भूषण मानतो. त्या महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी 105 हुतात्म्यांनी पंचप्राणाची आहुती दिली, रक्ताचे सडे सांडले. असे असताना या राज्यातील अधिकारी मराठी भाषेच्या संदर्भात उद्दामपणे वागत असतील तर त्यांना महाराष्ट्रामध्ये रहाण्याचा अधिकार नाही, असे मी म्हणेन. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मराठी भाषेच्या आग्रहासाठी अटक झाली. त्यांच्या वेदना कोणाला कळू नयेत, हे दुर्दैव आहे, या मुद्यावर मी नंतर येणार आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली त्यावेळेला कॉंग्रेसचे राज्यकर्ते होते. त्यावेळेस आमच्यावर पोलिसांनी लाठीमार केला. त्यावेळेस कॉंग्रेसचे सरकार होते. श्री.मोरारजी देसाई मुख्यमंत्री होते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.मधुकर सरपातदार (पुढे सुरू...

त्यांनी दिसता क्षणी गोळ्या घालण्याचे आदेश दिले. आता असाच प्रकार पश्चिम बंगालमध्ये घडलेला आहे. एस.ई.झेड.साठी घेतलेल्या जमिनींच्या संदर्भात त्या ठिकाणी आंदोलन झाले. मुख्यमंत्री श्री. बुध्ददेव भट्टाचार्य यांनी आंदोलनकर्त्यावर गोळीबार करण्याचे आदेश दिले. यानंतर पश्चिम बंगाल पेटून उठला. लोकांचा क्षोभ अनावर झाला. आपल्याकडे 105 हुतात्म्यांचे बळी घेतल्यानंतर 1 मे 1960 साली महाराष्ट्राची निर्मिती झाली. यासाठी लोकांचे रक्त सांडले, रक्ताचे पाट वाहिले. जे लोक महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी बळी गेले, त्याला शासन जबाबदार नाही तर कोण जबाबदार आहे ? सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख हे आज आहेत,उद्या दुसरे कोणी असतील.. परंतु भाषेची मूलभूत समस्या विसरून चालणार नाही. मुंबई महापालिकेमध्ये एक प्रस्ताव आणला, त्याची माहिती मला मिळालेली आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ......

कॉंग्रेसचे सदस्य श्री. राजहंस सिंह यांनी प्रस्ताव आणला होता. मुंबईमध्ये हिंदी भाषिक लोकांची संख्या वाढली आहे त्यामुळे मुंबई महानगरपालिकेची कामकाजाची भाषा हिंदी करावी, त्या ठिकाणी कामकाजाची भाषा मराठी असू नये असा प्रस्ताव त्यांनी आणला होता. यामध्ये या लोकांची दिशा दिसून येते. आपण कोणत्या रस्त्याने चाललो आहोत हे यातून दिसते. उद्याचे परिणाम आपल्याला आजच दिसावयास लागले आहेत. ही सुरुवात आहे. भविष्यामध्ये आणखी काय होणार आहे हे सांगू शकत नाही अशी परिस्थिती आहे. त्यादृष्टीने सावधान असावे म्हणून आम्ही मराठी भाषेच्या संदर्भात चर्चा मागितली. श्री. राजहंस सिंह हे सांताक्रुझ भागात राहतात. ते जर मला भेटले तर मी त्यांना स्पष्टपणे विचारणार आहे. आपण हिंदी भाषिक लोकांनी या ठिकाणी मराठी म्हणून राहावे. हिंदी भाषिक म्हणून राहावयाचे असेल तर आमच्या बरोबरीने राहावे. या ठिकाणी आपला स्वतंत्र हिस्सा मागू नका. महाराष्ट्र शासनाने उत्तर भारतीय लोकांसाठी आमच्या भागात एक मोठा भूखंड दिला. त्या ठिकाणी एक मोठे सदन उभे राहिले. त्याला आमचा विरोध नाही. त्यांनी जरुर या ठिकाणी राहावे परंतु जर या ठिकाणी उत्तर भारतीयांचे मोठे भवन उभे राहू शकते, जर या ठिकाणी त्यांचे मोठे सम्मेलन होऊ शकते तर त्यांनी एक जाणीव ठेवली पाहिजे की, हे महाराष्ट्रात आहे आणि मराठी लोकांच्या सहानुभूतिमुळे आपण या ठिकाणी बसलो आहोत हे त्यांनी विसरुन चालणार नाही.

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : मघाशी मी या ठिकाणी आसनस्थ असताना आपण असे ठरविले होते की, पहिल्या प्रस्तावावरील चर्चा मंत्रिमहोदयांच्या उत्तरासह 4.00 वाजेपर्यंत पूर्ण करावयाची. या ठिकाणी या प्रस्तावावर बोलू इच्छिणाऱ्या सदस्यांनी नावे पाहिली तर असे दिसते की, ही चर्चा एक-दोन तासात संपण्याची शक्यता नाही. कोकणच्या संदर्भातील जो प्रस्ताव आहे तो सुध्दा आपल्या दृष्टीने महत्वाचा आहे. ही चर्चा 4.00 वाजता तहकूब करु. मंगळवार, दिनांक 3 एप्रिल, 2007 रोजी सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता सुरु होईल. त्यानंतर....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण जो निर्णय द्याल तो आम्हाला मान्य आहे. मी थोडी पार्श्वभूमी सांगतो. कोकणामध्ये अनुशेष आहे परंतु या ठिकाणी बोलण्याच्या बाबतीत सुध्दा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

अनुशेष राहू नये. निरनिराळया अधिवेशनांमध्ये चार-पाच वेळा कोकणच्या बाबतीतील प्रस्ताव आलेला आहे. कोकणावर अन्याय होऊ नये. आज आम्हाला असे सांगण्यात आले की, कोकणच्या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री हजर राहतील. मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात गेलो होतो. त्यांना सांगितले की, आपण दुसरी व्यवस्था करा. सभागृहात मंत्रिमहोदय मुद्दे लिहून घेतील आणि त्याबाबत आपण उत्तर द्यावे. आम्ही त्याला मान्यता दिली तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनीही त्याला मान्यता दिली. ही चर्चा 4.00 वाजता स्थगित केल्यानंतर कोकणच्या प्रस्तावावरील चर्चा 4.00 वाजता सुरु करु परंतु त्या प्रस्तावावरील चर्चाही आज अपूर्ण राहिली तर या दोन्ही प्रस्तावांवर नंतर चर्चा पुढे सुरु करावी लागेल.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्मानीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना सांगू इच्छितो की, ज्यावेळी आज ज्यावेळी ही चर्चा उपस्थित केली त्यावेळी दुपारी 4.00 वाजता ही चर्चा मंत्रिमहोदयांच्या उत्तरासह संपवावी असे ठरले होते. मराठी भाषेच्या अनुषंगाने हा अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा विषय आहे. त्यादृष्टीने आपण विचार करीत आहोत. आता असे दिसते की, 4.00 वाजेपर्यंत ही चर्चा संपण्याची शक्यता नाही. 4.00 वाजता आपण कोकणासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा सुरु करु आणि त्या प्रस्तावावरील चर्चा संपेपर्यंत आपल्याला सभागृहाचे कामकाज सुरु ठेवणे आवश्यक आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, याबाबत आमची काही हरकत नाही परंतु कोकणाच्या प्रस्तावावर काही सन्माननीय सदस्य बोलावयाचे राहिले तर ही चर्चा सुध्दा नंतर पुढे चालू करावी लागेल.

**सभापती** : यामध्ये दोन भाग आहेत. एक तर ही चर्चा आज पूर्ण करु या आणि आपल्या प्रस्तावावरील चर्चा मंगळवारी घेऊ.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : त्या दिवशी सत्ताधारी पक्षाच्या वतीने नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. त्यामुळे त्या दिवशी दोन्ही प्रस्तावांवर चर्चा होऊ शकणार नाही. आज आम्ही आमच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

**सभापती** : मग एखादी चर्चा मंजूर झाली की, 12-12 तास चर्चा करण्याचेच काम आपण करु या का ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी नम्रपणे सांगू इच्छितो की, नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा ही अडीच तासाची चर्चा असते. मघाशी सुध्दा मी हा मुद्दा उपस्थित केला होता. दुसरी चर्चा होणारच नसेल तर हीच चर्चा सुरु ठेवावी.

**सभापती** : सदनाने केलेले जे नियम आहेत ते सर्वांना बंधनकारक आहेत. अडीच तासाची चर्चा तीन ते साडेतीन तासापर्यंत चालणे हे मी समजू शकतो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती...

पण अमर्यादपणे चर्चा सुरु ठेवली जात असेल तर त्याबाबतीतही आपणाला कुठे तरी बंधन घालावे लागेल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मराठी भाषेच्या प्रस्तावावरील चर्चा अपूर्ण ठेवून ती मंगळवार दिनांक 3 एप्रिल 2007 रोजी ठेवावी. कोकण विभागाच्या संदर्भातील प्रस्तावावरील चर्चा 4.00 वाजता सुरु करावी आणि ती अपूर्ण राहिली तर ती देखील चर्चा मंगळवारी ठेवावी.

**सभापती** : आपण जो पायंडा पाडत आहोत तो अनिष्ट आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा मराठी मातृभाषेचा प्रस्ताव आहे. .

**सभापती** : मराठी ही मातृभाषा आहे हे केवळ सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांचेच मत नाही तर माझे आणि माझ्यासह सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचेही तेच मत आहे. मराठीची अस्मिता महाराष्ट्रामध्ये राखली पाहिजे हे सर्वांचे मत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : हा केवळ अस्मितेचा प्रश्न नाही. महाराष्ट्र राज्य होऊन 47 वर्षे झाली. परंतु मराठी मातृभाषेची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही हा उद्देश आहे. अनेक सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर आपले विचार मांडवयाचे आहेत. त्यांना ते मांडण्याची आपण संधी द्यावी.

**सभापती** : आता पर्यंत या विषयावर साडेतीन तास चर्चा झालेली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : अनेक सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलण्याची इच्छा आहे. या सभागृहात आपल्या मातृभाषेबद्दलच्या व्यथा मांडायला आपण बंदी घालणार आहात काय ? त्यांना बोलण्याची संधी द्यावी किंवा त्यांना नाही म्हणून सांगावे.

**सभापती** :नवागत सन्माननीय सदस्य असतील तर त्यांना आपण तीन मिनिटांमध्ये थांबवितो. तेव्हा वेळेवर देखील मर्यादा घातली पाहिजे.

श्री.मधुकर सरपोतदार : आम्ही सर्व मर्यादा पाळलेल्या आहेत. परंतु ही मातृभाषे संदर्भातील चर्चा आहे..

**सभापती** : आपणा सर्वांना मराठी मातृभाषेचा स्वाभिमान आहे. मलाही मराठी मातृभाषेचा स्वाभिमान आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपणास धन्यवाद देतो. आपण मराठी भाषेच्या विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहात. सदनामध्ये मराठी संबंधी चर्चा होत आहे. या चर्चेच्या संदर्भाने आपल्या नावावर देखील इतिहास लिहिला जाईल..

**सभापती** : माझ्या नावाच्या रेकॉर्डला विशेष महत्व नाही..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मराठीला न्याय देण्याचा निश्चित प्रयत्न करीत आहात. माझी आपणास विनंती आहे की, प्रस्तुत चर्चा ही 4.00 वाजता थांबवून कोकणाच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करावी. त्या चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील. मराठी विषयावरील चर्चा मंगळवार दिनांक 3.4.2007 रोजी ठेवावी....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाकडील सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यांना देखील बोलण्यासाठी वेळ द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : मातृभाषा मराठीच्या संदर्भातील चर्चा 4.00 वाजेपर्यन्त सुरु राहील. उर्वरित चर्चा मंगळवार, दिनांक 3.4.2007 रोजी सकाळी दीड तासामध्ये मंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणासहीत संपविण्यात येईल. परंतु हा नियम होणार नाही. मातृभाषा मराठीच्या अनुषंगाने हा अपवाद राहील. बरोबर 4.00 वाजता कोकण विभागाच्या संदर्भात चर्चा सुरु होईल. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मराठी भाषा वापरण्यासंबंधी सर्व ठिकाणी, सर्व स्तरावर अंमलबजावणी व्हावी यासाठी आम्ही आग्रह धरीत आहोत. आमच्या मनात मराठी विषयी जी भीती होती ती प्रत्यक्षात यावयास लागली आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये राजकारभाराची भाषा मराठी आहे. ही राजकारभाराची भाषा हिंदी असावी अशा प्रकारचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते श्री राजहंस सिंह यानी आणला होता.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्याबरोबर अन्य काँग्रेस पक्षाचे नगरसेवक देखील आहेत. अडचण यामध्ये एकच आहे ती म्हणजे सगळ्या पक्षाचा हा जर विचार असेल तर, सगळ्यांनी एकत्रितपणाने बसून निर्णय घ्यायचा असेल तर ठीक आहे. खरे म्हणजे नव्याने निर्णय घ्यायची आवश्यकताच नाही. हे सगळे प्रस्ताव अगोदरच तयार झाले आहेत.

सभापती महोदय, हा सगळ्या पक्षांचा विषय आहे हे आम्ही मान्य करतो. एका पक्षाची ही मिरासदारी नाही. प्रस्ताव झालेले आहेत. सगळ्या महाराष्ट्रामध्ये राजभाषा मराठीच आहे. परंतु त्या भाषेची अंमलबजावणी करण्यामध्ये शासनाकडून कुचराई होते. शासनाकडून त्या बाबतीत गांभीर्याने पावले उचलली जात नाहीत अशा प्रकारची टीका आजपर्यंत या सदनामध्ये होत होती आणि त्या संदर्भात मी बोलत होतो. मराठी भाषेसंबंधी निरनिराळ्या वेळी जी जी चर्चा झाली त्यावेळी आम्ही विचार मांडले आहेत. "उधळलेलं घोडं" अशा प्रकारचे अतिशय महत्वाचे शीर्षक महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्राने देऊन अग्रलेख प्रसिध्द केला आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्रातील सनदी अधिकारी कार्यक्षमतेबद्दल प्रसिध्द असले, तरी अलिकडेच निवृत्त झालेले अतिरिक्त मुख्य सचिव नवीनकुमार यांच्या विधानामुळे नोकरशाहीचा घोडा उधळण्याच्या प्रयत्नात काही नोकरशहाच आहेत अशी भीती वाटू लागली आहे. नवीनकुमार राज्याच्या सेवेत 38 वर्षे होते. अनेक जबाबदारीच्या पदावर त्यांनी काम केले. त्यांना केंद्रातील कामाचाही अनुभव आहे. मुख्य सचिवपदाच्या शर्यतीत ते होते, पण त्यांचा नंबर लागला नाही. त्यांनी आयएएस ऑफिसर्स असोसिएशनच्या "हार्मनी" या डिसेंबरच्या अंकात व्यक्त केलेली मते महत्वाची ठरतात. केंद्रीय मंत्रिमंडळ व महाराष्ट्र मंत्रिमंडळ यांच्या बैठकीची तुलना करुन नवीनकुमार यांनी महाराष्ट्र कॅबिनेटच्या बैठकीच्या रचनेपासून कामकाजाच्या पध्दतीपर्यंत तीव्र नापसंतीचा सूर लावला आहे.

सभापती महोदय, एक आयएएस अधिकारी निवृत्त झाले, त्यांनी कॅबिनेट नोट इंग्रजीमध्ये लिहिली. केंद्राच्या कॅबिनेट नोट इंग्रजी भाषेत असतात. मी स्वत: केंद्र सरकारशी संपूर्ण पत्रव्यवहार मराठी भाषेतून करतो. ज्यावेळी आवश्यकता भासते त्यावेळी इंग्रजी भाषेतून पत्र लिहितो. केंद्र सरकारमध्ये मराठी भाषेचे इंग्रजी रुपांतर करुन देणारे ट्रान्सलेटर आहेत. केंद्रस्थानी देशातील सर्व संघराज्यातून लोकप्रतिनिधी निवडून येत असतात. मंत्रिमंडळामध्ये सर्व राज्यांना प्रतिनिधीत्व दिले जाते. त्यामुळे केंद्र सरकारच्या कारभारात सर्वसमावेशक म्हणून इंग्रजी भाषा वापरली जाते. सर्वांना समजावे म्हणून इंग्रजीमध्ये पत्रव्यवहार केला जातो. मी लोकसभेचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ 15:50

श्री.मधुकर सरपोतदार........

सदस्य असताना सभागृहात आग्रहाने आमच्या पक्षाच्या सदस्यांना बोललो होतो की, ज्यांना इंग्रजी बोलता येत नाही त्यांनी मराठी भाषेतून बोलावे. लोकसभेत मराठी भाषेचे इंग्रजीतून ट्रान्सलेशन करुन देण्याची व्यवस्था केलेली आहे. संघराज्यातून येणाऱ्या सर्व सदस्यांना त्यांच्या त्यांच्या भाषेत भाषण ट्रान्सलेशन करुन ऐकण्यास मिळण्याची सोय केलेली असते. असे असताना आमच्या महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी मराठीतून भाषण करावे म्हणून लोकसभेत मी एकदा 45 मिनिटे मराठीतून भाषण केले होते. महाराष्ट्रातून निवडून गेलेल्या काँग्रेस व अन्य पक्षाच्या सदस्यांना मी सांगितले, तुम्हाला इंग्रजी भाषा येत नसेल, हिंदी भाषा येत नसेल तर मराठीतून भाषण करावे.

सभापती महोदय, तामिळनाडू राज्याचे लोकसभा सदस्य त्यांच्या तामिळ भाषेतून भाषण करतात. केरळ राज्याचे लोकसभा सदस्य मल्याळी भाषेतून भाषण करतात. कर्नाटक राज्याचे लोकसभा सदस्य कानडी भाषेतून भाषण करतात. गुजराथ राज्याचे लोकसभा सदस्य गुजराथी भाषेतून भाषण करतात.......(अडथळा)..... सभापती महोदय, मुद्दा एकच आहे तो म्हणजे, हा विषय अत्यंत गंभीर व महाराष्ट्राच्या अस्मितेचा आहे. मी माझे भाषण केव्हाही संपवायला तयार आहे. आम्ही जे बोलत आहोत त्या आमच्या वेदना आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आम्ही फटके खाल्ले आहेत. गोळया लागून आमचे लोक मेले. आम्ही खूप भोगले आहे. इतकी वर्षे होऊनही मराठी भाषेची अंमलबजावणी होत नाही ही आमची वेदना आहे. हे आमचे दु:ख आहे हेच मला सांगावयाचे आहे. सभापती महोदय, आपण राज्य कारभारात आहात. आपण एकत्रितपणे हे प्रयत्न करतो का? कशाही परिस्थितीत महाराष्ट्रातील सगळा राज्य कारभार मराठीतूनच चालला पाहिजे असा आग्रह धरला आहे का? मी दुराग्रह म्हणत नाही, परंतु आपण आग्रह धरीत नाही. मी अतिशय वेदनेने ही भूमिका मांडतो आहे. अन्यथा काही कारण नव्हते. निरनिराळ्या वृत्तपत्रांनी सुध्दा या सगळ्या नोंदी घेतल्या आहेत. अनेक वृत्तपत्रातून अग्रलेख छापून आले.

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

तरी सुध्दा मराठी भाषेकडे जितके लक्ष द्यावयास पाहिजे तितके लक्ष दिले जात नाही हेच खरे आमच्या मराठीचे दु:ख आहे. मराठी भाषेला वैभव कसे प्राप्त होईल यांसदर्भातील काही उतारे मी सदनाच्या निदर्शनास आणू इच्छितो. सामना वृत्तपत्रातील काही मजकूर मी या ठिकाणी वाचून दाखवितो. यामध्ये म्हटले आहे की, "कोणत्याही राज्याचा नागरिक हा ज्या राज्यात वर्षानुवर्षे राहतो त्याला तेथील राज्याची मातृभाषा शिकणे अनिवार्य असावयास पाहिजे." त्यानंतर महाराष्ट्रात मराठी द्वेष असणा-यांनी या गोष्टीला सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला आहे. तामिळनाडू, कर्नाटक, पश्चिम बंगाल, आंध्र आदी राज्यांनी आपल्या मातृभाषेचा आग्रह इतका धरला की, आज त्यांच्या राज्यात आकाशवाणीवर त्यांच्याच भाषेचे वर्चस्व आहे. परंतु आम्ही मराठी भाषेची सक्ती करावयाची म्हटले तर आम्ही प्रांतवादी ठरतो, संकुचित ठरतो. परंतु दुस-यांनी असे केले तर ते संकुचित ठरत नाहीत, प्रांतियवादी ठरत नाही. त्यामुळे महाराष्ट्रात मराठी भाषेची सक्ती करावी ही आमची प्रामाणिक भूमिका आहे. राज्य सरकारने मराठी भाषेचा आदर केला तर सर्व राज्यभर मराठीची आपुलकी निर्माण होईल. परंतु मराठी भाषा टिकावी यासाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारचा प्रयत्न होतांना दिसत नाही. मराठी भाषा टिकवणे ही माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उपमुख्यमंत्र्यांची जबाबदारी आहे म्हणजे पर्यायाने शासन कर्त्यांची ही जबाबदारी आहे.

सभापती महोदय, यासंदर्भात माझ्याकडे लोकमतचे कात्रण आहे त्यातील काही मजकूर मी वाचून दाखवितो.

मराठी लोक मराठी भाषेबाबत कसे उदासीन आहेत, याची दोन उदाहरणे बघा. "हिंदी महासागरातील मॉरिशस बेटांवर मराठी लोक बहुसंख्येने राहतात. सतराव्या-अठराव्या शतकात इंग्रज व फ्रेंचानी भारतातून मोठया प्रमाणावर मजूर नेले त्यातून ही वसाहत उभी राहिली पण तेथे आज काय दिसते? मॉरिशसमध्ये आज कोणीही मराठी बोलत नाही. फ्रेंच आणि इंग्रजी ही तिथली व्यवहाराची भाषा आहे. अलीकडे मराठीचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न तेथील काही जागृत "मराठयां"नी सुरु केले आहेत, पण ते फारच तोकडे आहेत. जे मुंबईत पारशांना जमले ते मॉरिशसमध्ये मराठयांना जमले नाही. दुसरे उदाहरण ग्वाल्हेरच्या शिंद्यांचे. शिंदे मूळचे साता-यावजळील कन्हेरखेडचे पाटील. पेशवाईत राणोजीराव शिंदे यांनी मध्य भारतात नव्या दौलतीची स्थापना केली. पानिपतवर अब्दालीशी मुकाबला करतांना धारातीर्थी पडलेल्या दत्ताजी

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

शिंदे यांचा इतिहास सर्वांनाच माहीत आहे. "मरहट्टे, क्या हमसे और लडेगा..." असे दर्पोद्‌गार अब्दालीने काढले. त्याला "बचेंगे तो और भी लडेंगे" असे बाणेदार उत्तर दत्ताजीने दिले. पुढे शिंद्याची दौलत नर्मदेपासून यमुनेपर्यंत विस्तारली. पण शिंद्यांच्या दौलतीबरोबर मराठीचा विस्तार झाला काय? अलीकडे तर शिंद्याचे मराठीपण "शिंदेशाही" पगडी पुरतेच शिल्लक राहिले आहे. शिंदे आता "शिंदे" राहिले नाहीत. ते "सिंधिया" झाले आहेत. पानिपतावर दत्ताजी धारातीर्थी पडले आणि ग्वाल्हेरात मराठी."

सभापती महोदय, देशामध्ये किंवा जगामध्ये ज्या ज्या ठिकाणी मराठी लोक एकत्र राहतात तेथे मराठी महामंडळ निर्माण करतात. उत्तरप्रदेशात महाराष्ट्र महामंडळ आहे, पश्चिम बंगालमध्ये मराठी महामंडळ आहे, अमेरिकेत सुध्दा मराठी महामंडळ आहे, ऑस्ट्रेलियात सुध्दा मराठी महामंडळ आहे, अंदमान-निकोबार येथे सुध्दा मराठी महामंडळ आहे. परंतु आम्ही ज्यावेळेस बाहेर जातो त्यावेळेस आम्ही सगळे एकत्र येतो परंतु महाराष्ट्रात मराठीचा विषय येतो त्यावेळेस त्यावेळेस आम्ही एकत्र येत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सर्वांनी एकत्र येऊन मराठीसाठी लढले पाहिजे असे सांगितले आहे. त्यामुळे मी सांगू इच्छितो की, मराठीसाठी सर्वांनी एकत्र बसून लढा दिला पाहिजे. आम्हीच केवळ मराठीचे कैवारी आहोत, मराठीची मिरासदारी आमचीच आहे असे आम्ही कधी म्हणत नाही. परंतु त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपल्या विधान मंडळात अनेक विधेयके तसेच प्रस्ताव इंग्रजीत येत असतात त्याला माझा विरोध आहे. या ठिकाणी सुध्दा विधेयक हे मराठीतून आले पाहिजे. विधेयक इंग्रजीत न येता मराठीत आणावेत अशी माझी सूचना आहे. तुम्ही मराठीची अंमलबजावणी करावयाची ठरवली तर ती काटेकोरपणे करा. मराठीतून बीले आली तर आम्ही मराठीतून चर्चा करु. सगळ्या राज्यात न्यायालयाचा कारभार मराठीतून झाला पाहिजे असे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.

आज महाराष्ट्रात काय दिसते? 1 मे 1960 ला मराठी राज्याची स्थापना झाली. मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. मात्र तिला राजवैभव मिळाले नाही. मराठीच्या नावाची द्वाही ख-या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

अर्थाने राज्यात फिरलीच नाही. 47 वर्षात आम्ही न्यायालयीन कामकाजही मराठीत करु शकलो नाही. सुप्रीम कोर्टाने आणि हाय कोर्टाने निर्णय दिलेला आहे की, महाराष्ट्रातील सर्व न्यायालयाचे कामकाज मराठी भाषेतून चालले पाहिजे,

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

असा आग्रह आपण का करत नाही ? सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, उच्च न्यायालयात वापरल्या जाणाऱ्या इंग्रजी शब्दांचे मराठीत भाषांतर केल्याशिवाय त्याठिकाणी मराठीतून कामकाज होणार नाही.

**सभापती** : मी या प्रस्तावावरील चर्चा येथेच थांबवित आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे ऑन लेग आहेत.

--------------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पाठयपुस्तकातील लैगिंक शिक्षणाबाबतचा मजकूर वगळण्याबाबत**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी काल सभागृहात औचित्याच्या मुद्याद्वारे सेक्स एज्युकेशनचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी आपण या संदर्भात निवेदन करावे असे निदेश दिले होते. पण आता मला अशी माहिती मिळाली की, विधानसभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित झाला आणि त्यासंबंधी सरकारने निर्णय जाहीर केलेला आहे. एकाच विषयाबाबत विधानसभा सभागृहात निर्णय होत असेल आणि तो येथे जाहीर देखील व्हावयास पाहिजे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी सुध्दा या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यासाठी सचिवांकडे चिठ्ठी दिली होती, परंतु ती त्यांनी आपल्याकडे दिली नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, त्यांनी दिलेली चिठ्ठी माझ्याकडे पोहोचलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेता यांनी माझ्याकडे कोणत्याही बाबतीमध्ये बोलण्यासाठी परवानगी मागितली तर प्रथम मी त्यांना संधी देणार. परंतु याचा अर्थ मी आपणा सर्वांना परवानगी देणार असा होत नाही.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी निवेदन करणार होतो. परंतु प्राथम्य न मिळाल्याने मला निवेदन करता आले नाही.

**सभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, जर विधानसभा सभागृहात निवेदन करण्यात आले असेल तर ते येथे सुध्दा झाले पाहिजे.

प्रा.वसंत पुरके ( शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, निवेदनाच्या प्रती वितरीत करण्याची गरज नसेल आणि सभागृहाची मान्यता असेल तर मी यासंबंधीची माहिती देतो.

सभापती महोदय, विधानसभा सभागृहात लैगिंक शिक्षणासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. त्यावेळी उत्तर देताना सांगण्यात आले की, लैगिंक शिक्षणासंदर्भातील अभ्यास पूर्णत: रद्द करण्यात येईल. सीबीएससी आणि आयसीएमसीमध्ये लैगिंक शिक्षणासंदर्भात जो अभ्यासक्रम आहे त्यामध्ये फारच स्पष्ट आणि परखड भाषा वापरली गेल्यामुळे काहींच्या भावना दुखावल्या गेल्या. त्यामुळे आम्ही केंद्र सरकारला देखील हा अभ्यासक्रम रद्द करण्याबाबत कळविणार आहोत.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण सी.बी.एस.सी. आणि आय.सी.एम.सी.चे नॉर्म्स पाहिले तर त्यामध्ये महाराष्ट्रासाठी त्रिसूत्री भाषा नाही. कर्नाटक राज्याने केंद्रात त्रिसूत्री भाषेचा कायदा पास करुन घेतलेला आहे याची नोंद घ्यावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, कर्नाटक राज्यांनी जी भूमिका स्वीकारली तीच भूमिका महाराष्ट्र सरकार घेईल.

-----------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर ( सुधारणा ) विधेयक

L.A. BILL N0.XIII OF 2007

A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS TRADES, CALLLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975 AND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

श्री.जयंत पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007 चे वि.स.वि.क्र. 13- महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, 1975 आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यांमध्ये आणखी सुधरणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये फक्त दोनच सुधारणा आहेत. आपण अर्थसंकल्पामध्ये व्यवसाय कर कायद्याखाली सन 2002 च्या आधी जे कोणी व्यवयास करीत असतील त्यांना 2002 नंतर कर भरणे आवश्यक आहे आणि त्यापूर्वीच्या व्यवसायिकांना माफी द्यावी अशी ॲमनेस्टी आणलेली आहे. आता आपण सेल्सटॅक्स विभागाची पुनर्रचना करताना प्रोफेशनल टॅक्ससाठी वेगळी विंग काढलेली आहे. व्यवसाय कर कायद्याखाली 31 मार्च 2004 पर्यंतच्या कालावधीतील प्रलंबित निर्धारणाचे आदेश काढण्याची आवश्यकता आहे अशा विवरणपत्रांची संख्या जवळपास 1 लाख 48 लाख 596 आहे. 500 कोटी महसूल असावा असा अंदाज आहे. या विवरणपत्रांची संख्या

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...........

विचारात घेता 31 मार्च 2007 पर्यंत निर्धारणा आदेश काढणे शक्य नाही. म्हणून आपण या विधेयकाच्या माध्यमातून 31 मार्च 2008 पर्यंत मुदत वाढवित आहोत. राज्यात व्हॅट आल्यानंतर सेल्स टॅक्स विभागाने सेल्स टॅक्स व व्हॅट कायद्यांतर्गत ॲससमेंटची दोन्ही कामे केली.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

त्यामुळे व्यवसाय करासंदर्भातील ज्या प्रलंबित निर्धारणा आहेत, त्या करण्यासाठी आणखी एक वर्ष वाढवावे, अशी माझी सभागृहाला विनंती आहे. तसेच, मोटार स्पीरिट कायद्यामध्येही निर्धारणेची मर्यादा दिनांक 31.3.2007 पर्यंत होती, तीही आपण दिनांक 31.3.2008 पर्यंत वाढवत आहोत. कारण, व्हॅट आणि सेल्स टॅक्सचे डबल काम ज्यावेळी आपण करत होतो, त्यावेळी या क्षेत्रातील विशेषत: मोठयाप्रमाणात कर भरणाऱ्या सरकारी क्षेत्रातील ज्या स्टील कंपन्या आहेत त्यांचे असेसमेंट करताना महाराष्ट्रभर पसरलेल्या पेट्रोलपंपापर्यंत जाऊन त्यांचे असेसमेंट करावे लागते. दर महिन्याला कराची आकारणी करताना, पेट्रोल आणि डिझेल किती ट्रान्सफर केले याआधारे ते अकाऊंट देतात आणि त्याप्रमाणे कर भरला जातो. त्यामुळे निर्धारणेमध्ये शक्यतो फारमोठे फरक येत नाहीत. ही निर्धारणा आपण थोडीशी बाजूला ठेवलेली आहे. हे करदायित्व नसणारे शेतकरी आहेत. म्हणजे, मच्छिमारी करणाऱ्या संस्थांना पूर्वी आपण पेट्रोलच्या बाबतीत सबसिडी देत होतो. परंतु आता ती देत नाही. मत्स्यविकास विभागामार्फत सबसिडी देत होतो. याबाबतीत अंमलबजावणी करत असताना, जादा काम असल्यामुळे आपण या निर्धारणा थोडयाशा बाजूला ठेवल्या होत्या. म्हणून कलम 96 (1) अंतर्गत आपण ही नवीन सुधारणा याठिकाणी आणलेली आहे. या निर्धारणेची मर्यादा दिनांक 31.3.2007 पर्यंत होती, ती दिनांक 31.3.2008 पर्यंत वाढवावी, अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मला फक्त दोन सूचना करावयाच्या आहेत. आपण निर्धारणा करण्यासाठीचा कालावधी एक वर्षासाठी वाढवत आहात, ही स्वागतार्ह सूचना आहे. परंतु यामध्ये अंमलबजावणी करत असताना प्रत्येक कंपन्यांच्या अंतर्गत काम करणाऱ्या प्रत्येक एम्प्लॉईजपर्यंतचे सगळे जूनेखाने उकरुन डायरेक्ट प्रोफेशन टॅक्स भरला आहे की नाही, इथपर्यंत हे ठीक होते किंवा एम्प्लॉईजचे जनरल चेकअप होणे इतपर्यंत ठीक होते. परंतु यामध्ये वेगळयाच पध्दतीची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच, आपण मोटार स्पीरिट टॅक्सला व्हॅटमधून वगळले आहे. परंतु आज ग्रामीण भागातील पेट्रोल पंपावरुन पेट्रोल किंवा डिझेल घेऊन त्याचे इतर ठिकाणी मोठयाप्रमाणात रिसेल होत आहे, ही वस्तुस्थिती आहे. ती आपण नाकारु शकणार नाही. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये व्हॅट काढण्यामागची आपली नेमकी भूमिका काय ? आपण कंट्रोल प्राईज देता, इथपर्यंत ठीक आहे. परंतु 100 टक्के सेल होईल याबद्दल आपण काही सांगू शकता का ? आजही 25-30 टक्के सेल मोटार स्पीरिटमधून बेकायदेशीर होतो, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून त्याला आपण व्हॅटमध्ये आणले तर निदान बिल तरी ठेवावे लागेल. त्या पध्दतीने त्यांना व्यवसाय तरी करता येईल, त्यामुळे याबाबतीत माननीय वित्त मंत्र्यांनी फेरविचार करावा, अशी माझी विनंती आहे. तसेच, आपण महाराष्ट्रातील कंझम्शन आणि परचेसची आकडेवारी पाहिली तर त्यामध्ये तफावत असल्याचे आपणांस दिसून येईल. आज ग्रामीण भागात दिवसेंदिवस औद्योगिकीकरण वाढत आहे, दिवसेंदिवस जनरेटरची गरज वाढत आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, मी याठिकाणी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्यासंबंधीची आकडेवारी माननीय मंत्री महोदयांनी पुढील अधिवेशानामध्ये तरी पटलावर ठेवावी. यामध्ये गॅप किती आहे, कंझम्शन ऑन रेकॉर्ड किती होते आणि महाराष्ट्रातील सगळ्या मोटारीमधून होणारे कागदोपत्री कंझम्शन किती आहे ? याची माहिती द्यावी. माझ्या माहितीप्रमाणे, यातून आपल्याला 1 हजार कोटी रुपयांचा टॅक्स मिळू शकेल. ते आपण ओपनआऊट करावे. कंट्रोल सिस्टीमऐवजी मुक्त सिस्टीम करावी आणि व्हॅटमध्ये सगळयांचाच समावेश करावा, अशी सूचना करुन मी येथेच थांबतो.

-----

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या दोन्ही सूचना फार चांगल्या आहेत. प्रोफेशनल टॅक्सच्या बाबतीत त्यांनी एक सूचना केली आहे. आपण राज्यात सेल्स टॅक्स डिलिट करतांना व कराची पुनर्रचना करताना प्रोफेशनल टॅक्स कलेक्ट करण्यासाठी विशेष यंत्रणा निर्माण केली पाहिजे, असे धोरण स्वीकारले आहे, कारण हा टॅक्स आता अंडर सोर्स राहिला नसून मेजर सोर्स झाला आहे. या विभागाची पुनर्रचना करतांना यासाठी नवीन पोस्ट तयार केली आहे. त्यानुसार प्रमुख आय.ए.एस.अधिकारी हे आयुक्त असतील. तसेच उपआयुक्त ही स्पेशल पोस्ट देखील तयार केली आहे. हे अधिकारी केवळ प्रोफेशनल टॅक्ससाठीच काम करतील. त्यांना व्हॅट वगैरेचे काम नसावे, अशा प्रकारची रचना केली आहे. या प्रस्तावाला राज्याच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. ज्यावेळी मुख्यमंत्री महोदय नवीन पोस्टिंग ऑर्डर काढतील त्यावेळी या पदावर नियुक्ती केली जाईल. प्रोफेशनल टॅक्स ज्या कंपन्या भरतात, ज्या लायबल आहेत त्यांची इंटरनल तपासणी करतांना बहुतेक सर्व रेकॉर्डवर असणा-या प्रोफेशनल टॅक्स धारकांच्या बाबतीत करनिर्धारण करणे सोपे असते. करनिर्धारण करतांना कंपनीचे रेकॉर्ड बधितले तरी होते. पण त्याही पलिकडे जाऊन अधिक संख्येने कर्मचारी नियुक्त केले असतील तर ते इल्लिगल होते व हा वर्ग फाईंड आऊट करणे व त्यात ट्रान्स्फरन्सी आणणे आवश्यक आहे. ही सर्व पद्धत ट्रान्स्फरन्ट करण्याचा आमचा प्रयत्न आहे. दुसरा महत्वाचा भाग आहे की, जे असंघटित व्यावसायिक आहेत, जसा डॉक्टर वर्ग आहे, ज्यांनी रजिट्रेशन केले नाही, अशा रेकॉर्डवर न आलेल्यांसाठी आपण योजना आणत आहोत. हे व्यावसायिक रेकॉर्डवर आले तर 100 ते 300 कोटी रुपयांपर्यन्त उत्पन्न वाढू शकेल. त्याचबरोबर बाजाराचा योग्य सर्व्हे करणे, वॉर्डवाईज सर्व्हे करणे हा आमच्या कार्यक्रमाचा पुढचा भाग आहे. यादृष्टीने सेल्स टॅक्स विभागाचे रिस्ट्रक्चरिंग केले आहे व त्यामध्ये या बाबींचा पुरेसा विचार केला आहे. प्रोफेशनल टॅक्स हा विषय अतिशय चांगल्या पद्धतीने हाताळण्याचा प्रयत्न राज्य सरकार करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडला आहे त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, पेट्रोल व डिझेल यावरील किमती या ॲडमिनिस्टर्ड आहेत. त्यामुळे व्हॅल्यु ॲडिशन करतांना कंपनी ते पेट्रोल पंप अशी व्हॅल्यु ॲडेड सेलिंग प्राईस मिळते. यानुसार व्हॅल्यु ॲडेड टॅक्समध्ये वेगवेगळे प्रयत्न आपण करीत आहोत. ॲडमिनिस्टर्ड प्राईस असल्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील..........

पेट्रोल, डिझेलवर फक्त फर्स्ट पॉईंट टॅक्स आपण कलेक्ट केला आहे. रॉकेलवर व्हॅट लागू आहे. रॉकेल बहुतेक ठिकाणी भेसळीसाठी वापरले जाते व रॉकेल ही कमॉडिटी व्हॅटमध्ये आहे. पेट्रोल डिझेलवर ॲडमिनिस्टर्ड प्राईस असल्यामुळे त्यावर नवीन नियंत्रण आणलेले नाही. माझी सभागृहाला विनंती आहे की, सभागृहाने या विधेयकाला मान्यता द्यावी.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----------

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आमदार निधीची रक्कम वाढविण्याबाबत माननीय वित्तमंत्र्यांची घोषणा**

श्री.जयंत पाटील (अर्थमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेमध्ये काल अर्थसंकल्पावर झालेल्या सर्वसाधारण चर्चेच्या उत्तराच्या भाषणात विधानसभा व विधान परिषद सदस्यांचा आमदार निधी 80 लाख रुपयांवरुन 1 कोटी रुपये केल्याबाबतची घोषणा मी केली होती. ही घोषणा काल मला विधानपरिषदेत करता आली नव्हती, ती मी आता करीत आहे.

---------------

यानंतर कुमारी धनश्री...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी:** : निधीअभावी व नियोजनाअभावी सर्व स्तरावर कोकण प्रदेशाकडे शासनाचे होणारे जाणुनबुजून दुर्लक्ष.

**मु.शी** : निधीअभावी व नियोजनाअभावी सर्व स्तरावर कोकण प्रदेशाकडे शासनाचे होणारे जाणुनबुजून दुर्लक्ष .या विषयावर सर्वश्री. गुरुनाथ कुलकर्णी, विनोद तावडे, श्रीमती सुधा जोशी, परशुराम उपरकर, श्रीमती नंदा म्हात्रे, मधुकर चव्हाण, जितेंद्र आव्हाड, दिपक सावंत, भास्कर जाधव, रामनाथ मोते, जयंत पाटील, संजय केळकर, सुधीर सावंत, राजन तेली, श्रीमती फौजिया खान, वि.प.स. यांचा प्रस्ताव

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्ती ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडतो.

कोकणाला 720 किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभलेला असून व पर्यटनांची मोठी संधी उपलब्ध असतानासुध्दा हा भाग दुर्लक्षित असणे, किनारपट्टीवर मत्स्यव्यवसाय मोठया प्रमाणात सुरु असून डिझेलवर सबसीडी, मच्छीमारांना जाळी व अन्य सोयी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता ,पर्सनेटची जाळी टाकून या राज्यातील पारंपारिक मच्छीमारांना व्यवसायापासून वंचित ठेवण्याचे सुरु असलेले प्रयत्न, वैधानिक विकास मंडळामार्फत कोकणाला अत्यंत अल्पप्रमाणात निधी उपलब्ध होणे, कोकणाला स्वतंत्र वैधानिक मंडळ द्यावे असा दोन्ही सभागृहात एकमताने निर्णय होऊनसुध्दा त्यावर अद्याप कारवाई न होणे, रस्ते, आरोग्य, तांत्रिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि सिंचन या विभागात मोठा अनुशेष असणे, सिंचनाच्या संदर्भात 1200 कोटीपेक्षा जास्त अनुशेष असतानाही कोकणातील तिलारी, ताळांबा, महमदवाडी, अर्जुन पाटबंधारे प्रकल्पांवर पुरेसा निधी न दिल्यामुळे सिंचन प्रकल्प व इतर प्रकल्प अडचणीत येणे , सन 1980 पासून मुंबईपासून गोव्यापर्यंत सागरी महामार्ग तयार करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला, परंतु 25 वर्षे होऊनही या प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे या प्रकल्पावरील पूल, रस्ते यांची कामे अर्धवट अवस्थेत असणे,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी.......

कोकणामध्ये एकही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणे, सिंधुदुर्ग जिल्हा हा 'पर्यटन जिल्हा' म्हणून घोषित करण्यात आला, परंतु पर्यटनास आवश्यक पायाभूत सोई- सुविधा अपुऱ्या निधीमुळे होऊ शकल्या नाहीत परिणामी तेथे पर्यटक येण्यास नाखूष असणे कोकणपट्टीकडे राज्याला आर्थिक बळ देण्याची क्षमता असताना अपुऱ्या निधीमुळे आणि उत्तम नियोजनाअभावी हा भाग जाणूनबुजून दुर्लक्षित ठेवण्यात येत असल्याची भावना कोकणातील जनतेच्या मनात वाढीस लागणे, कोकणातील छोटे -मोठे कारखाने , निरनिराळया औद्योगिक वसाहती बंद पडलयामुळे बेकारीचा प्रश्नही मोठया प्रमाणावर निर्माण होणे, यावर उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता व यावर शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हा अडीच तासाच्या चर्चेचा प्रस्ताव मागील दोन अधिवेशनामध्ये आलेला होता आणि तो सातत्याने दोन वेळेला तहकूब करण्यात आला होता. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या सभागृहामध्ये मुख्यमंत्री हजर असतील तरच आम्ही या प्रस्तावावर चर्चा करु अशी मागणी दोन अधिवेशनामध्ये केली होती. हा जो कोकणासंबंधीचा प्रस्ताव आहे त्यात कोकणच्या बंदरांचा, मच्छीमारांचा आणि पर्यटनाच्या समस्यंचा समावेश आहे . त्या संबंधी उत्तर देण्याच्या दृष्टीने किंवा सदस्यांचे मुद्दे लिहून घेण्याच्या दृष्टीने कोणतेही मंत्री या सभागृहामध्ये उपस्थित नाही. माझे असे स्पष्ट मत आहे की, कोकणावर अन्याय झालेला आहे आणि कोकणाची आर्थिक प्रगती व्हावयाची असेल तर या प्रस्तावावर चर्चा होऊन ठामपणे उत्तर दिले पाहिजे. म्हणून जोपर्यंत सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात येत नाही, तोपर्यंत या प्रस्तावावर चर्चा होऊ नये अशी माझी विनंती आहे. सन्माननीय मंत्र्यांच्या गैरहजेरीत जर आपण ही चर्चा घेतली तर या चर्चेचा काहीही अर्थ राहणार नाही. येथे फक्त चर्चा होईल मात्र त्यावर शासनाकडून काहीही कारवाई होणार नाही.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी या ठिकाणी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत ते अतिशय साधार आहेत. कोकणाचे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महत्वाचे योगदान आहे. महाराष्ट्रातील अनेक सुखदु:खांमध्ये, व्यथांमध्ये, अडीअडचणींमध्ये कोकणचा नेहमीच समावेश असतो.

..3..



श्री. भास्कर जाधव .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

त्याच कोकणातील प्रश्नांवर चर्चा होत असताना 3 वेळा हा प्रस्ताव पुढे ढकलला जातो ,ही अत्यंत वेदनादायी गोष्ट आहे. या ठिकाणी केवळ चर्चा होऊन त्या विषयी कोणतीही कारवाई न होणे , हे आम्हाला अपेक्षित नाही. म्हणून या सभागृहामध्ये या प्रस्तावाशी संबंधित असणारे सगळे माननीय मंत्री व आदरणीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहावे व या प्रस्तावातील चर्चेवर गांभीर्याने विचार करावा.

यानंतर कु. खर्चे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव........

कोकण फुटून वेगळा होण्याची गोष्ट करीत नाही,बाजूला जाण्याची गोष्ट करीत नाही म्हणून कोकणाच्या विकासाच्या बाबतीत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता नाही, अशी जर कोणाची भूमिका झाली असेल तर ती चूकीची आहे. मी विधानसभेमध्ये असतांना ज्यावेळी युती शासनाचे सरकार होते त्यावेळी देखील मी या विषयाच्या बाबतीत तत्कालीन आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या विरोधात गेलो होतो. कोकणाच्या विकाससंबंधीच्या प्रस्तावावरील चर्चा ऐकण्याकरिता माननीय मुख्यमंत्री महोदय व संबंधित विभागाचे मंत्री ज्या वेळी उपस्थित होतील, त्याचवेळी ही चर्चा सुरु होईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी या सभागृहामध्ये नियम 260 अन्वये जो कोकणाच्या विकाससंबंधीचा जो प्रस्ताव मांडला आहे तो अतिशय महत्वाचा प्रस्ताव आहे. जशी माय मराठी भाषा आमची वेदना आहे तशीच कोकण ही देखील आमची वेदना आहे. कोकण हा महाराष्ट्रातील अत्यंत दुर्लक्षित असा विभाग आहे. कोकणातील आमदार येथे निवडून येतात, कोकणातील मंत्री देखील विविध खात्यांच्या मंत्रीपदावर येतात. स्वत:ला कोकणाचे पालकमंत्री म्हणवणारे कोकणाचे पालकत्व स्वीकारीत नाहीत. यापूर्वी या प्रस्तावावरील चर्चा दोन वेळा पुढे ढकलण्यात आली होती. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांचा देखील असा आग्रह होता की, सदर चर्चेला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उपस्थित राहावे. माननीय मुख्यमंत्री साहेबांच्या अनुपस्थितीत चर्चा घेऊन कोणत्यातरी खात्याचे मंत्री या चर्चेतील मुद्दे लिहून घेऊन माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे देतील व त्यावर थोडेसे उत्तर देऊन माननीय मुख्यमंत्री महोदय आमच्या डोळयाला पाणी लावतील. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळाने या प्रस्तावावरील चर्चा गांभीर्याने ऐकून त्यावर पक्का निर्णय घेऊन, ठोस धोरण आखून कोकणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. माननीय पर्यटन मंत्र्यांनी देखील या चर्चेकरिता उपस्थित राहण्याची आवश्यकता आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, या चर्चेकरिता आवश्यक खात्यांच्या मंत्रीमहोदयांना आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांना उपस्थित राहावयास सांगावे.

श्री.मधुकर चव्हाण : महोदय, सर्वप्रथम कोकणाच्या विकाससंबंधीची चर्चा या सभागृहामध्ये आपण सुरु केली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. महाराष्ट्र राज्यात स्वर्गीय मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांनी अमृताचा कलश आणला. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी हुतात्मा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

झालेल्या 105 हुतात्म्यांपैकी 99 जण कोकणातील होते. या राज्यात ज्यावेळी गिरणी कामगारांचे आंदोलन झाले, त्यावेळी देखील त्यामध्ये कोकणातील माणूस अग्रणी होता. माननीय मुख्यमंत्री महोदय हे या चर्चेस उपस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे. हा प्रस्ताव म्हणजे काही "चटावरचे श्राध्द नाही की चटकन उरकले आणि संपले." आम्हाला या विषयावर ठोस निर्णय हवा आहे, अशी माझी या ठिकाणी कळकळीची विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सदर प्रस्तावाबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना या सभागृहामध्ये व्यक्त केल्या त्या भावनांशी मी सहमत आहे. मागील तीन अधिवेशनापासून हा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे प्रलंबित आहे, माननीय मुख्यमंत्र्यांनी सदर प्रस्तावाच्या चर्चेला सभागृहामध्ये उपस्थित राहण्याचे आश्वासन देऊनही ते उपस्थित नाहीत. कोकणाच्या विकासासंबंधी बोलतांना पर्यटन,फलोद्यान,बांधकाम,पशुसंवर्धन,ऊर्जा अशी चार - पाच खाती अतिशय महत्वाची आहेत. कोकणाच्या विकासाविषयीच्या चर्चेला कोणीही सिरियसली घेत नाही. या अधिवेशनामध्ये मांडल्या गेलेल्या या कोकणाच्या विकासाच्या प्रस्तावाला सिरियसली घेण्यात यावे, अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

श्री.उल्हास पवार : माननीय सभापती महोदय, आज या ठिकाणी या प्रस्तावाबाबत सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी,सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील व अन्य सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या भावनांशी मी सहमत आहे. या सभागृहामध्ये जेव्हा एका विषयावर वेगवेगळया पक्षाचे लोक एकत्र येऊन चर्चा करीत असतात, तेव्हा ती चर्चा सामोपचाराने घेतली पाहिजे. या चर्चेला माननीय मुख्यमंत्री वा इतर संबंधित खात्यांचे मंत्रीमहोदय उपस्थित नसतील तरीसुध्दा सदर चर्चा ही सामोपचराने व गांभीर्याने घडवून आणली पाहिजे, अशी चर्चा मी व माननीय मुख्यमंत्री महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी लॉबीमध्ये बोलत असतांना झाली होती.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर सभागृहामध्ये कुठे आहेत ? ते तर सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

यानंतर श्री.बोरले......

-

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझा मुद्दा ऐकून घ्यावा. ज्यावेळी माननीय सभापतींच्या दालनामध्ये चर्चा झाली त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी उपस्थित होते आणि सर्वांनी हे मान्य केलेले आहे. या प्रस्तावावर गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे आणि योग्य उत्तरही मिळाले पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी व इतर सन्माननीय सदस्यांनी कोकणाच्या विकासाचा प्रस्ताव मांडलेला आहे. चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांची उपस्थिती आवश्यक आहे, असे ठरले होते. त्याचे कारण असे आहे की, कोकणातील अनेक प्रकल्प अपूर्ण आहेत. विविध विभागांशी निगडीत विषय या प्रस्तावामध्ये आहेत. प्रस्तावातील सर्व विषय नवीन आहेत. त्यावर निर्णय झालेला नाही. कोकणाच्या विकासाच्या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित राहिले तर बरे होईल, अशी सर्व सन्माननीय सदस्यांची भावना आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कोकणाच्या विकासाचा प्रस्ताव अतिशय महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांच्याबरोबर या विषयावर आधी चर्चा झाली होती. सन्माननीय सदस्यांनी कोकण विकासाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु करावी, अशी माझी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. कोकणाला न्याय द्यावयाचा असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर दिले पाहिजे, ही मागणी रास्त आहे. माननीय मुख्यमंत्री चर्चेला उत्तर देणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात करावी, अशी माझी विनंती आहे. संबंधित विभागाचे जे मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत त्यांच्या विभागाशी संबंधीत असलेल्या सर्व मुद्यांची नोंद घेतली जाईल. या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मुख्यमंत्री महोदय उत्तर देणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात करावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी प्रस्ताव मांडल्यानंतर सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली की, चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित राहिले तर कोकणाच्या विकासाच्या चर्चेला महत्व प्राप्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .........

होईल. मघाशी माझ्या दालनात अनुशेषाच्या विषयावर चर्चा झाली त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार उपस्थित होते. त्यावेळी अशी चर्चा झाली की, कोणत्याही परिस्थितीत आपण आज कोकण विकासाचा प्रस्ताव चर्चेला घेऊ. माननीय मुख्यमंत्री चर्चेला उत्तर देणार आहेत. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी काल कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये हा विषय उपस्थित केला होता. त्यांची अशी अपेक्षा होती की, कोकण विकासाच्या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे. माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देण्याचे मान्य केले आहे. चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये येणार आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहामध्ये येणे शक्य असेल तर माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी तसा प्रयत्न करावा. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सभागृहामध्ये तीन कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सभागृहात तीन कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत. एखाद्या प्रश्नावर सभागृहात उत्तर देण्याची मंत्रिमंडळातील सदस्यांची संयुक्त जबाबदारी आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी चर्चा सुरु करावी. मी मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात येण्याबाबत प्रयत्न करतो. माननीय मुख्यमंत्री या चर्चेला उत्तर देणार आहेत.

**सभापती** : सभागृहामध्ये तीन कॅबिनेट मंत्री उपस्थित असल्याने विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आपल्या बाकावर बसावे व सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी चर्चा सुरु करावी.

( विरोधी पक्षाचे सदस्य उभे राहून घोषणा देतात .....अडथळा)

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण निर्णय दिलेला आहे व प्रथम सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना या विषयावर बोलण्याबाबत विनंती केलेली आहे. माझी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना भाषण करताना रोखू नये. माननीय मुख्यमंत्र्यांची या विषयावर उत्तर देण्याची तयारी आहे. सन्माननीय सदस्यांनी चर्चा सुरु करावी.

( सन्माननीय सदस्य "वेल" मध्ये येऊन घोषणा देऊ लागतात...... अडथळा )

**सभापती** : याबाबत माझ्या दालनात चर्चा झालेली आहे, तरी सन्माननीय सदस्यांनी कृपया शांतता राखावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमचा आग्रह कायम आहे की, ही चर्चा सुरु असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असले पाहिजे. मागच्या अधिवेशनात माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते की कोकणाच्या संदर्भातील या विषयावर होणाऱ्या चर्चेच्या वेळी ते पूर्णवेळ सभागृहात उपस्थित राहतील. माननीय मुख्यमंत्र्यांनी असे आश्वासन दिले होते, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी व श्री.परशुराम उपरकर हे उपस्थित होते.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहात तीन कॅबीनेट मंत्री उपस्थित आहेत. मंत्रिमंडळाची संयुक्त जबाबदारी नाही का ? मंत्रिमंडळाची संयुक्त जबाबदारी लक्षात घेता त्यांचाही या चर्चेशी संबंध आहे, त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसून घ्यावे आणि ही चर्चा सुरु करावी.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ KTG/

( विरोधी पक्ष सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री.हर्षवर्धन पाटील : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कोकणाला न्याय पाहिजे असेल तर चर्चा सुरु करावी. कोकणला न्याय कशाच्या आधारे द्यावयाचा ? सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात मुद्दे मांडल्यावर माननीय मुख्यमंत्री यावर उत्तर देतील व कोकणास न्याय देतील. मी माननीय मुख्यमंत्री सभागृहात येण्याबाबत प्रयत्न करीत आहे. पण सन्माननीय सदस्यांनी चर्चा तर सुरु करावी.

नंतर श्री.सुंबरे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( काही सन्माननीय सदस्य 'वेल' मध्ये घोषणा देत असतात ... )

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण प्रथमत: शांत रहावे आणि एक मिनिट माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मी आपल्याला प्रथमत: सांगू इच्छितो की, जेव्हा माझ्या दालनामध्ये मी चर्चेला बोलावितो तेव्हा सदनातील सर्व सदस्यांना नाही तर त्यांच्या नेत्यांना बोलाविण्याची पद्धत आहे. .....

( अडथळा )

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावावर सदस्यांची नावे आहेत किंवा नाहीत हा विषय महत्त्वाचा नाही. परंतु येथे माननीय विरोधी पक्षनेते आहेत. पण तरीही सन्माननीय सदस्य श्री.तावडे म्हणतात की, त्यांचा काय संबंध आहे या विषयाशी. त्यांनी असे म्हणणे बरोबर नाही. वास्तविक पाहता सन्माननीय श्री.फुंडकर हे त्यांचे नेते आहेत आणि विरोधी पक्षनेतेदेखील आहेत. विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी आपल्या दालनामध्ये आपल्याशी या विषयावर चर्चा केली आहे. त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी हेही उपस्थित होते. त्यांनी सांगितले होते की, मुख्यमंत्री स्वत: या चर्चेच्या वेळी हजर असावयास पाहिजेत. तेव्हा सभापती महोदय, आपण त्यांना सांगितले की, माननीय मुख्यमंत्री शक्यतो चर्चेच्या वेळी उपस्थित राहतीलच, ते न जमल्यास या चर्चेला उत्तर देण्यास मात्र ते निश्चितपणे सभागृहात येणार आहेत. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी ते मान्य केले आणि म्हणाले की, मी माझा प्रस्ताव मांडतो, मुख्यमंत्र्यांनी किमान या प्रस्तावाला उत्तर देण्यासाठी तरी सभागृहात यावे. तेव्हा आता माझी विनंती आहे की, या ठिकाणी माननीय सभापतींनी या प्रस्तावावर चर्चा सुरू करण्याचा जो आदेश दिला आहे त्याचे पालन व्हावे.

( काही सन्माननीय सदस्य 'वेल' मध्ये घोषणा देत असतात ..... गोंधळ .... )

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी शांत व्हावे. त्यांनी आपापल्या जागांवर जाऊन बसावे. मी आपणा सर्वांनाच सांगू इच्छितो की, गेले तीन अधिवेशनांमध्ये कोकणासंबंधातील हा प्रस्ताव येणार होता. या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उपस्थित असावे आणि विशेष करून या चर्चेला मुख्यमंत्र्यांनी उत्तर देण्यासाठी तरी उपस्थित असावे ही आपली सर्वांचीच इच्छा असल्याने यापूर्वीच्या प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रस्ताव आपण पुढे ढकलत गेलो आहोत. आता आज हा प्रस्ताव येथे आलेला आहे, त्यावर स्वत: माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत, तसे त्यांनी सांगितले आहे. .. या व्यतिरिक्त आज सकाळी येथे अनुशेषाच्या

...... 3इ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

अनुषंगाने चर्चा झाली. त्यानंतर माझ्या दालनामध्ये सर्व नेत्यांशी देखील मी चर्चा केली. मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचा आदर करतो. पण त्यांनी 'आम्हाला का बोलाविले नाही' असे म्हटल्याचे मी ऐकले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, केवळ नेत्यांनाच अशा प्रसंगी आपण चर्चेला बोलवित असतो. त्याप्रमाणे माझ्या दालनामध्ये या संबंधात चर्चा झाल्यानंतर असे ठरले की, कोकणासंबंधीच्या या प्रस्तावावर आज चर्चा आपण घ्यायची. ही चर्चा करीत असताना चर्चेच्या दरम्यान मानीय मुख्यमंत्री येतील, या चर्चेला उत्तर देतील आणि हा जो अनेक दिवसांपासूनचा विषय आहे तो आपण पूर्ण करू. आता या ठिकाणी माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी देखील सांगितले की, माननीय मुख्यमंत्री स्वत: येथे येऊन या चर्चेला उत्तर देणार आहेत. तेव्हा माझी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, अत्यंत महत्त्वाच्या विषयाच्या अनुषंगाने, कोकणाच्या विकासाच्या अनुषंगाने ही चर्चा आहे. या चर्चेच्या वेळी सदनामध्ये आता पाच कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत शिवाय एक राज्यमंत्री देखील आहेत. आपण संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळाची जॉईंट ॲण्ड सेव्हरल रिस्पॉन्सिबिलिटी हे तत्त्व स्वीकारले आहे. तेव्हा येथे चर्चेच्या दरम्यान जे मुद्दे सन्माननीय सदस्य उपस्थित करतील त्याचे टीपण येथे उपस्थित असलेले मंत्री करतील व त्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री या चर्चेला उत्तर देतील. मी संसदीय कार्य मंत्र्यांना सांगेन की, आपण माननीय मुख्यमंत्र्यांना या चर्चेच्या दरम्यान उपस्थित राहण्यास सांगावे, या चर्चेला उत्तर देण्यास ते येणार असल्याचे त्यांनीही मान्य केलेले आहेच. तेव्हा आता सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी प्रस्ताव मांडून चर्चेला सुरूवात करावी. तत्पूर्वी सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांना मी 1 मिनिट बोलण्यास परवानगी देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. या ठिकाणी दोन वेळा माझे नाव घेऊन सांगितले गेले की, "फुंडकर यांना काय कळते" असे मी म्हटले. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी असे बोललो नाही. सभापती महोदय, मघाशी या ठिकाणी जी चर्चा झाली ती अनुशेषासंबंधात होती, त्यात कोकणाचा विषय नव्हता. त्यावेळेस योगायोगाने सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी येथे होते. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 3एफ 1 ...

श्री. विनोद तावडे....

आणि योगा-योगाने माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे त्या ठिकाणी उपस्थित होते. त्यावेळी त्यांचाही आग्रह होता की, हा प्रस्ताव सारखा पुढे ढकलला जात आहे त्यावर चर्चा झाली पाहिजे. या प्रस्तावासंबंधी आमची प्रमुख मागणी फलोद्यान विभागाशी संबंधित आहे, आमची मागणी पर्यटन विभागाशी संबंधित आहे, आमची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित आहे. या विभागाचे मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांना चर्चेच्या वेळी उपस्थित रहाण्यास वेळ नाही हे आम्ही समजू शकतो. याचे कारण पाच वाजता एअरपोर्ट ॲथॉरिटीबरोबर त्यांची बैठक आहे. ती बैठक दीड तास चालणार आहे. त्या ठिकाणी महत्वाचा विषय आहे.परंतु इतर संबंधित विभागाचे मंत्री या चर्चेच्या वेळी सभागृहामध्ये उपस्थित न राहिल्यामुळे कोकणातील जनतेपर्यंत चुकीचा संदेश जाईल. या विधीमंडळामध्ये कोकणच्या जनतेचे प्रश्न ऐकावयास या सरकारला वेळ नाही. आम्ही राजकारण बाजूला ठेवून या विषयावर बोलत आहोत. त्यामुळे संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी या चर्चेला उपस्थित रहावे आणि त्यानंतरच चर्चा सुरु व्हावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय,...

(अडथळा)

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. मला संसदीय कार्यमंत्री म्हणून असा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे की, आपण याठिकाणी माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना चर्चेला सुरुवात करण्यास सांगितले. असे असतांना चर्चा सुरु करावयाची नाही असे विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे माननीय सदस्यांना याठिकाणी बोलू दिले जात नाही. सभापती महोदय, हे सभागृह कोण चालवीत आहे? ही पध्दत बरोबर नाही. सभापती महोदय, आपण निदेश दिला आहे, त्यानंतर मी खुलासा केला आहे. सभागृहामध्ये पाच खात्याचे मंत्री उपस्थित आहेत. आपण दिलेल्या निदेशाप्रमाणे मी माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये यावे यासाठी प्रयत्न करतो. त्याचप्रमाणे संबंधित विभागाच्या मंत्रिमहोदयांना सभागृहामध्ये आणण्याचा प्रयत्न करतो. तोपर्यंत आपण चर्चा सुरु करावी. आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

कोकणातील प्रश्न सभागृहामध्ये मांडल्याशिवाय आपल्याला न्याय कसा मिळेल? आपण कोकणचे प्रश्न मांडावेत, कोकणच्या व्यथा मांडाव्यात आम्ही आपल्याला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करु.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मागील तीन-चार अधिवेशनापासून पुढे पुढे ढकलीत आज हा कोकणचा महत्वपूर्ण प्रस्ताव चर्चेला आलेला आहे. असा हा महत्वाचा प्रस्ताव चार ते पाच निरनिराळया विभागाच्या मंत्र्यांशी संबंधित आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पर्यटन, फलोत्पादन, मत्स्योत्पादन, सिंचन, उद्योग, सार्वजनिक बांधकाम इत्यादी विभागाच्या मंत्र्यांचा संबंध आहे. असे असतांना या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांसह एकही संबंधित विभागाचे मंत्री सभागृहामध्ये उपस्थित न रहाणे ही पध्दत लोकशाहीमध्ये योग्य आहे काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या या प्रस्तावावरील तीव्र भावना मी समजू शकतो. परंतु या सदनामध्ये चार ते पाच विभागाचे मंत्री उपस्थित असतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी उपस्थित असावयास पाहिजे कां?

श्री. जयंत प्र. पाटील : सर्व संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असावयास पाहिजे.

(अडथळा)

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या भावनांपेक्षा आमच्या भावना वेगळया नाहीत. परंतु एखादी गोष्ट आपण अपवाद म्हणून करतो. उदा. मराठी भाषेसंबंधी जिव्हाळयाचा विषय चर्चेला घेण्यात आला. त्या प्रस्तावावरील चर्चा नियमानुसार अडीच तासामध्ये संपली पाहिजे. तरीसुध्दा त्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन अडीच तासाची चार ते पाच तास चर्चा चालल्यानंतर अपूरी राहिलेली चर्चा मंगळवारी घेण्यात येणार आहे. हा जो कामकाजाचा घटनाक्रम होता त्यामध्ये बदल करण्यात आला. तो झाल्यानंतर संबंधित दोन माननीय सदस्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सांगितले की, आम्ही कोकणच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करतो आपण त्या चर्चेला उत्तर देण्यासाठी सभागृहामध्ये यावे. हा घटनाक्रम लक्षात घेता आणि आपण दिलेले आदेश लक्षात घेता सर्व माननीय सदस्यांनी आपले आदेश मान्य केले पाहिजेत. अशी आपणामार्फत सर्व माननीय सदस्यांना विनंती करतो.

(अडथळा)

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये पाच विभागाचे माननीय मंत्री उपस्थित आहेत. त्यांना कोकणातील प्रश्नासंबंधी न्याय पाहिजे असेल तर आपण या संबंधी दिलेल्या आदेशाचे माननीय सदस्यांनी पालन केले पाहिजे अशी माझी माननीय सदस्यांना विनंती आहे.

**सभापती** : मी सदनातील दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतले, आणि आपला आग्रह मला समजला आहे. कोकणातील विविध प्रश्नासंबंधी उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेला चांगल्या प्रकारे न्याय मिळाला पाहिजे अशी आपली इच्छा आहे. या प्रस्तावावरील चर्चा यापूर्वी दोन-तीन वेळा पुढे ढकलली गेली आहे. मघाशी माझ्या दालनामध्ये झालेल्या अन्य विषयासंबंधीच्या चर्चेच्या वेळी माननीय विरोधी पक्षनेत्यांसह विविध पक्षांचे नेते उपस्थित होते. त्यामध्ये माननीय सदस्य सर्वश्री. गुरुनाथ कुलकर्णी, विनोद तावडे हे देखील उपस्थित होते. त्यावेळी या प्रस्तावावरील चर्चा आजच सुरु करण्यासंबंधी सर्व माननीय सदस्यांनी आग्रह धरला. ही चर्चा आजच सुरु करावी असे मी देखील सांगितले. आता सभागृहामध्ये पाच खात्याचे मंत्री उपस्थित आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** (पुढे सुरु....

एकंदरीत संसदीय लोकशाहीच्या प्रथेप्रमाणे अशा चर्चेला पाच किंवा सहा मंत्री महोदय उपस्थित आहेत. ते उपस्थित झालेल्या सपूर्ण मुद्यांचे टाचण करतील. दरम्यानच्या काळामध्ये माननीय मुख्यमंत्री या चर्चेच्या काही भागापर्यन्त येतील आणि उत्तर देतील. आपण अशी अपेक्षा करतो की, अशा चर्चेला सगळे मंत्रीमंडळच उपस्थित राहिले पाहिजे. अशी प्रथा संसदीय लोकशाहीमध्ये मी कधी पाहिली नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते अनेक वर्षे आमदार म्हणून आणि मंत्री म्हणून राहिलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी लोकसभेमध्ये काम केलेले आहे. त्यांनीही अशी प्रथा कधी पाहिलेली नाही. उद्या अशी प्रथा पडेल की, मंत्रिमंडळातील सगळे सदस्य उपस्थित असल्याशिवाय चर्चाच करायची नाही. याला काही अर्थ नाही. तेव्हा या ठिकाणी सहा मंत्री महोदय उपस्थित आहेत. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना पाहिल्यानंतर कोकणच्या विकासाच्या संदर्भातील प्रस्ताव सातत्याने गेली तीन अधिवेशने पुढे ढकलला गेला आहे. आता या अधिवेशनामध्ये हा ठराव आलेला आहे. या ठरावाला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी अपेक्षा आहे. याचे कारण असे आहे की, या ठरावामध्ये एकच विषय नाही की त्या विषयाच्या संबंधातील सन्माननीय मंत्री महोदय त्याचे उत्त्तर देऊ शकतील. यामध्ये अन्य विभागाचेही विषय असल्यामुळे एकत्रित उत्तर माननीय मुख्यमंत्री महोदयांनीच द्यावे, अशी कोकणातील सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. परंतु माननीय मुख्यमंत्री महोदयांना विशेष काम असल्यामुळे ते आता उपस्थित नाहीत. परंतु ते ही चर्चा चालू असताना येथे येतील असे वाटते. आपण चर्चा सुरू करण्यास सांगितल्याबद्दल आभारी आहे.

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना माझी विनंती राहील की, आपण चर्चेला सुरुवात करू . या ठरावाच्या संदर्भामध्ये कोणताही पक्ष किंवा राजकारणाचा भाग चर्चेला आणायचा नाही. आता आपण चर्चेला सुरुवात करू या.

सभापती महोदय,कोकणातील सर्व समावेशक विषयावर ज्या प्रमाणे या सभागृहामध्ये चर्चा होत आहे, तशी विधान सभेमध्ये नियमांतर्गत चर्चा झालेली आहे, असे मला वाटत नाही. या सभागृहामध्येच कोकणातील सर्वपक्षीय आमदारांनी चर्चेची मागणी केलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते या ठिकाणी उपस्थित नाहीत. त्यांनी मराठी भाषेच्या संदर्भातील प्रस्तावावर भाषण करताना सांगितले की, गेल्या 60 वर्षामध्ये मराठी भाषेच्या संदर्भात उतरण लागलेली आहे, मी मरण्याच्या आत मराठी भाषेचा प्रश्न मला मांडू द्यावा. अशाचप्रकारे कोकणातील सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अंतर्गत चर्चा उपस्थित केलेली आहे. कोकणच्या आमदारांच्या जीवनामध्ये अत्यंत महत्वाची अशी चर्चा आहे, त्याची नोंद इतिहासामध्ये राहील. मी आपल्याला धन्यवाद देऊ इच्छितो की, सातत्याने दोन-तीन अधिवेशनामध्ये हा प्रस्ताव चर्चेला येत असताना देखील ती चर्चा आपण करू शकलेलो नाही.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

परंतु आज माननीय मुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीमध्ये सुध्दा मंत्रिमंडळातील काही महत्वाच्या खात्याचे माननीय मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. या ठिकाणी चर्चा सुरु करीत असताना माननीय मुख्यमंत्र्यांच्या संबंधातील जे प्रश्न या चर्चेच्या निमित्ताने उपस्थित होतील त्या सर्व प्रश्नांबाबत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर त्यांचे सहकारी चर्चा करतील आणि किमान माननीय मुख्यमंत्री उत्तर देत असताना ते या सर्व प्रश्नांची उकल या ठिकाणी करतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी या चर्चेला सुरुवात करतो.

सभापती महोदय, कोकण हा जो भौगोलिक प्रदेश आहे त्याच्या संदर्भात सांगावयाचे तर 1 मे, 1960 साली जे महाराष्ट्र राज्य स्थापन झाले तसे राज्य ब्रिटीश इंडियामध्ये नव्हते. ब्रिटीश इंडियामध्ये मुंबईतील गिरण्या साधारणत: सन 1800 च्या पहिल्या दशकामध्ये सुरु झाल्या. त्यांना कामगार पाहिजे होते. कोकण मुंबईच्या जवळ असल्यामुळे तसेच त्यावेळी बोटी असतील, जहाज असतील किंवा अन्य सागरी प्रवास सुविधा असतील त्यांचा वापर करुन कोकणातील लोक गिरण्यांमध्ये कामगार किंवा मजूर म्हणून काम करण्यासाठी पहिल्यांदा मुंबईमध्ये आले. त्यांचे नोकरीचे दुसरे साधन म्हणजे ब्रिटीश इंडियामध्ये कॉन्स्टेबलची भरती तसेच आणखी दोन तीन प्रकारच्या नोकऱ्यांसाठी कोकणातील लोक मुंबईमध्ये येत होते. कोकणातील लोक गावाकडे मनी ऑर्डर पाठवावयाचे. त्या मनी ऑर्डरवर कोकणातील लोक धान्य पिकवावयाचे किंवा भातशेती वा नाचणीची शेती करावयाचे. कोकणात कोणताही व्यवसाय नसल्यामुळे मुंबईहून येणाऱ्या मनी ऑर्डरवर कोकणातील लोक जगत असत. त्यामुळे कोकणाला मनी ऑर्डर इकॉनॉमी असे स्वरुप प्राप्त झाले. कोकणाच्या बाबतीत पाहिले तर इंग्रजीमध्ये " Paddy and Poverty go together" अशी एक म्हण आहे. भातशेती आणि गरिबी हातात हात घालून जाते. गरिबी आणि दारिद्र्य कोकणपट्टीने वर्षानुवर्षे पाहिलेले आहे. महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर श्री. वसंतराव नाईक या राज्याचे मुख्यमंत्री असताना इतर ठिकाणी सिंचनाच्या सोयी उपलब्ध केल्या जात होत्या. परंतु कोकणामध्ये कोणत्याही प्रकारची सिंचनाची व्यवस्था झाली नाही. कोकणपट्टीमध्ये जवळपास 175 ते 200 इंच पाऊस पडतो. सिंचनासाठी निधी उपलब्ध करुन देऊन राज्यामध्ये निरनिराळी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ......

धरणे बांधली जातात. पावसाचे पाणी अडवून त्याचा वापर शेतीसाठी केला जातो. कोकणामध्ये 175 ते 200 इंच पाऊस पडत असताना कोकणामध्ये फक्त 5 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली. राज्यात पडणाऱ्या एकूण पावसापैकी 40 ते 45 टक्के पाऊस एकट्या कोकणामध्ये पडतो हे वास्तव चित्र आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक साहेबांनी पुण्याचे तत्कालीन विभागीय आयुक्त श्री. स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षेखाली एक समिती नेमली होती. कोकणामध्ये सिंचन क्षमता वाढवू शकतो काय यासंदर्भात ती समिती नेमली होती. बर्वे समितीने जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये असे स्पष्ट नमूद केले आहे की, कोकणामध्ये सिंचन क्षमता वाढविता येणार नाही. कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो परंतु त्या ठिकाणी मुरुमाची जमीन असल्यामुळे पाणी साठविण्याची क्षमता त्या जमिनीमध्ये नाही आणि धो धो पडणाऱ्या पावसाचे पाणी समुद्राला जाऊन मिळत असल्यामुळे त्या ठिकाणी सिंचनाची व्यवस्था करता येणार नाही असा अहवाल स.गो.बर्वे समितीने राज्य शासनाला दिला होता. त्यानंतर या राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांना मी धन्यवाद देऊ इच्छितो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री बरवड 16:55

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...)

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार)**

राज्यामध्ये सिंचनाचा, शिक्षणाचा, आरोग्याचा, रस्त्यांचा, तांत्रिक शिक्षणाचा अनुशेष किती आहे हे ठरविण्यासाठी दांडेकर समितीची स्थापना करण्यात आली. दांडेकर समितीने राज्याचा संपूर्ण अभ्यास करुन अहवाल दिला. हा अहवाल दिल्यानंतर राज्यातील विदर्भ, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्र या भागामध्ये अनुशेषाची परिस्थिती काय आहे हे आम्हाला समजले. त्यानंतर मध्यंतरीच्या काळात युतीचे शासन आले. युतीच्या शासनाने सिंचनाच्या संदर्भात जे काही निर्णय घेतले ते बरोबर होते की चुकीचे होते या खोलात मी जाऊ इच्छित नाही. एक गोष्ट स्पष्ट आहे की, युतीच्या काळामध्ये राज्यामध्ये गोदावरी खोरे, कृष्णा खोरे, तापी खोरे आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी पाटबंधारे सिंचन विकास महामंडळे स्थापन करण्यात आली. त्याचप्रमाणे कोकणासाठी देखील सिंचन महामंडळाची स्थापना करण्यात आली असून सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली हे त्या महामंडळाचे उपाध्यक्ष आहेत. सभापती महोदय, ठाण्यामध्ये जी धरणे झाली त्यांचे पाणी मुंबईला पुरविण्यात येते. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितले की, मुंबईला नाशिकवरुन पाणी येते. तसे ते तानसा तलावातूनही येते. नाशिक आणि ठाणे या आदिवासी भागामध्ये पाणी अडवून ते पाणी मुंबई शहारातील लोकांना पुरविले जाते. आज ठाण्यामध्ये काय परिस्थिती आहे ? ठाण्यामध्ये पाणी अडवून ते मुंबईतील लोकांना पिण्यासाठी पुरविले जाते. परंतु ठाण्यातील आदिवासीला मात्र पिण्यासाठी पाण्याचा एक थेंब देखील मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. ठाण्यातील आदिवासी भागामध्ये करोडो रुपये खर्च करुन जे पाणी अडविले जाते ते पाणी मुंबई, नवी मुंबई या महानगरपालिकांतील लोकांना पिण्यासाठी पुरविले जाते. मात्र ठाण्यातील शेतक-याला हे पाणी मिळत नाही. 1972मध्ये रायगडमध्ये एकच काळ प्रकल्प झाला. या प्रकल्पामुळे माणगांव आणि आजूबाजूच्या भागातील शेतक-यांना शेतीसाठी मुबलक पाणी मिळू लागले. परिणामी तेथील शेतकरी दोन-दोन तीन-तीन पिके घेऊ लागला. या प्रकल्पाचा सिंचनासाठी उपयोग झाला. त्याच बरोबर आयपीसीएल आणि फर्टिलायझर कंपन्याना जेवढ्या पाण्याची आवश्यकता आहे तेवढे पाणी या काळ प्रकल्पामुळे उपलब्ध झाले आहे. सिंचनाच्या बाबतीत रायगड आणि ठाणे जिल्ह्याचा अनुशेष नाही ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांनी अनुशेषासंबंधीचा तक्ता मला दिलेला आहे. त्यामध्ये ठाणे आणि रायगड

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...)

जिल्ह्याचा सिंचनाचा अनुशेष नाही, असा उल्लेख आहे. सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यामध्ये तिल्लारी प्रकल्प हाती घेण्यात आला. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण आणि गोवा राज्याचे मुख्यमंत्री श्री. बांदोडकर या दोघांच्या प्रयत्नामुळे हा प्रकल्प हाती घेण्यात आला. त्यावेळी गोवा राज्य महाराष्ट्रामध्ये सामील करुन घेण्यासंबंधी रेफरण्डम घेतले जात होते आणि गोव्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. बांदोडकर हे गोवा महाराष्ट्रामध्ये सामील होण्यासाठी तयार होते. त्यानुषंगाने पहिले काम हे तिल्लारी धरणाचे झाले. त्यावेळी तिल्लारी प्रकल्पाची किंमत फक्त 54 कोटी रुपये होती. आज तिल्लारी प्रकल्प 95 टक्के पूर्ण झालेला आहे.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुळकर्णी....

आणि 950 कोटी रुपये या कामावर आतापर्यंत खर्च करण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी मला अशी माहिती दिली की, कोकणामध्ये 40 सिंचन प्रकल्प आहेत. त्यासाठी निधी आहे. परंतु कोकणातील सिंचनाच्या अनुशेषाचा विचार केला तर तो रत्नागिरी जिल्हयाचा 693 कोटी आणि सिंधुदुर्ग जिल्हयाचा 365 कोटी इतका आहे. यामध्ये ठाणे आणि रायगड जिल्हयाचा समावेश केलेला नाही. 2004 पर्यंत जवळजवळ 1058 कोटी रुपयांचा कोकणातील दोन जिल्हयांचा सिंचनाचा अनुशेष आहे. आज त्याची किंमत 1200 कोटी रुपयांपर्यंत वाढलेली आहे. परंतु यासाठी शासनाने तरतूद काय केली? आतापर्यंत काही निधी मिळाला, काही धरणांचे काम झाले. तिलारी धरण वगळता कोणतेही काम या जिल्हयांमध्ये पूर्ण झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. निधी नाही म्हणून त्याठिकाणी कामे अडली किंवा वनसंज्ञा ही एक मुख्य अडचण आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रस्ताव 15 सन्माननीय सदस्यांनी मिळून दिलेला आहे. कालच्या घटनेची पुनरुक्ती होऊ नये. अडीच तासाची चर्चा असून अर्धातास माननीय मुख्यमंत्र्यांना उत्तरासाठी दिला जाणार आहे. उर्वरित वेळेचे नियोजन करताना प्रस्ताव देणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळावी एवढीच विनंती आहे. त्यानुसार वेळेचे नियोजन करण्यात यावे.

श्री.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, किमान एक तास मी या ठरावावर माझे विचार मांडणार आहे. उर्वरित वेळेचे नियोजन आपल्याला ज्या पध्दतीने करावयाचे असेल त्याप्रमाणे करण्यात यावे एवढीच विनंती आहे.

सभापती महोदय, अनुशेषांतर्गत कोकणासाठी सातत्याने सिंचनाकरिता काही निधी मिळाला. अर्जून, महमदवाडी, तिलारीसारखे प्रकल्प मार्गी लागले. परंतु सन 2007-08 मध्ये मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रातील सिंचनासाठी 4051 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दुर्दैवाने आज आमची अवस्था ही ना घर का ना घाट का अशी झालेली आहे. रेस्ट ऑफ महाराष्ट्र म्हणून आम्ही घरचेही नाही आणि घाटाचेही नाही अशी परिस्थिती आहे. सिंचनासाठी जी तरतूद करण्यात आली आहे त्यामध्ये कोकणाचा उल्लेख आहे का या संदर्भात सन्माननीय सदस्य

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुळकर्णी.....

श्री.दिवाकर रावते व प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडून मी माहिती घेतली. कोकणाचा कुठेही उल्लेख नाही. कोकणाचा समावेश रेस्ट ऑफ महाराष्ट्रामध्ये आहे.

सभापती महोदय, दिनांक 13 मार्च, 1989 ला ज्यावेळी या राज्याचे मुख्यमंत्री श्री.शरद पवार होते त्यावेळी दोन्ही सभागृहांनी ज्याप्रमाणे मराठवाडा व विदर्भासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन केले त्याप्रमाणे कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यात यावे असा ठराव एकमताने मंजूर केला होता. हा ठराव मंजूर होऊन आज 16 वर्षे झाली. 16 वर्षात शासनाने काय केले? शासन झोपा काढीत होते का? मागील नागपूर अधिवेशनात पुन्हा कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबत दोन्ही सभागृहांनी ठराव मंजूर करुन घेतला. कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करावे ही आमची मागणी आहे. दिनांक 13 मार्च, 1989 रोजी दोन्ही सभागृहामध्ये कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यात यावे असा ठराव मंजूर करण्यात आला आणि मागील नागपूर अधिवेशनामध्ये देखील या ठरावाची पुनरुक्ती केली. असे असताना या प्रस्तावाची अंमलबजावणी का होत नाही? हा माझा माननीय मुख्यमंत्र्यांना प्रश्न आहे.

सभापती महोदय, दोन्ही जिल्हयांमध्ये वनसंज्ञेखाली सिंचन प्रकल्प रखडले आहेत. कुडाळ तालुक्यातील माणगाव खोऱ्यामध्ये टाळंबा प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले. त्या प्रकल्पाचे भूमीपूजन करण्यात आले. नारळ फोडून झाला. परंतु वनसंज्ञेचा अडसर निर्माण झाला आहे. त्यामुळे आज त्या प्रकल्पाचे काम करता येत नाही. राज्यामध्ये 1997 मध्ये वनसंज्ञेखाली 62.5 हजार हेक्टर जमीन ताब्यात घेतली जाते आणि सिंधुदुर्ग हा 7 तालुक्यांचा छोटा जिल्हा असून जिल्हयाची एकूण लोकसंख्या 5 लाखापेक्षा जास्त नाही, या जिल्हयातील 42.5 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली आणण्यात आली.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ....

जमीन आमची आणि त्या जमिनीची मालकी सरकारची अशी परिस्थिती आहे. जमीन आमची असली तरी उता-यावर सरकारची मालकी दाखवली आहे आणि आम्हाला त्या ठिकाणी केवळ कुळवहीवाटदार म्हणून दाखवलेले आहे, त्यामुळे कोकणाची सिंचन क्षमता वाढू शकत नाही. आम्हाला अनुशेषाचे पैसे मिळतात परंतु ते अल्प प्रमाणात मिळतात. सभापती महोदय, पुणे एक्स्प्रेस हायवेचे काम 2200 ते 2250 कोटी रुपयांमध्ये पूर्ण झालेले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. अंतुले साहेब असतांना त्यांनी रेवस-रेडी सागरी मार्ग बांधण्याची घोषणा केली होती. सभापती महोदय, ही घोषणा होऊन 26 वर्षे होऊन गेली आहेत परंतु या सागरी मार्गाच्या कामाला काही सुरुवात झाली नाही. या सागरी मार्गासाठी कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. कोकणावर जो अन्याय होत आहे तो अन्याय कोकणी माणूस कधीही सहन करणार नाही. आपण 26 वर्षामध्ये हा सागरी महामार्ग सुरु करु शकला नाहीत. त्यामुळे हा सागरी महामार्ग कधी पूर्ण होणार आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात द्यावी. आज हायवे नं. 17 वर मोठया प्रमाणात अपघात होत आहेत. या हायवेवरुन मोठमोठाले ट्रेलर्स आणि टँकर्स जातात परंतु रस्ता अरुंद असल्यामुळे मोठया प्रमाणात अपघात होतात. हा हायवे चौपदरी करण्याची घोषणा करण्यात आली परंतु चौपदरी करणासाठी आपण निधी कधी देणार व कामाला कधी सुरवात करणार आहात याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी. रेवस ते रेडी वर जर दोन चार ब्रीज झाले तर फार चांगल्या प्रकारचे काम होऊ शकेल. रेवस रेडी वर दोन-चार ब्रीज झाले तर या ठिकाणच्या पर्यटनाचा चांगल्या प्रकारे विकास होऊ शकेल. रेवस ते रेडी सागरी मार्ग पूर्ण झाला तर मुंबईहून गोव्याला 8 तासात पोहचता येईल. विमानाने जर गोव्याला जावयाचे म्हटले तर पहाटे 4 वाजताच उठावे लागते. त्यानंतर दोन तास विमान तळावर घालवावे लागतात. त्यानंतर विमानाचे उड्डाण झाल्यानंतर 1 तासात माणूस गोव्याला पोहचतो पण नंतर तेथून आपल्या गावी जाण्यासाठी दोन अडीच तास लागतात. त्यामुळे विमानाने गेलो तर जास्त वेळ लागतो परंतु रेवस-रेड्डी या सागरी महामार्गाचे काम झाले तर मुंबईहून 8 तासात आपल्याला गोव्याला पोहचता येईल. हा सागरी मार्ग केवळ 78 कि.मी. अंतराचा आहे. परंतु त्यासाठी शासन निधी उपलब्ध करुन देत नाही.

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

सभापती महोदय, राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री माननीय शरद पवार असतांना त्यांनी 1988 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केले होते. या ठिकाणी पंचतारांकित हॉटेलसाठी मोचेमाड, मिठबाव, शिरोडा , वेळागर, कुणकेश्वर या ठिकाणच्या जमिनी ॲक्वायर केलेल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे परंतु पर्यटन विभागाचे कार्यालय सिंधुदूर्गमध्ये नाही. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला असतांना त्या ठिकाणी पर्यटन विभागाचे कार्यालय नसणे ही एक शोकांतिका आहे. मुंबईच्या कार्यालयातूनच सिंधुदुर्ग जिल्हयाच्या पर्यटनाचे काम चालले आहे. पर्यटनाच्या संदर्भात मुंबई आणि सिंधुदूर्गचा परस्पर काही एक संबंध नाही अशा प्रकारे मुंबईतून सिंधुदुर्ग जिल्हयाच्या पर्यटनाचे काम चालले आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...........

सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी जवळ जवळ 28 कोटी रुपये दिले.

सभापती महोदय, कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात फक्त दोनच पर्यटन स्थळे चांगली आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गणपतीपुळे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली. बजेटमध्ये पर्याटनासाठी तरतूद केली जाते परंतु ती खर्च केली जात नाही. कोकणचा विकास केला तर कॅलिफोर्निया कोकणापुढे झक मारेल. कारण कॅलिफोर्निया निर्माण केलेला आहे. परंतु कोकणाला निसर्गाने भरभरुन दिलेले आहे. उद्या जर कोकणासाठी भरीव तरतूद करुन कोकणचा विकास केला तर अमेरिकेतील कॅलिफोर्निया आणि कोकण यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आढळून येईल. तसा प्रयत्न होणार आहे का ?

सभापती महोदय, तीन वर्षापूर्वी कोकणातील रस्त्यांसाठी व पर्याटनासाठी तसेच रत्नागिरीच्या बंदराच्या विकासासाठी वैधानिक विकास महामंडळाने 4.5 कोटी रुपये दिले होते. अतिशय चांगल्या भावनेने मदत करण्यात आली होती. मिरकरवाडा बंदरासाठी भरीव तरतूद करण्यात यावी. सन्माननीय मंत्रिहोदय श्री.अनिस अहमद यांना मी सांगू इच्छितो की, आपके दफ्तर में 4500 करोड़ रुपये खर्च करने संबंधी नोट भेजी गई थी लेकिन आपके दफ्तर ने वह नोट यह लिखकर वापस भेज दी कि हमारे पास मशीनरी नहीं है, हम आपका पैसा खर्च नहीं कर सकते, इसलिए हम चेक वापस कर रहे हैं. क्या यही आपका काम है ?

सभापती महोदय, कोकण पॅकेजमधून गाळ काढण्यासाठी 10 कोटी रुपये दिले होते. पण चिमूटभर गाळ काढण्यात आला नाही. असे काम होणार असेल तर विकास कसा होणार ? विकासाचा चाड नसलेल्या अधिकाऱ्यांना दफ्तरमध्ये कशाला बसविता ?

सभापती महोदय, याठिकाणी शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. राज्यातील सर्व विभांगामध्ये माध्यमिक परीक्षा केंद्रे आहेत. कोकणामध्ये माध्यमिक परीक्षा केंद्र सुरु करण्यात येईल असे येथे जाहीर करण्यात आले. पण अजूनपर्यंत ते झालेले नाही. आम्ही सुध्दा सत्ताधारी पक्षाचे सदस्य आहोत हे मी या निमित्ताने सांगतो. तेव्हा कोकणामध्ये माध्यमिक सेंटर केव्हा उभारणार हे येथे सांगितले पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...........

सभापती महोदय, मेडिकल बाबत बोलावयाचे झाले तर याबाबतीत सुध्दा इम्बॅलन्स आहे. लातूर, अकोला, कोल्हापूर येथे मेडिकल महाविद्यालये आहेत. कोकणातील आजारी माणसाला औषधोपचारासाठी कोल्हापूर, गोवा किंवा मुंबई येथे जावे लागते. तेव्हा रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथे मेडिकल महाविद्यालय का देत नाही ?

यानंतर श्री.पुरी.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 17:15

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी...

आम्ही सातत्याने मागणी करुनही काहीही उपाय करणार नसाल, कोकणाकडे लक्ष देणार नसाल तर आपण आणखी काय करणार आहात ? विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील कोकणातील सन्माननीय सदस्यांची बैठक माननीय मुख्यमंत्र्यांकडे आयोजित केली होती. त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले होते की, आपण कोकणाला फक्त 7-8 वर्षे आर्थिक मदत द्या. मग, आम्ही संपूर्ण राज्याला सांभाळू. कोकणाची तशी क्षमता आहे. कोकणातील लोक सुरुवातीस उठसूठ मुंबईत येत नव्हते. तिकडे जाण्यासाठी आम्ही अगोदर आपल्या भावाकडे पैसे मागायचो. एक जमाना होता की, तिकडे जाण्यासाठी पैशांची मनिऑर्डर करायचो. परंतु आज कोकणातील माणून आपल्यालाच पैसा देईल, अशी परिस्थिती आहे. हे आपल्याला नाकारता येणार नाही. कोकणातील रेल्वेसाठी 2200-2300 कोटी रुपये दिले. कोकणामध्ये रेल्वे यावी, असे कोकणवासियांचे स्वप्न होते. ते साकारही झाले. रेल्वेच्या कामासाठी बॉण्ड काढले. ते आम्ही विकत घेतले. मुंबई बँकेने 150 कोटी रुपयांचे बॉण्ड विकत घेतले. परंतु आपल्या राज्य बँकेला एकही रुपयाचा बॉण्ड घेण्याची इच्छा झाली नाही किंवा राज्य शासनाला एक रुपयाचाही बॉण्ड घेण्याची इच्छा झालेली नाही. आपला महाराष्ट्र हा कोकण सोडून महाराष्ट्र आहे. परंतु आज तेथील परिस्थिती बदलली असून राजकारणही बदलले आहे. तेथील राजकीय व्यवस्थाही बदलली आहे. आतापर्यंत विदर्भातून 66 आमदार याठिकाणी यायचे, मराठवाडयातून 48 आमदार यायचे, उत्तर महाराष्ट्रातून नाशिकसह 36 आमदार याचे, मुंबईतून 36 आमदार यायचे. परंतु येथून पुढे महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार हे आता कोकण ठरवणार आहे. कारण, 75 आमदारांचा ब्लॉक कोकण आणि मुंबईतून येणार आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यव्यवस्था बदलण्याची ताकद कोकणामध्ये आहे. म्हणून माझी विनंती आहे की,.....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय कुलकर्णी साहेबांनी वेगळा पक्ष काढावा, त्यांना आम्ही नेते करु.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हे उत्तम भाषण करीत आहेत. ते अतिशय पोटतिडकीने कोकणाचा विषय मांडत आहेत. त्यांची अशी भावना होती की, या अधिवेशनात तरी त्यांच्या या विषयास न्याय मिळावा. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी त्यांच्या भाषणामध्ये व्यत्यय आणू नये, अशी माझी विनंती आहे.

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना अशी भीती वाटत आहे की, त्यांच्यामुळे पश्चिम महाराष्ट्रावर गदा येणार आहे. परंतु भविष्यात कोकणाचा मुख्यमंत्री झाला पाहिजे, असा आग्रह जनतेसमोर आला पाहिजे.

**तालिका सभापती** : माझी सर्वच सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांच्या भाषणात कोणीही अडथळे निर्माण करु नयेत. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु ठेवावे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी पहिल्यांदा बोटीतून मुंबईत आलो. आम्ही कोकणातील मंडळी बोटीने मुंबईत जायचो व जाताना आम्ही बिस्कीटचे पुडे, बटाटे, कांदे घेऊन जायचो.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी..........

सभापती महोदय, आज कोकणातील बंदरांची अवस्था काय आहे ? सर्व बंदरांमध्ये गाळ साचला आहे व त्यामुळे तेथे होडी घालणे अशक्य झाले आहे. कोकणचे ऐश्वर्य बघायचे असेल तर सागरी महामार्ग तयार होऊ द्या, मग आपण या भागात फेरफटका मारा, आणि पहा तेथील खाडया आणि बंदरे कशी आहेत ते. कोकणचा विकास झाला पाहिजे. सन्माननीय नेते, केंद्रीय कृषिमंत्री, श्री.शरद पवार यांच्याकडे बंदर विकास हे खाते देखील आहे. त्यांनी गुजराथ येथील बंदरांचा झ ालेला विकास पाहिला आहे. राज्य सरकारनेही आपल्या मंत्र्यांना त्या ठिकाणी पाठवावे. त्या सरकारने तेथील बंदराचा अतिशय उत्कृष्ट विकास केलेला आहे. आपल्या राज्यातील बंदरांचा विकास करण्यासाठी शासनाकडे निधी नाही, बंदर विकास करण्यासाठी शासनाकडे कार्यक्रम नाही, ही कोकणाची शोकांतिका आहे. तेव्हा कोकणचा विकास कशा पद्धतीने करणार आहात ? याचे उत्तर सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात दिले पाहिजे.

सभापती महोदय, भारती शीपयार्ड कंपनीला रत्नागिरी जिल्हयात विजयदुर्ग येथे जहाज बांधणी कारखाना काढायचा होता. वाशी येथे जवाहरलाल नेहरु पोर्ट येथील समुद्राची खोली 9.6 मीटर एवढी आहे तर विजयदुर्ग येथील समुद्राची खोली 13.6 मीटर एवढी आहे. मग विजयदुर्ग येथे बंदर बांधण्याचा कार्यक्रम का घेण्यात येत नाही, काय कारण आहे ? सन्माननीय नेते, श्री.शरद पवार यांनी पाच बंदरांचा विकास करण्यासाठी त्यांच्या खात्याकडून 13.50 कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. देवगड येथील आनंदवाडी, राजापूर येथील जयतापूर, दापोली येथील हर्णे व रत्नागिरी, रायगड व ठाणे येथे प्रत्येकी एका बंदरासाठी हा निधी देण्यात आलेला आहे. या कामाला राज्य शासनानेही हातभार लावला पाहिजे. पर्यावरण विभागाकडून वर्षानुवर्षे मंजूरी मिळणार नाही. परंतु, " बिना कोशिश किए जिंदगी में कुछ नहीं मिलता. सिर्फ बातें करने वाला बहादुर नहीं होता. बहादुर वह होता है जो काम करके दिखाता है"

सभापती महोदय, मला शेवटी एवढेच सांगावयाचे आहे की, आम्ही प्रांतवादी नाही, कधीही होणार नाही. विदर्भासारख्या मागण्याही वाढू देणार नाही. तसेच, स्वतंत्र विदर्भासारखी मागणी देखील आम्ही करणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहामध्ये अनुशेषासाठी आम्ही लढा देत आहोत. तुमच्या भागाचे काढा आणि आम्हाला द्या, असे म्हणत नाही.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आम्ही प्रादेशिक वाद आमच्या मनामध्ये ठेवत नाही. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार आपल्या भाषणात नेहमी असा उल्लेख करतात की, 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि त्यासाठी 105 हुतात्म्यांनी प्राणांचे बलिदान दिले. या 105 हुतात्म्यांमध्ये 99 हुतात्मे हे कोकणातील होते. त्यामुळे कोकणातील जनतेचा अंत बघू नका. या भागात अशी मुव्हमेंट सुरु झाली आहे, त्याला कोणी सध्या खतपाणी घालण्याचा प्रयत्न करीत नाही, हा भाग वेगळा. मुंबईसह सागरी महामंडळाच्या संकल्पनेच्या मागे लागला तर तो धोक्याचा इशारा राहील, तो सांभाळा, एवढेच मी सांगतो. शासनाने भविष्याचा वेध घेऊन त्याचा विचार करावा, एवढी अपेक्षा मी व्यक्त करतो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----------------

यानंतर कुमारी धनश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ MAP/ 17:25

श्री. परशुराम उपरकर ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे निर्वाचित ) : सभापती महोदय, या ठिकाणी कोकणावर चर्चा चालू आसा. हयो कोकणातील प्रश्न आसा म्हणून मी आमच्या कोकणातल्या भाषेतच या ठिकाणी बोलणार आसय. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणाच्या विकासासंबंधीचो प्रस्ताव मांडलेलो आसा. त्येंनी या ठिकाणी ब-योच गोष्टी मांडलेल्यो आसत. कोकणात आंबे, मासे ,फणस जास्त प्रमाणात पिकतत परंतु या पिकांपासून कोकणातील माणसाच्या पदरात मात्र फार काय पडना नाय . आमच्या कोकणाच्या बाबतीत ही फार मोठी शोकांतिका आसा. कोकणातल्या माणसान अनेक वेळा नेतृत्व निर्माण करण्याचा काम केलेला आसा. पण या मोबदल्यात कोकणातल्या लोकांका विशेष काय सुध्दा मिळाला नाय. कोकणातले लोक मासेमारी करतत , बागायती करतत, त्या बागायतदारांचा अतिवृष्टीमुळे अनेक वेळा नुकसान होता. परंतु त्यावेळी पुरेशी मदत सरकारकडून मिळना नाय. मात्र विदर्भात संत्र्यांच्या बागांचा नुकसान झाला,केळीच्या बागांचा नुकसान झाला तर त्या शेतकऱ्यांका सरकारकडून ताबडतोब नुकसान भरपाई मिळता. मात्र जेव्हा आमच्या आंबे, काजू, नारळ या फळबागांचा नुकसान होता त्यावेळी शासनाकडून आमका मदत मिळना नाय. आपण याकडे लक्ष देनास नाय ही कोंकणातील माणसासाठी खरोखरच शोकांतिका आसा. बंदरांचो विकास करु साठी केंद्र सरकारकडना निधी गावता परंतु तो खर्च केलो जाना नाय .उदाहरणार्थ आनंदवाडी प्रकल्पासाठी केंद्र सरकारान पैसे दिल्यान परंतु या बंदरांचो विकास करण्यासाठी आमचा शासन असमर्थ ठरला. या शासनाने हयो प्रकल्प आम्ही 10 व्या पंचवार्षिक योजनेत पूर्ण करु असा सांगल्यान पण पूर्ण केल्यानच नाय. हयसर, हया सभागृहात अनेक वेळा कोकणातल्या मच्छिमारांका आम्ही पॅकेज देतलव,मदत देतलव अशी सरकारकडून घोषणा केली जाता परंतु प्रत्यक्षात मदत मात्र मिळना नाय. मागे जेव्हा सिंधुदुर्ग जिल्हयात कोंबडयांवर रोग पसरान कोंबडयो मेल्यो होत्यो तेव्हा पशुसंवर्धन मंत्र्यांनी आश्वासन दिला होता की, या कोंबडयांच्या मालकांका आम्ही मदत देव. त्यावेळाक ज्येंचो पोल्ट्री व्यवसाय नाय, अशा लोकांकासुध्दा मदत दिली. पण त्याच्यातले किती पैसे त्यांच्यानी खाल्ले हयेचो आम्ही हिशोब मागतव परंतु त्या बाबतीत आमका काय सुध्दा उत्तर मिळना नाय. माझो दुसरो मुद्यो असो आसा की, गेल्या अधिवेशनात खाडीतलो गाळ काढण्यासाठी उपाय सुचवूक व्हयो असा शासनाक सदस्यांनी सांगितला त्यानुसार या कामाचो विचार करण्यासाठी एक समिती नियुक्त केलेली आसा आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उपरकर....

खाडीतलो गाळ काढण्याचा काम आम्ही करीत आसव, असा आमका सांगण्यात इला.. परंतु कोकणातल्या खाडीतलो गाळ काढण्याचा कसला सुध्दा काम हाती घेतलेला नाय आणि दिलेले पैसे तसेच परत केले. हयो गाळ काढून त्याचा काय करतत हयेची माहिती कोकणातील लोकांका नाय. कारण गाळ म्हंटल्यानंतर त्याचा मोजमाप कसा करतलं? अशा प्रकारे खाडीतलो गाळ काढण्याच्या कामाची चेष्टा चालू आसा..जर आपण खऱ्या अर्थाने कोकणाच्या विकासासाठी निधी दिलो, चार पैसे दिले तर कोकण अख्ख्या महाराष्ट्राचो संसार चालवित, संपूर्ण महाराष्ट्राक पैसे उपलब्ध करुन देयत. खरातर कोकणात बराच काय करण्यासारखा आसा. कोकणात खनिजा मोठया प्रमाणावर आसत. पर्यटनाच्या दृष्टीने बघलास तर गोवा राज्यातल्या किनारपट्टी पेक्षा कणकवली, मालवण इथली किनारपटटी जास्त सुंदर आणि स्वच्छ आसा. गोव्यातलो पर्यटन व्यवसाय वाढविण्यासाठी थयसरला सरकार जितक्या लक्ष देता तितक्या लक्ष या महाराष्ट्र सरकारकडून अपेक्षित आसा.गोव्यातलो पर्यटन व्यवसाय कोकणात वळविण्यासाठी प्रयत्न करणा हया खरा आवश्यक आसा. सिंधुदुर्ग जिल्हयात अनेक पर्यटक येतत पण त्यांच्यावर किती पैसे खर्च होतत, किती पैसे शिल्लक रवतत हेचो कोणतोही हिशोब आपल्याकडे नाय. कोकणामध्ये नैसर्गिक संपत्ती मोठया प्रमाणावर आसा . कोकणातलो आंबो मोठया प्रमाणावर परकीय चलन मिळवून देऊक मदत करता. आज या ठिकाणी मायनिंगचे करार केले जातत.

नंतर कु. खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर......

पर्यावरणाबद्दल बोलाचा म्हटला तर यंय पर्यटक येत, पर्यटनावर पैसा खर्च करुसाठी प्रदूषणविरहित जिल्हो व्हयो असता. पण कोकणात प्रदूषण निर्माण करणारे, पर्यावरणाचा संतुलन बिघडणारे कारखाने आणून या कोकणामध्ये प्रदूषण आणूक बघतहत. मुंबई ही सुध्दा कोकणामध्येच येता. कोकणात ऊर्जानिर्मिती करण्यासाठी खूप प्रयत्न झाले,त्यासाठी सरकारने आठ कोटी रुपये जाहीर केले होते. आजय आम्ही कोकणात ऊर्जानिर्मिती कशी करुक येयत,हयोचो विचार करतव त्यासाठी सरकारने देवगडक पवनचक्कीवरती आठ कोटी रुपये खर्च केल्याने आज त्याचा काय झाला त्या कोणाक माहिती नाय. कोकणातील समुद्रामध्ये लाटा ज्या गतीने येतत, त्या लाटांवर विजनिर्मिती करण्याकरिता विशेष प्रकल्प उभारुक आमचे आज प्रयत्न चालू आसत. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी हया सभागृहात या प्रस्तावावर चर्चा चालू असतांना ज्या बंदरांचो उल्लेख केलो त्या बंदरांच्या विकासाच्या संदर्भामध्ये आज आमच्या राज्याचे माननीय मंत्री चेष्टा करतहत. या सभागृहामध्ये या प्रस्तावावर चर्चा चालू असतांना यापूर्वी किती मंत्री बसले होते आणि आता किती मंत्री उपस्थित आसत ? मंत्रीमहोदय सांगतहत की, आम्ही आपल्या चर्चेतील सर्व मुद्दे कागदावर लिहून घेत आसव आणि त्यावर लवकरात लवकर कार्यवाही करतलव. पण कागदावर लिहिलेले मुद्दे हे कागदावरच रवता कामा नयेत, अशी माझी आपल्याक विनंती आसा. कोकणात निर्माण झालेल्या आमच्या शिवसेनेच्या रेडीमेड नेत्यांनी देखील कोकणाच्या विकासासंदर्भात आमच्या इच्छा आकांक्षांवर नांगर फिरवलो आसा. कोकण म्हटल्यावर अनेक मोठमोठया बुध्दीजीवी व्यक्तींची नावे आपल्या तोंडात येतत उदा.सर्वश्री.सुनील गावस्कर,सचिन तेंडुलकर,मधु मंगेश कर्णिक वगैरे. तरीपण कोकणात कायद्याचा आणि वैद्यकीय शिक्षण घेवक याक सुध्दा लॉ कॉलेज,मेडीकल कॉलेज होऊ शकता नाय. कोकणातलो माणूस मुंबईत इल्यावर त्येका रोजगार मिळवून देण्याच्या दृष्टीने पावला उचलूक व्हयी. कोकणात इलेले कारखाने उदा. करुळचो काचकारखानो,कुडाळचो तेलगिरण्यो,महानंदा पशुखाद्य कारखानो, वगैरे सारखे कारखाने अनुक्रमे पाच - सहा महिने,एक वर्ष अशा कालावधींमध्ये बंद पडले. जंय पशुच नाय थंय पशुखाद्याचा काय काम ? सरकारी दूध डेरी बंद पडल्यानंतर महानंदा दूध डेरीच्या जीवावर पुन्हा सरकारी दूध डे-यो सुरु झाल्यो. कोकणाचो विकास होवक व्हयो, अशी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची इच्छा असतांना सुध्दा कोकणाच्या विकासाच्या संदर्भातील अनेक प्रश्नांच्या

3P -2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

बाबतीत सरकारने आमची चेष्टा करणा, हया बरोबर नाय. सदरचो प्रस्ताव सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हयेंनी हयाच्या आधीच्या अधिवेशनांमध्ये सुध्दा मांडण्याचो प्रयत्न केलो होतो. पण हयो प्रस्ताव आताचा अधिवेशन,पुढचा अधिवेशन,त्यापुढचा अधिवेशन असा करता करता या अधिवेशनात चर्चेक इलो. हयाच्या पूर्वी ज्यावेळी आम्ही जिल्हापरिषदेत होतोव त्यावेळी निदान आम्ही त्या सभेत जा काही बोलत होतोव, त्याप्रमाणे घडत तरी होता पण आता हया विधानपरिषदेमध्ये बेंबीच्या देठापासून कितीय बोललोव तरी काहीएक कार्यवाही केली जाना नाय. कोकणाच्या विकासाच्या अनेक बाबीसंदर्भात पंचवार्षिक योजना बनवा अगर कोणत्याही योजना बनवा. त्येंची अंमलबजावणी तुम्ही जोपर्यंत नीट करनास नाय तोपर्यंत त्याका कायसुध्दा अर्थ नाय. तसेच, मी आपल्या माध्यमातून या सभागृहास अशी विनंती करतंय की, कोकणाच्या विकासासाठी व्हयो तेवढो, आवश्यक तेवढो तो निधी उपलब्ध करुन द्येवा आणि कोकणाक ख-या अर्थाने न्याय द्येवा, एवढा बोलान मी माझे दोन शब्द संपवितय.

------------

यानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहाची नियमित बैठक आज सकाळी 11 वाजता सुरु झालेली आहे. उद्या सुट्टी असल्यामुळे सभागृहाची बैठक होणार नाही. आता 5 वाजून 35 मिनिटे झालेली आहेत. अजून दोन-तीन सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली तरी ही चर्चा आज पूर्ण होणार नाही. म्हणून आता सभागृहाची बैठक स्थगित करुन बुधवारी सकाळी कोकण विकासाच्या प्रस्तावावरील चर्चा घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, अजून एक तास चर्चा होऊ शकते.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी आपले भाषण सुरु करावे.

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी अत्यंत महत्वाचा प्रस्ताव मांडलेला आहे. मागच्या तीन अधिवेशनानंतर आज हा प्रस्ताव चर्चेला आलेला आहे. कोकण विकासाच्या प्रस्तावावर चर्चा करीत असतांना मला असे नमूद करावयाचे आहे की, कोकणाचा विकास झालेला नाही, ही भावना चुकीची आहे. 50 वर्षापूर्वी कोकण कसा होता आणि आजचा कोकण कसा आहे, हे बघितले पाहिजे. 50 वर्षापूर्वीच्या कोकणामध्ये आणि आजच्या कोकणामध्ये जमीन आसमानचा फरक आहे. कै.भाई सावंत आणि इतर नेत्यांनी कोकणाच्या विकासासाठी प्रयत्न केले. सन्माननीय सदस्यांनी सिंधुदुर्ग जिल्हा बघण्यासाठी यावे. सिंधुदुर्ग जिल्हयातील रस्त्यांसारखे रस्ते इतर कोणत्याही जिल्हयामध्ये आपल्याला बघावयास मिळणार नाहीत. कोकणाचा विकास झालेला नाही, असे म्हणण्याची विरोधकांची पद्धत आहे. ती पद्धत बरोबर नाही. संपूर्ण देशाचा, संपूर्ण महाराष्ट्राचा विकास झाला पाहिजे. त्यामध्ये कोकणाचा काय रोल आहे, याला महत्व दिले पाहिजे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कोकणाचा विकास झ ालेला नाही, असे म्हणण्याची विरोधकांची पद्धत आहे, असे सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत म्हणाले. कोकणाची प्रगती झालेली नाही असे विरोधकांचे मत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी तुमचे विरोधक आहेत काय ? सन्माननीय सदस्यांनी असे बोलणे योग्य नाही.

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, कोकणाचा विकास झालेला नाही, असा मुद्दा प्रचारासाठी वापरला जातो. कोकणाचा विकासच झालेला नाही, असे मी म्हणत नाही. प्रश्न असा आहे की, सन 2006 पासून आपण कोकणाच्या विकासाबाबत चर्चा करीत आहोत. मी सन 1991 मध्ये राजकारणामध्ये आलो. पूर्वीच्या कोकणामध्ये आणि आताच्या कोकणामध्ये जमीन आसमानचा फरक आहे. फलोद्यानाच्या बातीत कोकणाची प्रगती झालेली आहे. त्यामुळे कोणातील शेतकरी सुखावलेला आहे, हे आपल्याला अमान्य करता येणार नाही. कोकण विकासाच्या प्रस्तावावर चर्चा करुन आपण कोकणातील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करु. कोकणातील चार विभाग माझ्यासमोर येतात. पहिला विभाग म्हणजे, ठाणे जिल्हयातील आदिवासी विभाग. हा वेगळया प्रकारचा विभाग आहे. कोकणाच्या प्रश्नापासून हा विभाग वेगळा आहे. दुसरा विभाग म्हणजे औद्योगिकीकरण झ ाालेल्या ठाणे आणि रायगड परिसरातील विभाग. तिसरा विभाग म्हणजे, रत्नागिरी आणि रायगडमधील ग्रामीण विभाग आणि चौथा विभाग म्हणजे सिंधुदुर्ग जिल्हयाचा विभाग. या विभागांच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन आपल्याला नियोजन करावे लागणार आहे. उदाहरणार्थ औद्योगिकीकरण रायगड, ठाणे आणि थोडया फार प्रमाणात रत्नागिरी जिल्हयामध्ये झाले पाहिजे, असे आमचे म्हणणे आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील विजयदुर्ग येथे औष्णिक विद्युत प्रकल्प येणार होता. त्या प्रकल्पाला आम्ही कडाडून विरोध केला आणि तो प्रकल्प रद्द करुन घेतला. विजयदुर्ग येथील औष्णिक विद्युत प्रकल्पामुळे देवगडचा आंबा धोक्यात आला होता.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत.....

आंब्याच्या पीकाचे उत्पन्न कमी होत आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात मुबलक नैसगिक सांधनसंपत्ती आहे. येथून गोवा राज्य जवळ आहे. सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा व्हावा म्हणून माजी केंद्रीय मंत्री कै.माधवराव शिंदे यांनी प्रयत्न केले होते. कै.माधवराव शिंदे स्वत: आले होते व त्यांनी पाहणी करुन पर्यटनाच्या दृष्टीकोनातून मदत जाहीर केली होती. पर्यटनाचा विचार करीत असताना कोकणात प्रदुषण होऊ नये म्हणून औष्णिक प्रकल्प आणू नयेत, असे बोलले जाते. परंतु काही लोकांच्या मतानुसार अशा प्रकल्पामुळे विकासही होत असतो, त्यामुळे त्याची आवश्यकता असते. परंतु कोकणात पर्यटनाचा विकास करावयाचा असल्यास असे प्रकल्प आणू नये, ही माझी भूमिका आहे. कोकणचे नियोजन करीत असताना सामाजिक व आर्थिक दृष्टीकोन आपण नजरेसमोर ठेवला पाहिजे व निधीचे न्याय वाटप केले पाहिजे. कोकणातील आदिवासी बांधवांचे दु:ख कोणी बघत नाही. आदिवासी विभागावर फार कमी चर्चा होते. मी नाशिकहून जव्हार, मोखाडा असा गाडीने प्रवास केला आहे, 10 वर्षानंतर मी तेथे गेलो होतो, तेथे आढळून आले आहे की, आदिवासी भागातील जंगले पूर्णपणे नष्ट झालेली आहेत. कॉन्ट्रॅक्टरांनी जंगले नष्ट केली आहेत. गरीब आदिवासीची परिस्थिती बिकट आहे, त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाही, ही दुरावस्था आहे.

सभापती महोदय, मी सभागृहास सांगू इच्छितो की, मुंबई युनिव्हरसिटीची सिनेट मिटींग होती, त्या सिनेट मिटींगमध्ये मी प्रश्न विचारला होता. आदिवासी विभागातील किती मुलांनी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. विद्यापीठाच्या नोंदीनुसार मागच्या वर्षी 100 पैकी 10 मुले पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेली आहेत. त्या अगोदरच्या वर्षी 19 मुले पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेली आहेत. सभापती महोदय, कोकणातील वनश्रीचे संरक्षण व आदिवासींचे संरक्षण करण्याची आवश्यकता आहे, हे मी नमूद करतो. माननीय आदिवासी मंत्र्यांनी याकडे लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो. आदिवासी व कोकणच्या प्रश्नावर विधानसभेत व विधान परिषदेत यापूर्वी वेळोवेळी चर्चा झ ालेली आहे.

सभापती महोदय, कोकणाकडे पर्यटनाच्या दृष्टीकोनातून बघितले तर अत्यंत संपन्न जिल्हे आहेत. परंतु विकासाच्या दृष्टीकोनातून आपण जोपर्यत लक्ष देत नाही तोपर्यत पर्यटन, सिंचन,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

कर्नल सुधीर सावंत.....

औद्योगिक, सामाजिक, आर्थिकदृष्टया कोकणचा विकास होणार नाही. सिंचनाची व्यवस्था करुन पाण्याचा वापर झाला पाहिजे. कोकणातील सिंचनाचा विषय फार मोठा आहे. कोकणात उपलब्ध सिंचन व्यवस्थेच्या फक्त 16 टक्के पाणी प्रत्यक्ष वापरले जाते, त्याचे कारण काय ? कोकणातील जमीन अनेक ठिकाणी विखुरलेली आहे. उदा. एका घरामध्ये 7 एकर जमीन आहे, ती 23 ठिकाणी विखुरलेली आहे, 2-2 किंवा 3-3 कि.मी. दूर आहे. त्यामुळे सिंचनाची व्यवस्था झाली तर कोणत्या तुकडयाला प्रथम पाणी घेऊन जायचे हा प्रश्न आहे. त्यामुळे पाण्याचा वापर होत नाही. आधुनिक अभ्यासक्रमाची शैक्षणिक केंद्रे कोकणात उभारली जात आहेत. कृषी विज्ञान महाविद्यालयेही आहेत. परंतु कोकणात सिंचनाची व्यवस्था कशी करावयाची ? हा आमच्यापुढे मुलभूत प्रश्न आहे. सरकार पर्यटनाचा विकास करणार आहे, असे वेळोवेळी सांगितले जाते. परंतु समुद्रकिनाऱ्यावर अर्धा पट्टाही मिळणार नाही की, जो एका माणसाच्या नावावर असेल, हा पट्टा 50 लोकांच्या नावावर असतो. येथे अर्धा एकराचा प्लॉट सलग मिळणार नाही. म्हणून माझी सूचना अशी आहे की, एक लाख हेक्टर जमिनीवर फलोत्पादनाचा कार्यक्रम राबविता येऊ शकतो, याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. परंतु त्यामध्ये अडचण आहे की, 7-12 उतारा 50-100 लोकांच्या नावावर आहे. Absentee Landlordism अशी कोकणाची परिस्थिती आहे. कोकणामध्ये काही लोकांच्या जमिनी आहेत, परंतु ते लोक मुंबईत राहात आहेत, स्वत: शेती करीत नाही, तेथे एखादाच भाऊ राहतो. पूर्वी एकत्र कुटुंब पध्दती होती, त्यावेळी शेती केली जात होती परंतु आता विभक्त कुटुंब पध्दती आलेली आहे, त्यामुळे शेती करण्यासाठी कुटुंबाची तयारी नसते.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत .....

त्यामुळे यामध्ये मला एक सूचना करावयाची आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपण आपल्याकडे कसेल त्याची जमीन हा कायदा केला आणि तो राबविला. त्याप्रमाणे आज देखील कोकणामध्ये महसूल विभागामध्ये नियम आणि कायदा करण्याची आवश्यकता आहे की, जो तेथे कसत आहे त्याच्याच नावे ती जमीन होऊन त्यावरील सारे अधिकार त्याच्या नावे असले पाहिजेत. आता आपण कायदे करतो ते साऱ्या महाराष्ट्रासाठी असतात, कोकणासाठी वेगळा असा कायदा कसा करणार असे याबाबत म्हटले जाईल. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीसाठी आपण दोन कायदे स्वतंत्रपणे केलेले आहेत. एक म्हणजे बेदखल कुळांच्याबाबतीतील कायदा आणि दुसरा घरभाड्याच्या बाबतचा कायदा. हे दोन्ही कायदे सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यापुरतेच लागू आहेत. तसेच याही बाबतीत कोकणापुरता कायदा होणे आवश्यक आहे. कारण आमचा मच्छिमार बांधव पूर्ण कोकणामध्ये पसरलेले आहेत. ते समुद्रावर आपला व्यवसाय करतात. त्यांची तेथेच जवळ घरे आहेत पण त्या खालील जमीन मात्र त्यांच्या मालकीची नाही. त्यामुळे तो त्यावर कर्ज काढू शकत नाही. तसेच फिशिंग राईटस् म्हणजे काय आहे ? हेही त्याला माहिती नाही. तेथे ताज प्रकल्प पर्यटनासाठी म्हणून उभा राहिला आणि त्यांनी पुनर्वसनासाठी म्हणून संबंधित प्रकल्पग्रस्तांना दोन हेक्टर जमीन देण्याचा ठराव झाला परंतु तेथील एका एका जागेवर 100 मच्छिमार आहेत, त्यांचे काय करणार ? त्यांचे दुसरीकडे कोठे पुनर्वसन करावयाचे म्हटले तर त्यांना तेथून 500 मीटर मागे नेले जाणार पण हे मच्छिमार सदैव समुद्रावर असतात आणि तेथे त्यांना फिशिंग राईटस् आहेत त्याच्याबाबतीत तुम्ही काय करणार ? सभापती महोदय, याच संदर्भात उद्या एक बैठक बोलाविली गेली आहे. रायगड आणि तेथील एसइझेडमध्ये असलेल्या मच्छिमारांना तुम्ही तेथून उठवून कोठे पाठविणार आहात हा प्रश्न त्यात आहे. जेथे समुद्र नाही तेथे त्यांना पाठविणार का ? तेव्हा याचा विचार होणे अत्यावश्यक आहे. त्यांच्या फिशिंग राईटस्च्या संदर्भात देखील विचार होणे आवश्यक आहे. कारण समुद्रावरील मासेमारी ही त्यांची रोजीरोटी आहे. त्यामुळे त्या दृष्टीने त्यांच्या पुनर्वसनाच्याबाबत विचार आपण केला पाहिजे. हा एक फार मोठा मुलभूत प्रश्न आहे त्यावर विचार केल्याशिवाय मच्छिमारांसाठी विचार पूर्ण होऊ शकत नाही. सभापती महोदय, त्याचप्रमाणे घरभाड्याचा कायदा आल्यामुळे घराखालील जमीन ही त्याच्या मालकीची होऊ शकते. परंतु अजूनपर्यात तेथील 90 टक्के मच्छिमारांनी त्यासाठी अर्ज केलेला

...... 3एस 2 ...

कर्नल सावंत .....

नाही. कारण त्यांना त्या कायद्याची माहितीच नाही आणि आपले मच्छिमार खाते झोपा काढते आहे. सभापती महोदय, गेल्या पाच वर्षातील माझा अनुभव विशेष करून या मत्स्यव्यवसाय खात्यासंबंधातील अनुभव अत्यंत वाईट आहे. या खात्याकडून कोणालाही काहीही सहकार्य मिळत नाही. कोठल्या कोठल्या बंदराला तेथील गाळ काढण्यासाठी किती रक्कम दिली हेही त्यामुळे समजू शकत नाही. केवळ मत्स्यव्यवसाय व संवर्धन विभाग, बंदर विभाग आणि पत्तन अभियंता ही या संबंधातील तीन खाती आहेत. यापैकी कोस्टल इंजिनिअर हा आपल्या सा.बां.विभागाच्या अंतर्गत येतो आणि बंदराजवळील बांधकामे करण्याचे काम तो करतो. त्यानंतर बंदर खाते आहे आणि फिशरींग खाते आहे. या तिन्ही खात्यांमधील भांडणामुळे त्या खात्यांकडे आलेले पैसे वापरले गेले नाहीत, जात नाहीत हा अनुभव आहे. त्यामुळेच बंदरांतील गाळ काढण्यात आलेला नाही. सभापती महोदय, मी अनेकवेळा हा विषय माननीय मुख्यमंत्र्यांकडे काढलेला आहे आणि त्यावर चर्चा झाली पाहिजे म्हणून सांगितले. परंतु तशी चर्चा अद्यापही झालेली नाही. या विषयामध्ये तीन वेगवेगळे विभाग संबंधित असल्याने त्यावर त्या तीनही विभागांचे अधिकाऱ्यांसह चर्चा होणे आवश्यक आहे. परंतु तशी बैठक आजवर झालेली नाही. सभापती महोदय, मी मानीय मुख्यमंत्र्यांकडे 1992 मध्ये प्रस्ताव दिला होता. त्यात मी मेरिटाईम बोर्डाची मागणी केली होती. त्यामध्ये बंदर खाते, फिशरी खाते आणि पत्तन विभाग एकत्रित करून एकाच अधिकाऱ्याकडे या तिन्ही खाती असली पाहिजेत अशी सूचना केली होती. माननीय मुख्य सचिवांकडे या संदर्भात तीन बैठका झाल्या पण अजूनही त्याबाबत निर्णय झालेला नाही. तो झाल्याशिवाय बंदरांबाबत आणि खार जमिनींबाबत विचार होऊ शकत नाही. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 3टी 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...
म्हणून तातडीने त्यासंबंधी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, तो लवकरात लवकर घ्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा मत्स्य व्यवसायासंबंधी आहे. कोकणामध्ये ज्याप्रमाणे प्रवासी बंदर आहेत त्याप्रमाणे फिश लँडींग हार्बर आहेत. या दोघांच्या वेगवेगळया गरजा आहेत, त्या गरजा पाहून त्यांच्याकडे बघण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, समुद्रामध्ये करावयाच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये स्वतंत्र केडर निर्माण करण्यात आले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गडचिरोली जिल्हयातील इंजिनिअर्सना किनारा अभियंता म्हणून कोकणामध्ये पाठविले जाते. जिल्हयाच्या ठिकाणी रस्त्याचे बांधकाम करणारे इंजिनिअर बंदराचे काम करावयास येतात ही शोकांतिका आहे. त्याकरिता समुद्रामध्ये करावयाच्या बांधकामाकरिता, बंदरांच्या बांधकामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये वेगळे केडर निर्माण केले पाहिजेत. अशाप्रकारचे वेगळे केडर गुजरात, तामिळनाडू व केरळ राज्यामध्ये असतांना आपल्या महाराष्ट्रामध्ये कां होऊ शकत नाही?

सभापती महोदय, आज ग्लोबल वॉर्मिंगमुळे समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत चालली आहे. त्यामुळे कोकणची किनारपट्टी किंवा मुंबई शहर धोक्यामध्ये आले आहे. अशाप्रकारच्या सूचना जगामधून आपल्याला मिळत आहेत. त्यादृष्टीने काहीही उपाययोजना होत नाही. समुद्र किनाऱ्यावरील वाळूची धूप प्रचंड प्रमाणात होत असल्यामुळे त्यापासून देखील सामाजिक धोका निर्माण झाला आहे. त्यासाठी आपण काय करीत आहात? त्यादृष्टीने आपण कोणतीही चर्चा करीत नाही, विचार करीत नाही. समुद्र किनाऱ्याचा अभ्यास कुणी केला आहे काय? आज मुंबईमध्ये बॅकबे रेक्लमेशन निर्माण करण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये देवबाग बंदर कां उद्ध्वस्त झाले? त्या विषयी महाराष्ट्रामध्ये अभ्यास करण्यात आला नाही. कोस्टल एरीया मॅनेजमेंटच्या दृष्टीने हा गंभीर विषय आहे. संपूर्ण जगामध्ये कोस्टल एरीयाचे संरक्षण करण्यासाठी वेगवेगळे चर्चा सत्र आयोजित केले जातात, नियम केले जातात, कायदे केले जातात. दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे मी आभार मानतो की, त्यांनी त्या काळात सी.आर. झेडचा कायदा आणला. त्या कायद्यामुळे 500 मीटरपर्यंत बांधकाम करण्यास प्रतिबंध घालण्यात आले. नाहीतर सर्व किनारा उद्ध्वस्त झाला असता. सी.आर. झेड मुळे आमचा मच्छिमार वाचला आहे, किनारपट्टी दिसत आहे. नाहीतर ती उद्ध्वस्त झाली असती.


असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल  सुधीर सावंत...

(अडथळा)

यासंबंधी अभ्यास केल्यानंतर मी माझे मत मांडत आहे. समुद्र किनारा बिल्डर्सना विकून टाकावयाचा असेल तर माझी त्याला हरकत नाही...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अलिबाग, रेवदंडा येथे बिल्डर्स नाहीत. रेकॉर्डवर चुकीची नोंद होऊ नये एवढेच मला सांगावयाचे आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, सी.आर.झेड संबंधी मी माझे मत व्यक्त केले आहे. स्वर्गीय इंदिराजी गांधी यांनी या देशाची किनारपट्टी वाचविली. नाही तर या देशाच्या किनारपट्टीवर उद्योगधंदे निर्माण झाले असते. आज समुद्रामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये प्रदूषण निर्माण झाले आहे. त्यामुळे मासे मिळत नाहीत. आज सर्व मच्छिमारांची प्रमुख मागणी आहे की, आपण माश्यांचा दुष्काळ जाहीर करावा. माश्यांच्या उत्पादनावर त्याचा परिणाम झाला आहे. आपण दरवर्षी दुष्काळ जाहीर करु शकत नाही..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

कर्नल  सुधीर सावंत : माननीय सदस्य श्री. रावते साहेब आपले भाषण मी नेहमी शांतपणे ऐकून घेतो.दुसऱ्या सदस्यांच्या भाषणामध्ये अडथळा आणण्याची आपल्याला संवय आहे. पुढील वेळेस मी देखील आपणास बोलू देणार नाही...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी सी.आर.झेड. संबंधी केलेला उल्लेख बरोबर आहे. समुद्र किनाऱ्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण वाढत होते ते सी.आर.झेड. कायद्यामुळे थांबले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ □ल□□ (पुढे सुरु..

सभापती महोदय, महाराष्ट्र हे 100 टक□ सीआरझेडची प्रामा□□ अंमलबजाव□ □र□रे राज्य आहे. □रळ सार□ा इतर राज्यांनी सीआरझेडची ऐसी तैश्ी □लेली आहे. अशी राज्ये दे□ील आपल्याला पहायला मिळतात.

कर्नल सुधीर सावंत : सन्माननीय सदस्यांचे म्ह□□ मान्य आहे. परंतु महाराष्ट्र राज्याने सीआरझेडची अंमलबजाव□ □ल्यामुळे समुद्र तटाचे संर□□ झालेले आहे. सीआरझेडच्या बाबतीत काही ठि□□ रिलॅक्सेशन पाहिजे असेल तर त्याबाबतीत □यद्यामध्ये तरतुदी आहेत. पर्यटनासाठी, मच्छीमारांच्या बंधाऱ्यासाठी एक्झम्प्शन पाहिजे असेल तर राज्य सर□रने तसा प्रस्ताव □द्रा□डे मान्यतेसाठी पाठवावयास पाहिजे. इतर राज्ये जसे एक्झम्प्शन मिळवितात तसे आपल्यालाही मिळविता येईल.

श्री.□रुनाथ □ल□□ : सिंधुदु□ जिल्ह्यातील बांध□मे थांबविली. त्यांना परवान□ दिली नाही.

□र्नल सुधीर सावंत : चांगल्या कामासाठी सीआरझेडमधून एक्झम्प्शन करुन आणावयाचे असेल तर ते काम माझ्याकडे सोपवावे. त्यासाठी मी □द्रा□डे जाऊन त्याबाबतचा पाठपुरावा करीन प्रत्ये□ □ोष्टीमध्ये तांत्रि□ मुद्दे आहेत, त्या संदर्भात राज्य सर□रने □यदा □र□ाची □रज आहे. सीआरझेडचे समर्थन □रत असताना, मच्छिमारांसाठी आ□ पर्यटन व्यवसायासाठी सीआरझेडची अडच□ येत असेल तर त्या संदर्भात सर□रने प्लॅन तयार करावा आणि तसा प्रस्ताव □द्र सर□र□डे पाठवावा. त्यासाठी आपल्याला परवान□ मिळविता येईल. परंतु राज्य सर□रला यामध्ये □य अडच□ आहे ? हे समजत नाही. सीआरझेडमुळे तटवर्ती किनारा अबाधित रा□ला गेलेला आहे. माझी विनंती आहे □, पर्यटनाचा वि□स □र□ाचे □म एमटीडीसी□डे देऊ नये, पर्यटन विभा□□डेही ते □म देऊ नये त्यांच्या□डून □हीच □म हो□र नाही. उलट त्यांच्या□डू-न किनारपट्टी उद्ध्वस्त होईल. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये फाईव्ह स्टार हॉटेल □ढून उपयो□ हो□र नाही. ज□मध्ये □ठेही नाही असे प्रॉडक्ट आपण उपलब्ध करुन दिले पाहिजे. सिंधुदु□

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत .....

जिल्ह्याची संस□ती त्यांनी पाहिली पाहिजे. "स्टे वुईथ इंडियन फॅमिली" असा प्रोजेक्ट आपण राबवावा. 'अतिथी देवो भव' असे आप□ म्ह□तो. यामध्ये पर्यटकांनी त्या ठि□□च्या लो□च्या घरी राहावे अशी कल्पना आहे. हॉटेलसाठी आप□ 25 टक्□ सबसिडी देतो प□ घरातील पर्यटनाला सबसिडी □ देत नाही ? आप□ "स्टे वुईथ इंडियन फॅमिली" असा प्रोजेक्ट राबविला पाहिजे. पिं□ळी येथे तशी सुंदर जा□ आहे. त्या ठिकाणी गावांचा विकास केला ग्रामीण पर्यटनाचे 50 प्रकल्प निर्माण होतील. □मी□ पर्यटनासाठी □द्र सर□रने सबसिडी दिली पाहिजे. तसा प्रयत्न व्हावा. सिंधुदू□ जिल्हयाला तटवर्ती किनारा आहे. तेव्हा त्या ठि□□ □मी□ पर्यटनावर भर दे□ाची □रज आहे. तसेच सावंतवाडीजवळ सिंधुदू□ □ल्ला आ□ विजयदू□ □ल्ला आहे. तो परिसर हेरिटेज म्हणून जाहीर केलेला आहे. त्या परिसराच्या वि□सासाठी प्रयत्न □ले पाहिजेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत .....

आम्ही कोकण पॅकेजच्या माध्यमातून 50 लाख रुपये सावंतवाडीच्या राजवाड्यासाठी दिले होते परंतु त्या ठिकाणी एकही पैसा खर्च झालेला नाही. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुनील तटकरे साहेब या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी आणि आम्ही मिळून त्या प्रकल्पाला पैसे दिले होते. सावंतवाडीच्या राजवाड्यासाठी अजून ते पैसे का वापरण्यात आले नाहीत ? यामध्ये राजकारण आहे. कोणाला तरी ते नको होते म्हणून ते झाले नाही. याची चौकशी झाली पाहिजे. सावंतवाडी हे कोकणाचे भूषण आहे. त्या ठिकाणी जो राजवाडा आहे त्याची जोपासना करण्यासाठी पैसे दिले पण कायदा आड येतो. तो राजवाडा खाजगी मालकीचा आहे असे म्हणतात. त्या ठिकाणी राजघराणे राहते म्हणून पैसे कसे द्यावयाचे असा प्रश्न निर्माण केला जातो. म्हणून त्या ठिकाणी पैसे देण्याच्या बाबतीत मार्ग काढावा लागेल. पर्यटन धोरण हा एक मोठा विषय आहे. केंद्र सरकार त्या ठिकाणी 500 कोटी रुपये देण्यास तयार आहे परंतु ते पैसे वापरण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे प्रकल्पच नाहीत. खाजगी जागेवर सरकारी पैसे खर्च करता येत नाहीत असा नियम असल्यामुळे पर्यटनासाठी कोणताही प्रकल्प आपण पुढे केला तरी ते पैसे त्या ठिकाणी वापरता येत नाहीत. म्हणून एम.टी.डी.सी.कडे जे प्रस्ताव दिलेले आहेत त्या ठिकाणी खाजगी जमिनीवर प्रकल्प उभा करता येत नाही म्हणून पैसे मिळालेले नाहीत. याबाबतीत तोडगा काढला पाहिजे. कोकणात आंबोली, चौकुळ आणि गेळे या तीन ठिकाणी हिल स्टेशन आहेत. त्या ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टीने आजपर्यंत कोणतीही प्रगती झालेली नाही.

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार ) : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 6.30 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, आंबोली, चौकुळ आणि गेळे या तीनही ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टीने नियोजन झालेले नाही. त्यामुळे या तीन गावांचे पर्यटन प्राधिकरण तयार करण्यात यावे अशी मागणी आम्ही केलेली आहे. कारण ग्रामपंचायतीमार्फत त्या ठिकाणी पर्यटनाचा विकास होणार नाही. त्यामुळे या तीन गावांचे पर्यटन प्राधिकरण झाले पाहिजे. त्याचप्रमाणे आंबोली या ठिकाणी ॲडव्हेंचर्स स्पोर्टस् ॲकॅडमी सुरु करावी. हिमाचल प्रदेश नंतर साहसी खेळाचे ठिकाण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KGS/ MAP/ KTG

कर्नल सुधीर सावंत .....

म्हैसूर येथे आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आंबोली आणि वेंगुर्ला या ठिकाणी साहसी खेळाची ठिकाणे उभी राहू शकतात. त्या ठिकाणी गोव्याकडून प्रचंड मागणी आहे. परंतु पुन्हा कायदा आडवा आला. 50 लाख रुपये ॲडव्हेंचर्स स्पोर्टस् ॲकॅडमीसाठी दिले होते परंतु खाजगी संस्थेला पैसे देता येत नाहीत म्हणून त्या ठिकाणी ॲडव्हेंचर्स स्पोर्टस् ॲकॅडमी उभी राहू शकली नाही. ॲडव्हेंचर्स स्पोर्टस् ॲकॅडमी फक्त माजी सैनिकच उभी करु शकतात. ज्या ठिकाणी ॲकॅडमी चालू आहे त्या ठिकाणी परदेशातून मोठ्या प्रमाणावर लोक येतात. त्या ठिकाणी जी सुविधा पाहिजे, जे आधुनिकीकरण केले पाहिजे त्यासाठी सरकारने मदत केली पाहिजे. त्यामुळे हे पैसे त्यांना देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, तटवर्ती भागाचा विकास करावयाचा असेल तर खऱ्या अर्थाने कोकणामध्ये मुंबई ते गोवा हा रस्ता चांगला झाला पाहिजे. आपण सागरी महामार्ग म्हणतो परंतु तो नुसता नावाला सागरी महामार्ग आहे. कोणत्याही शहरातील एखाद्या गल्लीप्रमाणे तो सागरी महामार्ग आहे. त्यामुळे त्या मार्गावरुन मोठ्या प्रमाणावर वाहतूक होऊ शकत नाही. त्या ठिकाणी अजूनही दोन पूल पूर्ण व्हावयाचे आहेत. म्हणून आम्ही प्रस्ताव दिला होता की, हा सागरी महामार्ग चौपदरी असला पाहिजे. मुंबई ते गोवा चौपदरी कोस्टल हायवे झाला पाहिजे. महाराष्ट्रामध्ये सगळीकडे बी. ओ. टी. तत्वावर रस्त्यांची कामे करतो. कोकणात एकाही ठिकाणी तसे काम झालेले नाही. कोकणामध्ये ते व्हायेबल नाही असे म्हणता येणार नाही. या किनारपट्टी मुंबई-गोवा चौपदरी रस्ता पूर्णपणे व्हायेबल आहे. पर्यटन महामार्ग म्हणून तो रस्ता करावा अशी विनंती केलेली आहे. सी.आर.एफ. मधून निधी द्यावा यासाठी केंद्रशासनाकडे मागणी केलेली आहे परंतु याबाबत शासनाने नियोजन केले पाहिजे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 18:05

(कर्नल सुधीर सावंत...)

सार्वजनिक बांधकाम खात्याची हा रस्ता करण्याची तयारी नाही. म्हणून हा रस्ता एमएसआरडीसीकडे वर्ग करावा अशी मागणी केली. परंतु सार्वजनिक बांधकाम खाते हा रस्ता एमएसआरडीसीकडे वर्ग करण्यास तयार नाही. त्यामुळे बी.ओ.टी. तत्वावर हा रस्ता होऊ शकत नाही.

कोकणाच्या दृष्टीने कृषी आणि फलोत्पादन हे दोन महत्वाचे विषय आहेत. कोकणातील आंबा उत्पादकाला योग्य भाव मिळावा म्हणून आम्ही आंबा महोत्सव आयोजित केले. परंतु एपीएमसी आणि मुंबईतील दलाल यांच्या कचाट्यात कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी सापडलेला आहे. या दलालांच्या कचाटयातून त्याची सुटका होत नाही. तीन महिन्यापूर्वी एक्सपोर्टर्स्, ॲपेडाचे अधिकारी, महाराष्ट्राचे कृषी अधिकारी हे एकत्र आले होते. त्यावेळी एक्स्पोर्टर्स्ना असे विचारण्यात आले की, ते थेट शेतक-यांकडून माल का घेत नाहीत ? त्यावेळी त्यांनी सांगितले की, "थेट शेतक-यांकडून माल घेण्यावर दलालांनी बंदी घातलेली आहे. शेतक-यांकडून थेट माल घेतला तर तुम्हाला महाराष्ट्रामध्ये काम करु देणार नाही असे दलालांनी आम्हाला सांगितले." हे माफिया दलाल आणि एपीएमसी मुंबईमध्ये येऊन बसलेले आहेत. याबाबतीत शासन काही करणार आहे की नाही ? सन्माननीय मुख्यमंत्री आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आले होते त्यावेळी आंबा बागायतदारांचा मेळावा आयोजित केलेला होता. त्यावेळी नवी मुंबईतील एमपीएमसीमध्ये गुप्त पध्दतीने होणारा लिलाव बंद करावा अशी मागणी करण्यात आली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पुढच्या दोन वर्षामध्ये गुप्त पध्दतीने होणारा लिलाव बंद केला जाईल. त्यासंबंधी कायदा देखील करण्यात आला. परंतु कोणत्याही एपीएमसीमध्ये गुप्त पध्दतीने होणारा लिलाव थांबलेला नाही. सभापती महोदय, आपण जर नवी मुंबई येथील मार्केटमध्ये गेलात तर तेथे गुप्त पध्दतीने लिलाव सुरु असल्याचे आपणास दिसून येईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी असेही सांगितले की, 40 टन आंबा निर्यात केला जाईल. परंतु पणन खात्याच्या अेपीएमसीच्या माध्यमातून आणि दलालांच्या माध्यमातून कोकणातील गरीब शेतक-याची ससेहोलपट होत आहे. कोकणामध्ये आंबा आणि काजू हे दोन मूलभूत प्रोडक्टस् आहेत. सभागृहामध्ये सन्माननीय कृषी मंत्री उपस्थित आहेत. कोकणातील कोणकोणत्या भागामध्ये कोणकोणती पिके

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 18:05

(कर्नल सुधीर सावंत...)

घेता येतील यासंबंधीचे संशेधान करावे अशी मागणी आम्ही कृषी विद्यापीठाकडे केली होती. एक एकरामधून शेतक-याला किती पैसा मिळेल, क्रॉपिंग पॅटर्न काय असला पाहिजे यासंबंधीचा अभ्यास झालेला नाही. कोकणाचे भौगोलिक प्रश्न वेगवेगळे आहेत. त्यामुळे क्रॉपिंग पॅटर्न देखील वेगवेगळे असले पाहिजेत. कोठे अननसचे पीक चांगले येते तर कोठे आवळ्याचे पीक चांगले येते, कोठे मसाल्याचे पीक चांगले येते. म्हणून कोकणातील शेतक-याला एका एकरातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळण्याच्यादृष्टीने क्रॉपिंग पॅटर्न तयार करण्याची आवश्यकता आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यामध्ये विकासाचा पॅटर्न हा भौगोलिक परिस्थिती नुसार वेगळा असला पाहिजे. तसेच ठाणे आणि अर्बन कोकणामध्ये विकासाचा पॅटर्न वेगळा असला पाहिजे. अर्बन कोकणा विषयी माझा अभ्यास नसल्यामुळे मी त्याबाबतीत जास्त बोलणार नाही. कोकणामध्ये अबसेन्टीझम लॅण्डलॉर्डीझम हा महत्वाचा विषय आहे. कोकणातील शेतक-यांना एकत्र करुन त्यांची जमीन जोपर्यन्त एकत्र केली जात नाही तोपर्यन्त कोकणातील जमीन सिंचनाखाली, नांगराखाली येणार नाही. कोस्टल एरिया मॅनेजमेंट, खार लँड, बंदरे आणि मत्स्यव्यवसाय ही चार महत्वाची खाती आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 18:10

कर्नल सुधीर सावंत....

या सर्व खात्यांना एकत्रित करण्याच्या दृष्टीकोनातून नियोजन करावे लागेल. तिसरा विषय म्हणजे कोकणातील शेतीमाल, हॉर्टिकल्चर प्रॉडक्ट यांना योग्य बाजारभाव मिळाला पाहिजे. त्यासाठी एपीएमसीची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी काम करावे लागेल. अशा प्रकारे शासनाने नियोजन केले तर कोकणाचा आजपर्यंत जितका विकास झाला त्यापेक्षा भविष्यात हजार पटीने विकास होऊन कोकण भारतातील सर्वात मोठे प्रगतीशील केंद्र होऊ शकेल असे मला वाटते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी बाजारभावाचा उल्लेख केला त्या संदर्भात मला माहिती हवी आहे. कोल्हापूरमध्ये आंब्याची पहिली पेटी 11 हजार रुपयाला विकली गेली असे मी ई टीव्हीवर पाहिले. आजही 2000 रुपयांपेक्षा कमी भावात आंब्याची पेटी मिळत नाही. हे गणित माझ्या लक्षात आलेले नाही.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगला मुद्दा उपस्थित केला आहे. या प्रश्नाचे मुख्य कारण म्हणजे, 15 एप्रिलपर्यंत 10 टक्के सुध्दा आंबा मार्केटमध्ये येत नाही. त्यामुळे 2000 रुपये सुध्दा आंब्याच्या पेटीला भाव मिळतो. परंतु एकदा आंब्याची आवक बाजारात आली की, 100 रुपये सुध्दा आंब्याच्या पेटीला भाव मिळत नाही.

सभापती महोदय, मी जे महत्वाचे मुद्दे मांडले आहेत त्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करुन योग्य ती पावले उचलावीत अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-----

..2.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, कोकणाच्या विकासासंबंधी मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे हा प्रस्ताव चर्चेसाठी यायला सुध्दा विलंब लागला. तीन अधिवेशनानंतर प्रस्ताव चर्चेला आला आहे. कोकणाला जेव्हा न्याय मिळायचा तेव्हा मिळेल परंतु कोकणातील आमदारांनी त्यांच्या वेदना याठिकाणी व्यक्त केल्या आहेत. वेळेचे बंधन असल्यामुळे नेमके मुद्दे मांडावे लागणार आहेत. कोकणाच्या विषयामध्ये निरनिराळया भागातील मुद्यांसंबंधी अनेक तास बोलता येईल असे कोकणातील विषय आहेत. परंतु 6.30 वाजेपर्यंत वेळेची असलेली मर्यादा लक्षात घेता मी याठिकाणी नेमके मुद्दे मांडणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी यापूर्वी सांगितलेच आहे की, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर अनेक वर्षे झाली परंतु कोकण हा आजपर्यंत मागासलेला राहिला. त्यामुळे त्याच्या विकासाच्या असमतोलाबद्दल कोकणातील जनतेमध्ये तीव्र आक्रोश निर्माण झाला. म्हणून शासनातर्फे दांडेकर समितीची स्थापना झाली. दांडेकर समितीने निरनिराळ्या भागातील सिंचनाचा अनुशेष लक्षात घेऊन आपला अहवाल सादर केला. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी सांगितले की, 1058 कोटी रुपयांचा सिंचन क्षेत्रातील बॅकलॉग शिल्लक राहिलेला आहे. त्यामुळे हा जो आक्रोश आहे तो वेळीच थांबविला नाही तर कोकणातील तरुणवर्ग आक्रोश करीत राहील. असा आक्रोश कोकणातील प्रत्येक माणूस करीत राहील अशा प्रकारची स्थिती आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे कोकणाने महाराष्ट्राला आणि देशाला काय दिले नाही? अनेक प्रकारच्या क्षेत्रामध्ये चांगली माणसे दिली. कोकण देत राहिला, परंतु कोकणाला काही मिळाले नाही. कोकण ही शिवरायांची, परशुरामाची भूमी आहे. कोकणाने स्वातंत्र्य लढ्यामध्ये काम करणारी माणसे दिली. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, आगरकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक असे अनेक सामाजिक सुधारक, सकारात्मक काम करणारी माणसे या कोकणाने दिली. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्र असेल, सामाजिक क्षेत्र असेल, कोणतेही क्षेत्र घ्या, या कोकणाने देशाचे आणि राज्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी माणसे दिली. परंतु कोकणाला काही मिळाले नाही. कोकणातील माणसाला काही मिळाले नाही. रोजगार उपलब्ध झाला नाही. स्वयंरोजगाराची साधने होती ती पण काढून घेण्यात आली. त्यामुळे हा जो आक्रोश आहे त्या कोकणातील आमदारांच्या वेदना आहेत, भावना आहेत. या

..3..



SGB/ KGS/ KTG/ 18:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर........

न्याय्य भावना आहेत. त्यामुळे कोकणातील निरनिराळ्या क्षेत्रामध्ये अनेक प्रकारच्या ज्या त्रुटी आहेत त्यामुळेच हा आक्रोश निर्माण झालेला आहे. अनेक प्रकारचे विषय याठिकाणी मांडता येतील. परंतु कोकणाला स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ मिळाले पाहिजे ही आमची मुख्य मागणी आहे, ठाम भूमिका आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

सभापती महोदय, कोकण विकास महामंडळाला निधी मिळत नसेल तर कोकणचा विकास कसा होईल? आपण एका बाजूला कोकणाचा कॅलिफोर्निया करावयास निघाला आहात परंतु कोकणाकडे लक्ष देण्यास राज्यशासनास वेळच मिळत नाही अशी स्थिती आहे. आज कोकणाचे सौंदर्य नष्ट केले जात आहे. कोकणात कृषी आणि पर्यटनाचा विकास जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत कोकणाचा विकास होणार नाही. कोकणाचा विकास होण्यासाठी जे प्रयत्न व्हावयास पाहिजे तशा प्रकारचे प्रयत्न शासनाकडून होत नाही. आज कोकणातील माणूस रोजगारासाठी इकडे तिकडे फिरत आहे. कोकणातील माणूस आज मनीऑर्डरवर जगत आहे. कोकणामध्ये हॉस्पिटल्स आहेत परंतु त्या ठिकाणी डॉक्टर्स नाहीत अशी परिस्थिती आहे. डॉक्टर विना हॉस्पिटलचे काम कोकणात सुरु आहे. मी जेव्हा दापोली येथील हॉस्पिटलला भेट दिली त्यावेळेस मला तेथे एकच डॉक्टर आढळून आले त्यावेळेस मी त्यांना विचारले की, "या ठिकाणी एकच डॉक्टर आहे काय"? त्यावर डॉक्टरांनी सांगितले आहे की, "या ठिकाणी एकच डॉक्टर असून उद्या पासून मी सुध्दा येथून जाणार आहे". अशा प्रकारे कोकणातील हॉस्पिटलची परिस्थिती आहे. राज्यशासन कोकणातील हॉस्पिटलच्या संदर्भात जी अवहेलना करीत आहे ती योग्य नाही.

सभापती महोदय, कोकणातील शिक्षणाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते हे विचार व्यक्त करणार असल्यामुळे यासंदर्भात मी सविस्तर विचार व्यक्त करणार नाही. रायगड जिल्हयातील अनेक शिक्षण संस्थांना वेतनेतर अनुदान मिळालेले नाहीत. वेतनेतर अनुदान मिळत नसल्यामुळे सोने-नाणे गहाण ठेवून शाळा चालवाव्या लागत आहेत. अशा प्रकारे अक्षम्य दुर्लक्ष शासन करीत असल्यामुळे कोकणातील जनतेत चीड निर्माण होणे साहजिक आहे.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा आणि वाडा या ठिकाणचा परिसर निसर्गरम्य आहे. या ठिकाणी पर्यटन उद्योग चांगल्या प्रकारे जम बसवू शकतो. कोकणाला 720 कि.मी. चा समुद्र किनारा लाभलेला आहे. कोकणाला डोंगरपट्टी, किनारा आणि जंगलसंपदा लाभलेली असल्यामुळे कोकणात पर्यटनाचा व्यवसाय चांगल्या प्रकारे मिळून येथील जनतेला पर्यटनाच्या निमित्ताने चांगला व्यवसाय मिळू शकतो. परंतु आज कोकणातील डोंगर उद्ध्वस्त

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

करण्याचाच उद्योग चालविला जात आहे. कोकणातील डोंगर उध्वस्त होत असल्यामुळे कोकणाचे सौंदर्य लोप पावत आहेत. कोकणामध्ये आज अवैध रेती काढण्याचे तसेच अवैध मच्छिमारी करण्याचा उद्योग मोठया प्रमाणात चालला आहे. यामुळे कोकणातील माणूस आणि कोकण संपदा धोक्यात आलेली आहे.

सभापती महोदय, कोकणात धूप प्रतिबंधक बंधा-यास मंजुरी मिळते परंतु त्यासाठी निधी मिळत नाही हे मला येथे दुर्दैवाने सांगावे लागत आहे. यासंदर्भात वेळोवेळी पत्रे पाठवली तरी त्यासंदर्भात काहीच उत्तर विभागाकडून मिळत नाहीत. कोकणातील माणूस जगवावयाचा असेल, येथील तरुणांना रोजगार उपलब्ध करुन द्यावयाचा असेल तर त्यासाठी पर्यटन व्यवसाय हा एकच पर्याय आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी म्हटल्या प्रमाणे रेवस-रेडी सागरी महामार्ग करण्याची आवश्यकता आहे. रेवस-रेड्डी सागरी महामार्ग व्हावा ही कोकणातील जनतेची ब-याच दिवसाची मागणी आहे. रेवस-रेड्डी सागरी महामार्ग तयार झाला तर कोकणाला पर्यटनाचा चांगला उद्योग मिळू शकतो.

सभापती महोदय, कोकण हा निसर्गाने नटलेला प्रदेश आहे. या ठिकाणची नैसर्गिक हानी टाळण्यासाठी रासायनिक प्रकल्प तसेच प्रदूषण करणारे प्रकल्प येथे येणार नाहीत याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. कोकणातील निसर्ग टिकला तरच कोकणातील माणूस जगू शकेल.

सभापती महोदय, कोकणाच्या संदर्भात मला दोनच मुद्दे मांडावयाचे आहेत की, जगातील माणूस कोकणात आला पाहिजे आणि कोकणातील हापूस आंबा जगात गेला पाहिजे. कोकणातील पर्यटन स्थळांचा विकास झाला पाहिजे.

यानंतर श्री. अजित.......

श्री.संजय केळकर.........

कोकणातील किल्ल्यांची डागडुजी करुन त्यांचे सुशोभिकरण केले पाहिजे.

सभापती महोदय, कोकणातील उत्पादन वाढवावयाचे असेल, कोकण प्रदेश जगाच्या नकाशावर आणावयाचे असेल तर कृषि विभागामार्फत फलोत्पादन बागांचा विकास झाला पाहिजे. परंतु याकरिता निधी उपलब्ध होत नाही.

सभापती महोदय, कोकणातील पर्यटन विकासावर भर देणे अतिशय महत्वाचे आहे. तसेच कोकणातील निसर्गाची हानी करणारे रासायनिक तसेच प्रदूषण करणारे प्रकल्प न आणता फलोद्योग बायो टेक्नॉलॉजी, माहिती तंत्रज्ञान अशा स्वरुपाचे उद्योग कोकणात आले पाहिजेत. त्याकरिता विशेष प्रयत्न केले पाहिजेत असे मला वाटते.

कोकणात कृषि पर्यटन, हॉटेल व्यवसाय, जलपर्यटन, साहसी पर्यटन, आदी विविध व्यवयास करण्यासाठी विविध प्रकारचे परवाने लागतात. परंतु इन्स्पेक्टर राज असल्यामुळे कोकणातील व्यवसायिक परवाने मिळविता मिळवता थकून जातात आणि त्यांचा व्यवसाय सुरु करण्याचा उत्साह मावळतो. तेव्हा विविध प्रकारच्या व्यवसायांचे परवाने एकाच खिडकीवर कसे मिळतील याचा विचार झाला पाहिजे.

कोकणात पर्यटनाला सुगीचे दिवस आणावयाचे असतील तर पुढील 10 वर्षे कोकण पर्यटन व्यवसायाला काही सवलती देणे आवश्यक आहे. कोकणास निधी देता येत नसेल तर किमान तेथील व्यवसायिकांना करांमध्ये सवलत द्यावी. हॉटेल व्यवसायावरील व्हॅट माफ केला तर अनेक हॉटेल व्यवसायिक पुढे येतील. तसेच कोकणातील निसर्गरम्य ठिकाणाच्या जाहिराती मोठ्या प्रमाणात केल्या पाहिजेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला पाहिजे. एका बाजूला ओरड करायची की, कोकणातील पर्यटन हे केरळ राज्यापेक्षा मागासलेले आहे. तर दुसऱ्या बाजूला कोकणच्या विकासासाठी कोणतीही तरतूद करायची नाही. केरळात असलेले सौदर्य लक्षात घेऊन केरळ राज्याने तेथील पर्यटनाकडे प्रामुख्याने लक्ष पुरविले. त्यामुळे केरळमध्ये अमेरिका, जपान, चीन, असे जगभरातून पर्यटक येत आहेत. कोकणात सुध्दा अशी अनेक पर्यटनस्थळे आहेत की ती विकसित केल्यास जगभरातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक येऊ शकतील. तेव्हा या दृष्टीने विचार केला पाहिजे.

..2..

श्री.संजय केळकर.........

सभापती महोदय, कोकणामध्ये कृषि ग्रामीण पर्यटन विकास करण्यासाठी भरपूर वाव आहे. दापोली तालुक्यातील कोळथरे,मुरुड, रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे, मालगुंड, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला- उभादांडा, रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर, दिवेआगर इत्यादी ठिकाणी तसेच कोकणातील अनेक गावांत पर्यटकांची राहण्याची व्यवस्था नारळी पोफळीच्या वाड्यांत व आंब्यांच्या बागेत केली जाते आणि यास पर्यटकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. तेव्हा ग्रामीण-कृषि पर्यटनाचे प्रकल्प उभारण्यासाठी कोकणला दरवर्षी 100 कोटी रुपये दिल्यास गावा-गावांमध्ये, घराघरांत अशाप्रकारचे प्रकल्प उभे राहू शकतील. यातून रोजगार उपलब्ध होईल आणि ग्रामीण पर्यटनाचे वेगळे मॉडेल जगासमोर येऊ शकेल.

सभापती महोदय, कोकणातील पर्यटनासाठी प्रसिध्द असलेल्या भागांमध्ये लोडशेडीग थांबविले पाहिजे. जर लोडशेडीग होणार असेल तर विकास कसा होणार ? याचा शासनाने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, कोकणला जसा पौराणिक महत्व लाभलेले आहे तसा ऐतिहासिक वारसा देखील लाभलेला आहे. सह्याद्रीचे उंच कडे, विशाल सागर या भौगोलिक घटकामुळे छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या दूरदृष्टीच्या नेत्याने कोकणचे महत्व जाणले आणि ते समृध्द केले. ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या मुरुड-जंजिरा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, जयगड, रत्नदुर्ग, गोपाळगड, रसाळगड, गोवाळकोट, यशवंतगड यासारख्या किल्ल्यांची डागडुजी करणे आवश्यक आहे. ऐतिहासिक वास्तूंचे जतन केल्यास पर्यटक मोठया प्रमाणावर येऊ शकतील. तेव्हा या किल्ल्यांची डागडुजी आणि सुशोभिकरण करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कोकणात पर्यटन विषयक प्रशिक्षणाची व्यवस्था केल्यास तेथील तरुणांचा स्वयंरोजगार मिळू शकेल. उदाहरणार्थ कृषी पर्यटन, हॉटेल व्यवसाय, टुरिस्ट गाईड इत्यादी. तेव्हा याकडे कटाक्षाने पहावे. शेवटी एवढेच सांगेन की, पर्यटनाच्या माध्यमातून स्वयंरोजगार आणि कृषिच्या माध्यमातून कोकणचा विकास झाला पाहिजे, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये याठिकाणी जो प्रस्ताव चर्चेसाठी आलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या चार विभागांचा मिळून कोकण प्रांत झालेला आहे. 30,394 हजार किलोमीटरच्या विस्ताराचे क्षेत्रफळ कोकणाचे आहे. एकूण महाराष्ट्राच्या जवळपास 10 टक्के क्षेत्रफळ कोकणाचे असून ज्या पध्दतीने कोकणाला महत्व द्यावयास पाहिजे तेवढया प्रमाणात राज्यकर्त्यांनी कोकणाला महत्व दिलेले नाही वा त्यांना कोकणाचे महत्वच समजलेले नाही, ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे. सभागृहात कोकणातील अनुशेषाचा उल्लेख वारंवार येतो. परंतु, खरेच कोकणाच्या पदरात काही पडले आहे काय ? त्याचे उत्तर "नाही" असेच आहे. याबाबतीत कदाचित आम्ही कमी पडलो असू, कोकणातील जनता कमी पडली असेल किंवा मुंबईमध्ये राहणारी कोकणी माणसे कमी पडली असतील. आज कोकणाचा विकास न होता, कोकण भकासच झालेला आहे, असे मला याठिकाणी दुर्दैवाने सांगावेसे वाटते. कोकणामध्ये भरपूर पाऊस पडतो. परंतु ते पाणी वाहून जाते. आताच सन्माननीय सदस्यांनी, कोकणामध्ये कडी-कपारी असल्याचे सांगितले. त्यामुळेच "पाणी अडवा, पाणी जिरवा" ही संकल्पना कोकणामध्ये रुजली नाही. कोकणामध्ये 1 मोठा, 9 मध्यम व 43 छोटे प्रकल्प आहेत. परंतु त्या प्रकल्पास आत्तापर्यंत किती पैसा मिळाला ? सन 1998 मध्ये कोकण पाटबंधारे विकास मंडळाची स्थापना झ ााली. असे असतानाही आज या प्रकल्पांची स्थिती काय आहे ? कोकणातील सर्व प्रकल्पांवर ज्याप्रमाणे काम व्हावयास पाहिजे होते, त्याप्रमाणे ते झालेले नाही. सिंधुदुर्ग जिल्हयाच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास, सुरुवातीस वाडा व मोखाडा तालुक्यांचा उल्लेख करणे उचित आहे, असे मी समजतो. मुंबईपासून फक्त 30 किलोमीटरच्या अंतरावर वाडा व मोखाडा हे तालुके सुरु होतात. परंतु आज या तालुक्यांची स्थिती काय आहे ? जशी गडचिरोली व मेळघाटची स्थिती आहे, तशीच स्थिती वाडा व मोखाडयाची स्थिती आहे. वास्तविक पाहता, आज त्या भागातील माणसे मोठया प्रमाणात नोकरीसाठी मुंबईत येतात. राज्याचा हा आदिवासी प्रांत असून तो संवेदनशील भाग आहे. तरीही तिकडे आपण कोणत्याही योजना राबवित नाहीत. कालचीच गोष्ट घ्या. मोखाडयामध्ये 15 बंधाऱ्याचे काम चालू आहे. त्याठिकाणी आदिवासी उप

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

योजनेची कामे चालू आहेत. परंतु त्याठिकाणी नको त्या ठिकाणी बंधारे बांधले जात आहेत. त्या कामांवर कोणाचेही नियंत्रण नाही. मग, त्याठिकाणचा विकास कसा होणार ? त्याठिकाणी पाणी मिळणारच नाही. त्यामुळे त्याठिकाणी कुपोषण, उपोषण, भूकबळी होणारच. आज त्याठिकाणी मोठया प्रमाणात पाण्याची समस्या आहे व यापुढेही त्यापेक्षा अधिक निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयाबद्दल बोलावयाचे म्हटले तर, सिंधुदुर्ग जिल्हा निसर्गरम्य जिल्हा असून फळांचा राजा हापूस आंबा त्याठिकाणी पिकतो. परंतु आज या सिंधुदुर्ग जिल्हयाची काय परिस्थिती आहे ? माननीय बुश साहेबांना हापूस आंबा खूप आवडला. त्यांनी आंबा निर्यात करण्याची प्राचारणा केली. गेल्यावर्षी अमेरिकेने हापूस आंब्याच्या निर्यातीसाठी सिंधुदुर्ग जिल्हयाला दरवाजे उघडून दिले. परंतु ते यावर्षी बंद झाले.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ KTG/ प्रथम श्री.पुरी........ 18:30

डॉ.दीपक सावंत........

का बंद झाले ? कारण, वाशी येथील व्हेपर हिट ट्रिटमेंट प्लँट बंद पडला आहे. त्यामुळे यावर्षी अमेरिका व जपानमध्ये आंब्याची निर्यात होणार नाही. आंबा निर्यातदारांना त्यामुळे मोठा फटका बसणार आहे. बुशला आमच्या सिंधुदुर्गच्या हापूस आंब्याची चव चाखता येणार नाही. आजपर्यन्त कापसाला हमी भाव द्या, धानाला हमी भाव द्या, अशा प्रकारची मागणी झाली. मंत्री महोदयांनी गेल्या वर्षी पुण्यामध्ये फार मोठे आंबा निर्यात प्रदर्शन भरविले होते. बुशना आंबा आवडतो, पण तो यावर्षी अमेरिकेत जाणार नाही ही तुमच्यासाठी व आमच्यासाठीही दुर्देवाची गोष्ट आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी बुशसाठी नाही तर सन्माननीय सदस्यांसाठी खुलासा करतो आहे. आपण दरवर्षी आंबा एक्सपोर्ट महोत्सव भरवतो, हे सन्माननीय सदस्यांनाही माहीत आहे. यावर्षी सुध्दा आंबा निर्यात करण्याचे धोरण स्वीकारले आहे. यावर्षी चायनाकडून ऑफर आलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी माननीय मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, आंबा निर्यात करण्यासाठी व्हेपर हिट ट्रिटमेंट प्लँटची आवश्यकता आहे. जपान व अमेरिकेने असे सांगितले आहे की, या प्लँटमधून प्रक्रिया होत नाही तोपर्यन्त आंबा स्वीकारला जाणार नाही. वाशी येथील प्लँट बंद आहे, अद्याप तो चालू झालेला नाही, हे मी आपल्या माहितीसाठी सांगतो. आता आपण काय करणार आहोत ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, वाशी येथील ट्रिटमेंट प्लँट आपण अपेडाकडून घेतला आहे व त्याचे एक्सपान्शन देखील केले आहे. हा प्लँट या सिझनमध्ये सुरु करण्याची तयारी पूर्ण झाली आहे. सदर प्लँट बंद आहे, ही वस्तुस्थिती नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी जी माहिती दिली आहे त्यानुसार आता बुश महाशयांना आंबा खाण्यास उपलब्ध होईल, आनंद आहे. मी मघाशी हे सांगत होतो की, कापसाला हमी भाव द्या, धानाला हमी भाव द्या, अशी मागणी सतत होत असते. मात्र आंब्याला कधी हमी भाव दिला नाही. आता आंब्याला देखील हमी भाव दिला पाहिजे, अशी मागणी सभागृहातील सन्माननीय सदस्य सतत करीत असतात. ज्या ज्यावेळी आंब्याला खार पडली त्यावेळी आपण एकरी पैसे देता, झाडाला पैसे देता का ? ही नुकसान भरपाई प्रत्येक झाडामागे मिळाली पाहिजे. अशी नुकसान भरपाई शासनाकडून देण्यात येईल का ? माझी अशीही मागणी

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...........

आहे की, जे निकष लावायचे असतील ते लावावेत, पण आंब्याला हमी भाव दिला पाहिजे व याबाबत शासनाने सहानुभूतिपुर्वक विचार केला पाहिजे. या सभागृहातील 19 सदस्य हे कोकणातील आहेत व त्यापैकी 8 सदस्य हे सिंधुदूर्ग जिल्हयातील आहेत. त्यांची संख्या लक्षात घेऊन तरी शासनाने याचा विचार करावा, असे मला वाटते.

सभापती महोदय, कोकणातील लोक मुंबईत येऊन काम करतात ते त्याच ठिकाणी राहिले पाहिजेत, असे सन्माननीय मंत्री, श्री.हर्षवर्धन पाटील यांचे म्हणणे आहे. पण ही कोकणवासीयांची चेष्टा आहे. मी यासाठी हे सांगतो आहे की, कोकणासाठी शासनाने काय केले ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यालय, लोणेरे येथे सुरु केले. सिंधुदुर्ग कुठे, बांदा कुठे आणि विद्यापीठ कुठे ? त्या ठिकाणी शासनाने कोणते कोर्सेस सुरु केले, हेही पाहणे महत्वाचे आहे. त्या ठिकाणी फुड टेक्नॉलॉजी कोर्स सुरु करणे आवश्यक होते. फळांवर प्रक्रिया हा विषय या शासनाने कोकणासाठी किंवा सिंधुदुर्गसाठी किंवा रत्नागिरीसाठी कधीच हाताळला नाही. येथे जे कोर्सेस सुरु केले ते सगळे कोर्सेस चुकीचे आहेत. पर्यटन जिल्हा घोषित झाला पण टुर्स अॅण्ड टुरिझमचा एकही अभ्यासक्रम येथे सुरु केलेला नाही. फुड टेक्नॉलॉजीचा एकही कोर्स नाही. एवढा मोठा किनारा आहे, पण मरीन इंजिनिअरिंगचा एकही अभ्यासक्रम येथे नाही. आपल्या कृपेने कोकणामध्ये वीज सारखी जाते, पण इलेक्ट्रिक इंजिनिअरींगचा कोर्स नाही. फॅब्रिकेशनचा कोर्स नाही आणि आय.टी.तर कोसो दूर आहे. अशा प्रकारे त्या ठिकाणी कोर्सेस नाहीत.

यानंतर कुमारी धनश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत सुरु .. .

लोणेरे विद्यापीठामध्ये 390 राखीव जागा आहेत आणि या 390 राखीव जागांपैकी किती जागा स्थानिक उमेदवारांसाठी शासनाने राखीव केलेल्या आहेत ? ही खरोखर विचार करण्यासारखी गोष्ट आहे. कोकणातील माणूस उद्योगधंदयासाठी कोकणातच रहावा यासाठी पदवी, पदविका प्रमाणपत्र परीक्षा कोकणात नको का ? या सिंधुदुर्ग जिल्हयाची आपण आकडेवारी पाहिली तर आपल्याला असे आढळून येईल की, तेथे 1468 प्राथमिक शाळा, 206 माध्यमिक शाळा आणि फक्त 43 उच्च माध्यमिक शाळा आहेत. अशा प्रकारे शिक्षणाची अत्यंत भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. जिल्हा परिषदेच्या ज्या ज्या शाळा आहेत त्या प्रत्येक शाळेतील शाळा खोल्या पावसाळयात गळतात. कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो, व नद्या पाण्याने तुडुंब भरुन वाहतात तेथे साकव्याची कमतरता आहे. त्यामुळे तेथील मुलांना शाळेत यावयाचे असेल तर नदी पार करुन यावे लागते.

सभापती महोदय, कोकणातील आरोग्य सेवांबाबत तर आपण न बोललेलेच बरे अशी परिस्थिती आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये अनुशेष असतांना एकही मेडिकल कॉलेज कोकणामध्ये उभारले गेले नाही. एखादया रुगणास हार्ट अटॅक आला तर त्यास कोल्हापूर किंवा गोव्यास न्यावे लागते.रत्नागिरी जिल्हयामध्ये जे रुग्णालय आहे, तेथील मेडीकल कॉलेजची केवळ इमारत उभारली गेलेली आहे. तेथील सुविधांबाबत तर न बोललेलेच बरे, तेथील एम.आर.आय., सिटी स्कॅन मशिन सर्वकाळ बंद असते अथवा बिघडलेल्या अवस्थेतच असते. रुग्णालायात आवश्यक डॉक्टर वर्ग उपलब्ध नाही. या रुग्णालयामध्ये एका ट्रॉमा केअर युनिटची आवश्यकता होती, युती शासनाच्या काळामध्ये कणकवलीला हे युनिट तयार करण्यात आले होते मात्र पुढील काळात हे युनिट सुरु करण्याची जबाबदारी शासनाने पार पाडली नाही.

कोकणामध्ये वाहतुक प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे त्यामुळे अपघाताचे प्रमाणही वाढलेले आहे.या अपघातील हेड इंज्यूरी व इतर सिव्हीअर केसेसचे प्रमाण देखील वाढलेले आहे, अशा प्रकारचे सिव्हिअर रुग्ण जर या रुग्णालयात आले तर त्या रुग्णांवर उपचार करण्यास हे रुग्णालय सक्षम नाही, त्या रुग्णांना ताबडतोब कोल्हापूर जिल्हा रुग्णालयामध्ये किंवा गोवा रुग्णालयास हलवावे लागते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दिपक सावंत.......

कोकणातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ई.सी.जी.ची व्यवस्था नाही, तेथे पुरेसे डॉक्टर्सही उपलब्ध नाहीत, एखाद्या माणसास जर साप किंवा विंचू चावला तर त्यासाठी उतारा "ॲण्टी स्नेक व्हेनम " लवकर उपलब्ध होत नाही. तसेच ते औषध देण्यासाठी डॉक्टर्स उपलब्ध नाहीत. पावसाळयामध्ये देवगड या भागामध्ये ब-याच प्रमाणात फुरसे,घोणस अशा प्रकारचे साप निघतात, तेथील लोकांना साप चावण्याचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे. देवगड जिल्हयामध्ये फुरस या सापाचे प्रमाण फार असल्यामुळे तेथे या सापाच्या विषापासून " ॲण्टी स्नेक व्हेनम " काढण्याचे काम केले जात होते परंतु आता श्रीमती मनेका गांधी यांच्या " प्राणी संरक्षण कायद्यामुळे तेही बंद झ ाले आहे. पावसाळयामध्ये गावात किमान 5 ते 7 लोकांना साप चावण्याचे प्रकार घडतात. कोकणातील ओरसचे रुग्णालय किंवा रत्नागिरीचे उपरुग्णालय यांमध्ये ऑपरेशन थिएटर्स नाहीत, तसेच तेथे ऑर्थोपेडिक सर्जन हा सिव्हील सर्जन आहे. तेथे फिजिशियन,एक्स रे टेक्निशियन, पेडिएट्रिशियन, गायनॉकॉलाजिस्ट , पॅथॉलॉजिस्ट उपलब्ध नाही तसेच तेथील सिटी स्कॅन मशिन देखील बंद असते. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी या ठिकाणी कोकणातील रुग्णालयांच्या दुरावस्थेबाबत एक तारांकित प्रश्न उपस्थित केला होता त्या प्रश्नास माननीय आरोग्य मंत्री महोदया श्रीमती विमल मुंदडा यांनी असे उत्तर दिले होते की, आम्ही पाच दिवसात सदर जिल्हयातील रुग्णालयात आवश्यक ते डॉक्टर्स लवकरात लवकर उपलब्ध करुन देऊ. माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे डॉक्टर्स आले परंतु पाच दिवसातच ते तेथून परत गेले, याचे कारण असे आहे की, तेथे डॉक्टर्सना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा व निवासव्यवस्था नाही. जे निवासस्थान आहेत त्यामध्ये एखादा आदिवासीसुध्दा राहू शकणार नाही, अशी तेथील क्वार्टर्सची व इन्फ्रास्ट्रक्चरची अवस्था आहे. माननीय मंत्री महोदयांनी ओरसच्या उपजिल्हारुग्णालयांची अवस्था स्वत: जाऊन पहावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

कोकणातील ओरस हॉस्पीटलने आपल्या रिपोर्टमध्ये असे म्हटले होते की, या हॉस्पीटलमध्ये एकही रुग्ण दगावत नाही. दगावणा-या रुग्णांची संख्या त्यांनी "शून्य "अशी आपल्या अहवालामध्ये दाखवल्यामुळे या रुग्णालयात चांगल्या प्रकारचे औषधोपचार रुग्णांवर केले जातात असे आपल्याला म्हणावयाचे आहे का ? सभापती महोदय, कोकणात शिक्षण नाही, आरोग्य नाही आणि उद्योगधंदाही नाही आणि आमच्या मागण्यांनाही किंमत नाही.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दिपक सावंत....

या ठिकाणी मी दोनच मागण्या मागू इच्छितो. एक म्हणजे कोकणाला हमी भाव द्यावा व दुसरी म्हणजे संपूर्ण कोकणातील आरोग्य सुविधांकडे लक्ष द्यावे. अशा प्रकारे कोकणाच्या विकासांच्या बाबींकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे, एवढे सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र !

.................

**तालिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. मंगळवार दिनांक 03 एप्रिल,2007 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 12.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक पुन: भरेल. सदर बैठकीमध्ये कोकणाच्या विकासाच्या प्रस्तावावर चर्चा व उत्तर होईल त्यात मराठी भाषेच्या प्रस्तावावर चर्चा होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 40 मिनिटांनी, मंगळवार,दिनांक 03 एप्रिल ,2007च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

......................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही